पत्रनंबर
२३

॥ श्रीराम ॥

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिच.
यु. स्टे. अमेरिका.
ता ३१-मे ५४.

147

चि. रामूस अनेक आशीर्वाद.

तुझ्या सात ओळी, ता. २ मेरोजी लिहिलेल्या पोचल्या. गेल्या खेपेस चि. विनायकाबद्दल मी तुला लिहिलेच आहे. त्यानंतर त्याच्याकडून त्याच्या विषयाबद्दल पत्र आले आहे, त्यांत संस्कृत व इंग्लिश हे दोन विषय आपणास आवडतात असे तो म्हणतो. मी कल्पना केल्याप्रमाणे त्याच्या विषयाची आवड खरी ठरली. त्याला गणित येत नाहीं म्हणून गणितात तो कुचकामाचा आहे हे मी तुला लिहिलेच आहे. चि. विनायक ही "I don't want to bother my head for mathematics" असे इंग्रजी भाषेत म्हणतो. अर्थात त्याचा पुढील व्यवसाय संस्कृत व इंग्लिश यांतच झाला पाहिजे. दुसऱ्या विषयांत तो नापास झाला तरी हरकत नाहीं पण आवडते विषय त्याने घ्यावेत अशी माझी इच्छा आहे. आणि हे विषय फर्ग्युसन मध्यें चांगले शिकविले जातात. शिकविण्याकडे पाहिले तर कोणत्या कॉलेजांत चांगले शिकवितात हें मला माहीत नाहीं पण विद्यार्थी व मास्तर यांचे ज्या ठिकाणी संघटन होऊं शकते तें स्थान फर्ग्युसन कॉलेज आहे. कॉलेजमध्यें खुशालचेंडू मुलांनी पाहिजे असल्यास जावें, पाहिजे तसा खर्च करावा व इच्छा असल्यास वेळ काढून अभ्यास करावा. अशा ठिकाणी अभ्यास होत नाहीं असें नाहीं पण श्रीमंतीपणाला व ऐषारामीपणाला अशा ठिकाणी ऊत येत असल्यामुळे मुलें ~~अ~~ फार गर्विष्ठ ढोंगी व मग्रूर ताठकळी बनतात. त्यांना स्वतः कसें काम करावें हें समजत नाहीं व संगती दोषानें बिघडतात. अशा ठिकाणी येणारी मुलें प्रथम पासूनच बिघडावीत वाढलेली असल्यामुळें त्यांना या वेळीं सुद्धां तसें वागावेसें वाटतें व ते तसें वागतात हीं कारण वर दाब विशेष कोणाचा नसतो. अभ्यासाची परीक्षेपर्यंत फिकीरही नसते. परीक्षेच्या वेळच्या वेळीं मग फेल होण्याचा प्रसंग येतो. याची उदाहरणें मी तुला द्यावीत व तीं तूं ऐकावीस इतका कांहीं तूं खचीत दूधखुळा नाहींस. संस्था सरकारी असल्यामुळें एखादा मास्तर चांगला असूं शकेल व मुलांवर चांगला दाब बसतो असाही कोटीवाद कोणीतरी काढतील. त्यास (प्रश्न उत्तर द्यावयाचें तें हें कीं सरकारी शाळांतील मास्तर ठोक पगाराचे असतात, त्यांस मुलांनी अभ्यास केला काय, न केला काय सारखेच. महिनाअखेर त्यांचा पगार त्यांस मिळाल्याशी कारण. तसें बिनसरकारी शाळांचें नसतें. स्वतःच्या चांगल्या गुणांनी मुलांचें चित्त त्यांना आकर्षून घ्यावयाचें असतें आणि म्हणून ते हरएक बाबतीत चांगुलपणा दाखवितात व त्याप्रमाणें वागतात. मुलांशी प्रेमानें वागणें, त्यांना कळकळीनें शिकविणें, त्यांच्याशी मिळून मिसळून वागणें यांच अशाच गुणामुळें खाजगी संस्था पुढें येतात. अशापैकीं फर्ग्युसन कॉलेज ही प्रमुख आहे. आणि म्हणून विनायकाने त्या ठिकाणी जावें अशी माझी इच्छा आहे. याशिवाय अशा कॉलेजमध्यें गेल्यानें स्वावलंबन कसें करावें हें मुलांना कळेल, याशिवाय खाजगी संस्थांतले बहुतेक लोक अशा रीतीनें पुढें आलेले असतात व मुलें ही तशीच

असतात. अशा मुलांमध्यें राहून आळसपणाचे म्हणजे एखादी पुढील आयुष्याची दिशा ठरविल्यासारखें होतें. ह्यांत कसें वागावें, व्यवहार कसा करावा व गोष्टीं प्रत्यक्ष अनुभवाद्वारा शिकावयाला मिळतात. अशा गोष्टी ज्यास शिकावयाच्या असतील त्यानें अनुभवशीर गृहस्थाच्या हाताखाली दिवस काढले पाहिजेत आणि चि. विनायकाला माझ्यामतें फर्ग्युसन कॉलेजची मंडळी योग्य आहे असें वाटतें. हें दुसरें कारण. (पहिलें कारण मागील पत्रांत लिहिलें आहेच)

आतां फर्ग्युसनला जावयाचें ठरलें म्हणजे मी या अमेरिकेतील आन आर्बरच्या खोलींत बसूनच त्याची पुढची सर्व व्यवस्था करतो. त्यांस कोणाच्या मनुष्याकडे द्यावयाचें, त्यानें कोणाची मैत्री संपादावयाची, कसें वर्तन ठेवावयाचें याचा सर्व ठराव तुझ्याकडे पाठवून देईन व तूं त्याप्रमाणें कर. या पत्रांत एकच गोष्ट लिहितो व पुढें या आठवड्यापुरती रजा घेतो.

पुण्याला गेल्यानंतर भास्कर व विनायक या दोघांनी एकत्र रहावें. क्वॉर्टर्स मध्यें राहावयाचें नाहीं. एक खोली गांवांत भाड्यानें घ्यावयाची व तेथें एकत्र खाणावळींत जेवण करीत राहावयाचें. खाणावळीचें जेवण पसंत पडत नसल्यास वाजनावाल्याच्या बंगल्या प्रमाणें एखाद्या ठिकाणीं सर्व गुणांत एक खोली घ्यावयाची व क्लबमध्यें राहावयाचें. पण त्यामुळें भास्करचा खर्च वाढेल, विनायकाला निराळें राहावें लागेल, त्याला निराळी व भलतीच संगती लागेल. म्हणून हा मार्ग मला पसंत नाहीं. मुलांचें हेंच वय फार घातक असतें. याच वयांत मुलांचें पुढील आयुष्य अवलंबून असतें. आणि म्हणून येथें सर्व व्यवस्था बरोबर साधली पाहिजे. खाणावळीचाच मार्ग मला पसंत आहे. तरी तूं स्वतः या बाबतीत विचार कर. चि. विनायकाला स्वतः विचार. भास्कर काय तें ठरवेल. आणि सर्व जण मिळून मला कळव तें कळवा. चि. शंकर जर पास झाला तर तोही बहुतेक या दोघांना मिळेलच मिळेल आणि मग – खरोखरीच मोठी मौज घडून येईल. या तिघांमुळें एक चांगला क्लब चालेल. असो हा पुढील विचार आहे. तरी त्याला फार अवधी नसल्यामुळें मी तुजकडे या सर्व गोष्टी विचारार्थ पाठविल्या आहेत. नीट विचार कर. तिर्थ. वहिनींना विचार त्यांचा सल्ला घे. आणि मला लवकरच कळीव. माझी वेळ फार अमोलिक आहे. मला एक तास म्हणजे १ डॉलर किंमतीचा आहे. परंतु विनायका साठीं मी [illegible] खर्ची घालून — हें मागील पत्र पुरें लिहिलें आहे. पुढें पाने ठेवल्या क्रमांत पत्राच्या पानांचा क्रम राहू नये अशी विनंती आहे. कोणत्याही गोष्टीवर नीट विचार करीत जा हीच विनंती

तुझा नारायण

गंगाताईचें पत्र वाच. थोडी हकीकत कळेल.

नाडगीराचे बंधू पुणाजर बघत असतील तर त्यांस पैशा-बद्दल विचार. अमेरिकेतील नाडगीराने आवास काय लिहिलें, समजत नाहीं. तरी गुप्तनीतीने चवकशी करीत र त्यांच्यावरून आपलें समज. विशेष पुढील खेपेस.

पत्र नंबर
५३

॥ श्रीराम ॥

मिशिगन विश्वविद्यालय
आन् आर्बर, मिश्.
यु. स्टे. अमेरिका
ता ३१-५-५४

ति.रा. वडिलांस बालक नारायणाचे अमेरिकेहून दोन्ही करजोडून
त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना:-

आपल्या इंग्रजी पत्रलेखनाने आपल्या मनांतील सर्व उद्गार मला कळविले. परंतु ते जर मातृभाषेत असतां तर त्यांस पुष्कळ गोडी आली असती. आमच्या देशाचे आतां पूर्ण दुर्दैवच ओढवले म्हणावयाचे कारण वडील-म्हातारी मंडळी सुद्धा इंग्रजी भाषण — दुभाष्याकरवीं — करूं लागली व पत्र, पत्र, करून लागूं लागली. आमच्या मंडळीला सुंदरशी मराठी व कानडी भाषा आवडत नाहींसें दिसते. असो. इंग्रजीत तरी तुमचा अभिप्राय कळला हें ठीक झालें. काळजी नको; मी पूर्वी जसा होतो तसाच शेवटपर्यंत राहणार? अमेरिकेला आलो म्हणून माझें पुष्कळ गुण जातील असें तुम्हांला वाटतें काय? मातेवर जडलेले प्रेम कोणीही कोठेंही गेला तरी कधींही कमी होणार नाहीं. उदाहरणार्थ तुमच्याच आईबापाची गोष्ट घ्या. त्यांना परलोकगमन करून किती तरी वर्षे झाली पण तुम्हांला आईबापाची आठवण झाली कीं किती बरें आनंद वाटतो व तुम्हीं कशा मागच्या गोष्टी सांगतां किंवा एखादे वेळीं दुःख करतां तसेंच माझें. माझी जन्मदाती माता पितरें जरी गेली तरी माझ्या पोसत्या जनकाची व जननीची मला आठवण आहे. पोसत्या जननीला मी कधींही विसरणार नाहीं. पोसत्या जनकाची मला सतत आठवण रहावी म्हणून लवकरच मला एक कृती अर्पण करावयाची आहे. माझें इंग्रजीतील पहिले पुस्तक — म्हणजे जें मी लिहिलें आहे व जें येत्या महिन्यांत प्रसिद्ध व्हणार आहे — तें पहिले पुस्तक मी माझ्या पोसत्या जनकाच्या स्मरणार्थ तुमच्या परवानगीने अर्पण करणार आहे. या पत्रद्वारें आपली परवानगीही मी मिळवीत आहे व ती आपण द्याल अशी आशा आहे. असु; वेळेनुसार पुस्तकाची प्रत आपल्या अवलोकनार्थ व अभिप्रायार्थ आपणाकडे पाठवीन. त्याकरतां एक चांगला इंग्रजी वाचक तयार करून ठेवावा म्हणजे तो आपणास वाचून दाखवेल.

तुमच्या प्रकृती बद्दल काळजी घ्यावी व त्यांच्या बद्दल कळवीत
अलोभ ——— कळावे. ति.रा. पितृ अक्कांस माझा शि.सा.न. सां.करणे,

आपला बालक
नारायण.

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:-

तुझें मिस् पेनीने लिहिलेले तारीख ९-मे ५४ चे पत्र तारीख २५ मेरोजी माझ्या हातीं पडले. यावेळेस तुझें पत्र तीन दिवस उशीरा आले. त्यांत मजकूर ही फार नव्हता. तुझ्या पत्रां मागें विनायकाने

P.S.
"Being in her family course she has written in

Pencil." असें लिहिलें होतें. त्यांतील family course याचा अर्थ तो काय करतो हें त्यांना विचारावें. विटाळ येणें (विटाळशी होणें) याला monthly course असें म्हणतात म्हणून त्यांस सांगून त्यांनी चूक सुधरून घ्यावी.

चि. सिंधूचें व हरीभाऊचे पत्र पोंचलें. इतरांचीं पत्रें पोंचलीं. मी विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें तुजकडून न चुकतां यावीत अशी माझी इच्छा आहे. यावेळेचा माझा प्रश्न तुला ~~फार~~ (सर्वांनाच) फार कठीणसा वाटेल पण मला त्याशी कांहीं कर्तव्य नाहीं. ज्या उद्देशानें मी तुला हा प्रश्न करीत आहे तो तुला धीरेधीरे कळेलच. आणि मग तुला त्याचें आश्चर्य वाटणार नाहीं. गंगूताई, प्रश्नाचें उत्तर देशील ना? विसरणार नाहींस ना! तुला माहीत नसलेल्या बारीक सारीक सर्व गोष्टी तूं चि. वहिनींना विचारल्यास सांगतील. बाकीचा विचार तो सांगेल. पण एक गोष्टही न सोडतां सर्व लिही. तो प्रश्न कोणता तर "स्वतः चें (तुझें) चरित्र." तुझा जन्म झाल्या दिवसापासून तुझ्या हातांत हें पत्र पडे तों पर्यंत तुझें आयुष्य कसें गेलें तें सर्व साद्यंत — आठवून आठवून — लिही. एकही गोष्ट विसरूं नकोस. हें लिहावयाला मी तुला २ आठवड्याची अवधी देतो. बारकावे कळले नाहीं तर सोडून दे पण हकीकत आली पाहिजे. पत्र निराळें असावें व चरित्र निराळ्या कागदावर असावें हें ध्यानांत धर. या चरित्राची मी आतुरतेनें वाट पाहीन. विसरूं नको।

माझ्या पोषाखासंबंधानें मागें नंबर ८ ज्ञानपद्धत मी लिहिलेंच आहे. खर्चासंबंधानें सवडीनें लिहीन. विलायतेचे चांगले फोटो येऊं देत. म्हणजे त्यांवर मला लेख लिहितां येतील. उगीच फोटो विचारूं नकोस.

गंगूताई, हे आंब्याचे दिवस ना? तुम्हीं बहुधा खूप आंबे खात असतीलच. इकडे आंबा कसा असतो हें या लोकांना माहीत सुद्धां नाहीं, मग आम्हीं खाणार कधीं? नुसती तुमची आठवण काढावयाची राहिले.

पत्राचें उत्तर जरूर. कळावें आपला
नारायण

Letter NO
23

|| Ram ||

University of Michigan 151
Ann Arbor, Mich
U. S. America
31st May 14

My dear Vinayak. Your unexpected detailed letter to hand. Glad to go through it. If you have an opportunity to read dear Ramu's letter of last & this week, you will come to know the reason why I ask you about your studies. Keep up to them.

Letter NO
23

|| Ram ||

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America
31st May 14

My dear Balu

Your's to hand. Glad to read its contents. You will now surely read some articles written by me, I am sure. I am sorry I can't write Canarese & I have no time to do so. Please excuse for the same.

|| Ram ||

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America
31 - May 14

Dear Shankar

Your words through Bhaskar to hand. Glad that you stood 1st in the terminal. Still more glad to see you taking pains for dear Bhaskar. Thanks for the same. You ought to have let me know about it.

Please read dear Gangutai letter & see what mistake you had made. ~~Rea~~ Correct it. Please write an essay in marathi on your own life, from your birth to the day on which you receive this letter. Give dates where necessay. Mention even minor points — which you remember. Take 2 weeks for writing it. Help dear Gangutai & Balu is doing the same. I must receive it after two weeks. Don't forget more in my next. Your's aff Narayan

Write an essay on your life from the begining of your life to the day on which you receive this letter. Don't miss any point. Give Dates where necessay. Ask Pillakka if she is there or dear Vahini. Consult others in writing the essays. Don't fail to do so. mind.

My Best Namaskaras to dear Pillu akka

Your's affly
Narayan

Please be writing often.

more in my next

Your's affly
N Kardikar

पत्र नंबर
२४

॥ श्रीराम ॥

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिशि.
यु. से. अमेरिका
ता. ८ जून २४

ति. ग. काकीस नारायणाचे दोन्हीकर जोडून [illegible] चरणी मस्तक ठेवून साष्टांग न.

विज्ञापना :— अण्णाकडून गेल्या खेपेस निरोप आला नाही. बहुधा तुम्ही फिरतीवर जाण्याच्या गडबडीत असाल ! हे पत्रही तुम्हांला वाचावयाला मिळेल की नाही कळत नाही. कारण आपण आपल्या जन्मस्थानाच्या दर्शनाला जाणार असल्याचे मला उडत उडत कळले. तेथें गेलात तरी माझी खुशाली तुम्हांला माझा कागदी घोडेस्वार कळवीलच. काळजी नसावी. माझी प्रकृती बरी आहे. मी हे गाव सोडून दुसऱ्या गावी निघालो आहे. पुढील पत्र त्या ठिकाणाहून पाठवेन. ति. ज. [illegible] अक्का तेथें आल्या आहेत ? आल्या असल्यास माझा शि. सा. न. सांगावा. ति. सौ. मावशीची प्रकृती कशी आहे. कळवा. विशेष नाही. कळावे लोभ असावा. नम्र बालक नारायण

वहिनी ! तुमच्या परवानगीने मी आता [illegible] चि. सौ. शांताबाईंना दोन ओळी लिहावयास सुरू करीत आहे.

चि. शांताईस अनेक आशीर्वाद :— तुमचें तारीख ८ मे रोजी लिहिलेले पत्र मला तारीख १ जून रोजी मिळाले. आनंद झाला. अशाच रीतीने ज्यास्त व सविस्तर मजकूर लिहित जाल तर फार बरें होईल. कोणाचेही पत्र वाचावयाला मी कंटाळत नाही. एखादें वेळ कामामुळे मी दुसऱ्या दिवशी किंवा तीन चार दिवसांनंतर तरी वाचतो. पण सगळी सविस्तर व ठीक कळावी अशी इच्छा आहे. अक्षर चांगले आहे म्हणून मला कंटाळा येत नाही. मला जर कंटाळा आला तर तुम्हांलाही माझीं पांच पांच पत्रें वाचावयाचा कंटाळा येत असेल यांत काहीं नवल नाहीं. त्यातून माझीं अक्षरें तुमच्या अक्षरापेक्षाही फार वाईट असतात. मग तुम्ही कंटाळणार नाही तर ! तुम्हाकडून अधिक मजकूर यावा असें मी जें म्हणतो त्यात दोन उद्देश आहेत. एक तुम्हा पुष्कळ वेळ बसून विचार करण्याची, मजकूर जुळविण्याची व तो कागदावर सुरेख अशा रीतीने मांडण्याची सवय व्हावी व दुसरें तुमचें अक्षर दिवसेंदिवस सुधारावें. पुढें माझ्याबरोबर तुम्हा काम करावें लागेल असें मी जें तुम्हा वारंवार म्हणतो त्याचा अर्थ काम म्हणजे दुसरें कसलेही नसून घरांतल्या घरांत बसून सुंदर व जोरदार लेख लिहिण्याचे व भगिनींची मनें आकर्षित करावयाची व आपल्या मनांतील उद्देश त्यांना कळवून त्यांजकडून देशाच्या आरोग्याचे काम करून घ्यावयाचे. तुम्हा आतां कळलेच असेल कीं मी येथें "सार्वजनिक आरोग्य" या विषयाचा अभ्यास करण्यास आलो असून माझ्या जीवित कार्यास माझें सर्व आयुष्य मी खर्च करणार आहे. मी अशिक्षितांचे कार्य फार मोठें असून त्याला मला प्रत्येकाचे साहाय्य पाहिजे आहे. सर्व भगिनीवर्गाचे साहाय्य तुम्हामध्यें आहे अशी मी कल्पना केली असून त्या दृष्टीने तुम्हा तयार करावयाची व तुम्हाकडून एक मासिक अथवा वर्तमानपत्र चालवावयाचे असा विचार आहे. लेख लिहिण्याची पहिली पायरी चांगली पत्रें लिहिणे. व पत्रांत प्रश्नाला धरून उत्तर देणे. एवढें करतां आले कीं लेखाच्या दुसऱ्या पायरीस चढावयाचे म्हणजे निरनिराळे निबंध लिहिणे. आपल्याला माहीत असलेल्या विषयावर निबंध लिहावयास प्रारंभ करावयाचा. तिसरी पायरी अजून माहीत नसलेले विषय घ्यावयाचे; त्यावरची निरनिराळीं पुस्तकें वाचावयाचीं व निरनिराळ्या लोकांची मतें अवलोकन करून आपले मत द्यावयाचे. शेवटची चवथी पायरी लेख किंवा म्हणजेच निबंध छापवावयास सुरू करावयाचे. पत्रें लिहिणे म्हणजेच लेख लिहिणे असें तुम्हा आतां कळले पाहिजे. आणि म्हणून माझीं अशी

इच्छा आहे कीं तूं आतां दोन दोन ओळींच नाहींतर चारचार आठआठ पानें लिहीत जाशील. माझें पत्र पोंचल्यावर पत्राचें उत्तर यावयाला ७ दिवस उशीर असतो त्या अवधींत माझ्या पत्रांतील प्रत्येक प्रश्न लिहून ठेव. तुला आपल्या स्वतःच्या वाचनांत उत्तर यावयाचें असल्यास तेंही लिहून ठेव. व तुला कोणता प्रश्न विचारावयाचा, तुला आपल्या इतर गोष्टी काय लिहावयाच्या त्याही आठवणी करून लिहून ठेव आणि त्यावर कसें लिहावें, काय लिहावें याचा विचार कर. किंवा माझें पत्र हातीं पडल्यावर तें प्रथम एकदां वाच आणि कुठें-कुठें वाचतांना तुला त्याठिकाणीं मजा वाटेल व जेथें कांहीं विचारावेसें वाटेल त्याठिकाणीं तांबड्या अथवा हिरव्या पेन्सिलीनें रेघ ओढ आणि त्यावर नंतर विचार कर. माझ्या प्रश्नांस उत्तरें देणें म्हणजे — वेद म्हणजे काय? ऋग्वेद काय? यजुर्वेद काय? असें विचारतो त्यांतील उत्तरें नव्हेत तर प्रश्न न करितां समजून लिहित असतांनाच जे प्रश्न कदाचित वाटत असतील अशा वेळेस त्यांची उत्तरें देणें. या गोष्टी तुझ्या विचार शक्तीवर अवलंबून आहेत. व असें करण्यानें तुझी विचार शक्ती ज्यास्त वाढेल. व पुढें आपल्या कामाला सोपें जाईल. ज्यास्त जसजसें लिहिशील तसतसें अक्षरही सुधारेल. माझ्यापत्राला पत्र येईल तर सर्वांच्या प्रश्नांना अशीं उत्तरें द्यावयाची तयारी ठेवीत जा. आमच्या वेळ नाहीं म्हणून कंटाळा करून सांगूं नको. महिन्यांतून चार दिवस जी रजा मिळे त्या दिवशीं निवळ तोंडावर पांघरूण घेऊन पडूं नको. त्यावेळीं बायकांना अक्कल लागते व म्हणून त्या आळशी बनतात हें मला ठाऊक आहे पण तूं त्या चार दिवस कांहीं थोडें स्वतःस आणि म्हणून तुला उर कंटाळा येतो करता पाहून ४४ आणि त्या चार दिवशीं एका महिन्यांत जितकें काम होणार नाहीं तितकें काम कर. माझ्या एका स्वप्नांत "मंगलाई विशालशी आहे म्हणून आज दोन ओळी लिहिल्या आहेत" असें विनायकानें लिहिलें होतें. तें कां बरें? त्यावेळीं तर पुष्कळ वेळ मिळाला होता! लिहिणेचा लिहिले असतें तरी चालले असतें पण पुष्कळ लिहावयाला पाहिजे होतें. पुष्कळवेळ सतत बसण्याची सवय पाहिजे. असा कंटाळवाणा कां? या गोष्टी तूं एकटीनेंच करण्यास असें नाहीं तर तुझ्या सोबत प्रत्येक स्त्रीनें केल्या पाहिजेत. विशेषतः माझा भरंवसा तुझ्यावर, सिंधूवर, तात्याच्या बायकोवर व माझ्या सख्याच्या (चि. सौ. सीताबाई) व पुढें होणाऱ्या सर्व सूनबाईंवर आहे. आजपर्यंत मी तुला, सिंधूला व तात्याच्या बायकोला लवकरच पत्रें लिहीत असें पण आजपासून माझ्या सुनेलाही पत्रें लिहिणार आहे. घरांतील सर्व मंडळींना मी पत्रें लिहितो व सर्वांची (विठोबा ची कुळं) मला पत्रें येतात पण सुनेचें मात्र पत्र येत नाहीं. चि. सौ. सीताबाई वय एकोणीस असल्यामुळें मी पूर्वी पत्रें लिहीत नसें, पण आतां सूनबाई तेथें आहे व तिला माझीं पत्रें वाचावयाला व उत्तरें लिहावयाला वेळही मिळेल अशा समजुतीनें व पुढें गुणाकारणाच तीही मला सहाय करेल असें समजून पत्रें लिहीत आहे. कदाचित वेळ नाहीं म्हणून ती पत्र लिहिणार नाहीं तर तीचि ज्यासतीची काम हें कर, पुढील हस्तेः घे अथवा पुढांकडे दे. आणि तेजाकडून पत्रें लिहून घेत जा. घरांतलीं कामें एकमेकींच्या सहायानें मोठ्या प्रेमळपणानें करीत जा. तुम्हांवरच घर अवलंबून आहे. तुम्हींच पुढां पुढां

स्वराज्यकृतीची काळजी घेऊन त्याला सत्पुत्र निपजाविणें तुमच्या हातीं असतें; चांगली प्रजा निपजविणें तुमच्या हातीं असतें. असो. तुझ्या इतर प्रश्नांचें आतां उत्तर देऊन हें पत्र पुरें करतो. श्री. हरीभाऊ, इकडे येणार असें दिसतें खरें. मला काय करें तूं पाठविण्याजोगीं आहेस? स्वयंपाकाच्या पदार्थांची मला जरूर नाहीं कारण ते विनाशी आहेत ते जरूर नाहींसे होतात. तें कांहीं मला नको. अन्य कांहीं पिठलाय — लिहून मी परत जाऊन तुम्हांला भेटें तोंपर्यंत टिकणारें असें मला पाठव. त्याशिवाय कुठें काय बरें असणार? मी हरीभाऊंच्या तुला भेटावयाला लिहिलें आहे. तो तुला भेटेल. ति. सौ. आईंनी व पिंटुअक्का यांस करून आशीर्वाद मागून घे व तेही तुझ्या प्रेमाबरोबर व इतरांच्या प्रेमाबरोबर एका डब्यांत घालून — घट्ट बंद करून — मजकडे पाठवून दे. मी त्याचा मोठ्या आनंदानें स्वीकार करेन.

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर; मिच.
यु. स्टे. अमेरिका.
ता ८-६-३४

॥ श्रीराम ॥

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद.

चि. मंगलाईच्या पत्रावरून सर्व हकीकत तुला कळेलच. प्रथम दर्शनीं तुला असें वाटेल कीं हा पांचटपणा करणें मला शोभत नाहीं व मी तुला पत्रें लिहिणें म्हणजे माझा मानच मी धाकटून घेतल्यासारखा होय. तुझें अन्य मंडळींनाही हें कसेंसेंच वाटेल. व कदाचित इतरांना असें वाटेल कीं मी अमेरिकेस येऊन स्त्रियांना पत्रें लिहावयास शिकलो. व थोडी मर्यादा सर्व सोडून टाकली. कांहीं ही असो, मी वहिनींच्या परवानगीनें व चि. रामूच्या सल्ल्यानें आजपासून तुला पत्र लिहावयास सुरू करीत आहे व आपल्या भावी कार्याच्या उद्धारार्थ आपल्याला जीं कामें करावयाचीं आहेत त्यांत तुला गोवणार आहे.

मला स्वतः एक गोष्ट सुचवावीशी वाटते ती ही कीं माझ्या

गंगूताई, मी येथें मोठ्या चैनीत असेन असें तुम्हां सर्वांना वाटत असेल नाहीं? मी कोठेंही असलो तरी सुखी असतो पण चैनीत किंवा मजामारीत मात्र नसतो. हें तुम्हा बाहेरच आहेच. मिळेल तें अन्नच गोड करून खातो व मिळेल त्याच्या वर निजून लोळतांना मी मृदुशय्या समजतो म्हणून मी सुखी आहे. आणि असें समजण्याची बुद्धी परमेश्वरानें मला दिल्यामुळें मी त्याचा अत्यंत ऋणी आहे. तुम्हां सर्वांना मी आपला उदरनिर्वाह कसा करून घेतो असा संशय येत असेल नाहीं? पण थोड्या दिवसांत तुम्हांला उलगडा होईल व त्यावरून सध्याची माझी मनःस्थिती तुम्हां कळेल. असो. वर लिहिल्याप्रमाणें पत्रांचें उत्तर जरूर जरूर धाडा. व पुष्कळ मजकूर लिही. तुझा प्रिय नारायण

ता.क. तारीख २०रोजीं हें गांव सोडून मी दुसऱ्या गांवीं जात आहे. पत्ता किती महिने देणार नाहीं हें मला माहीत नाहीं. पत्ता हाच कायम आहे. पत्रें मला वेळेवर मिळतील काळजी नसावी. नारायण.

पत्रें वाचून त्या पत्रांना उत्तरें द्यावीस. उत्तरें लिहावयाच्या पूर्वी बिलकूल गडबडावयाचें नाहीं. तुझ्या गतबंधूची - शंकररावाची - जरी मला योग्यता नाहीं तरी त्यांच्या व माझ्या विचारांत बरेंच साम्य होतें व पुढें बरींच कामें मिळून करण्याचें आमचें ठरलें होतें. परमेश्वरास तें पसंत पडलें नाहीं. परंतु आतां तुला माझी अशी विनंती आहे कीं तुझ्या गतबंधूच्या ठिकाणीं मला घेऊन तूं माझ्याशीं खुल्या मनानें वागण्यास प्रयत्न करशील अशी माझी आशा आहे. पत्रें लिहावयाला प्रथम तुला जड जाईल पण शांत चित्तानें धीर धरून आरंभ केला म्हणजे सर्व ठीक होतें हें ध्यानांत धर. प्रत्येक गुरुवारीं फक्त १५ मिनीटें खर्च करून दोन ओळीं लिहाव्यास अशी मी फार फार इच्छा करतो. कोणीही तुला नांवें ठेवणार नाहीं. आपल्याला आपलें घर सुधारावयाचें आहे. अमेरिकेतील स्त्रियांकडे पाहिलें म्हणजे आमच्या स्त्रियांचीच नव्हे तर पुरुषांची सुद्धां कींव येते. स्त्रियांची स्थिती सुधारण्याला तुम्ही दोघी ताई नवरंगे व चि. सौ. सिंधू आणि तात्याची बायको मला जोमानें मदत कराल अशी पूर्ण उमेद आहे. पुढील खेपेस स्त्रियांच्या दुःस्थितीचें वर्णन करीन. तुझा भ्राता

नारायण.

पत्रनंबर
२४

॥ श्रीराम ॥

मिशिगनविश्वविद्यालय 157
आन आर्बर. मिश.
यु.स. अमेरिका
१२-८-१४.

चि. विनायक यांस अनेक आशीर्वाद विशेष :-

तुझें ता-८ मेचें पत्र पोंचलें मजकूर समजला. विनायक, मजकूर अर्धवट कोणताही लिहीत जाऊं नको. कुठ-पर्यंत लिहिलें म्हणून आपण लिहावयाचें सोडूं नये. नाडगीर यांच्या घराण्याबद्दल काय हकीकत झाली ते पूर्ण कळीव व कोणतीही त्यांच्या मंडळीकडे नजर ठेवून थोडीशी हकीकत कळली तरी ती पूर्ण करून कळवीत जा. नाडगीर [illegible] तरी अंकुश कर [illegible] तसेंच. मी आज तुला पुस्तक पोस्टानें [illegible] म्हणून पाठवीत आहे. कारण माझे मित्र मजबरोबर असतात. त्यांचे थोडे वाईट झाले की मला भोगावें लागतें व चांगले झाले तर (एका अर्थी) माझी आवडी नाहींशी होतें. म्हणून प्रत्येक बातमी कळवावी अशी माझी इच्छा आहे. मी हें काम तुला दिलें आहे म्हणून कोणाला सांगूं नको. [illegible] काय करील हरी. माझ्याउद्देशानें तुला कळेल (डा. नाडगीर यांची) प्रत्येक बाबतीत मनुष्याला विचार करावा लागतो. तूं जर सर्व हकीकत कळविली असतीस तर बरें झालें असतें.

Try hard. Work hard. Prepare a time table & go according to that. Balu, you started English education with Vinayak & now he will leave you two years behind & go himself to Poona for education. Feel for that & work hard. Whatever you do, do it neatly & very keenly. Don't do it for others sake but for your own. Stick to your religious duties.

What about Mr. Dhangadi? What does he not write to me? Ask him to write. Did you receive the pictures? If write to Talya or Bhaskar. They are at Poona. Your's affly

Narayan.

असो; दुसरी गोष्ट आज अन्यत्र लिहिलेल्या चि. सीताबाईंच्या पत्रा-संबंधानें. Please ~~[illegible]~~ coax her to write. Take paper & pencil to her & be after her. I am sure she will write. My aim is to make them (all women) know something about their sisters. So, we should educate our own sisters first & then other. Make her write. Make her read; Make her spend her time in reading & writing. हें विचारलेले प्रश्न — शाळेच्या अभ्यासासंबंधानें — येथील दोन तीन आठवड्यांत देणार आहे. म्हणजे कर्वेंनाहि तें उपयोगी पडतील. सर्व लोकांना उपयोगी पडतील असे प्रश्न विचारीत जा.

मुलांच्या प्रकृतीची काळजी घे. चि. रामूला मराठी येत नसेल लिहिलेली पत्रें तुला वाचावयाला मिळाली काय? नकलावयास पाठव व उत्तर दे.

कळावे
तुझा नारायण

Letter No
24

॥ Ram ॥

Michigan University
Ann Arbor. Mich
U. S. America
7th June.

My dear
Balu

Yours of 8th may to hand. Glad you have written everything in detail. Please be writing so often. Dear Pillu akka might have come there now. If she has please tell her that I am anxious to hear about her health ~~thy~~ through the lips of her son. I wanted to write to her while she was at Kalghatgi seperately but I could not do so, owing to lack of time. I may however do the same after I receive from you about her.

पत्रांक
२५.

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिश.
यु. स्टे. अमेरिका
ता. ७-६-१६.

॥ श्रीराम ॥

चि. रामूस अनेक आशीर्वाद विशेष:-

तुझ्याकडून ८ मेरोजीं लिहिलेलें पत्र आज ओळी पोचलें. मी तुला कधीं म्हटलें कीं तूं बायकोशी गप्पा मारतोस म्हणून? ऐक बाबा — बायकोशीं गप्पा मारणें हें पाप आहे असें तुला नाहीं वाटत काय? मग मी तुला असें म्हणेन असें वाटलें तरी कसें? बरं तें असो, आतांमात्र मी तुला तुझ्याबायकोशीं गोष्टी बोलावयाला सांगणार आहे. लोकांचे परवानगीनें दीक्षण करीत असलेल्या मला माझें पूर्वींचें मत बदल करावयाचें आहे आणि तें हें कीं आपल्याकडे बायकांच्या सहाय्याशिवाय (एकही) पाऊल टाकतां पुढें टाकतां येत नाहीं. तें कसें तर पहा — आपल्या देशांत दर हजारीं ४६० मुलें निपजल्याबरोबर मरतात. ३५० मुलें पुढच्या वर्षांत मरतात व राहिलेल्या मध्यें पुढें बाकी कुणी (पांगळी) निपजतात. याचें कारण बायकांचें अज्ञान व पुरुषांचें दुर्लक्ष. आपल्या बायकांना जर चांगलें शिक्षण दिलें (इंग्रजी नव्हे तर घर व मुलें वगैरे कशी संभाळावीत याचें) तर मुलांच्या मृत्यूचें प्रमाण खचीत कमी होईल. मुलें कां मरतात, त्यांचें संरक्षण कसें करावें, मुलांची जोपासना कशी करावी, त्याला जेवण कसें वगैरे द्यावें, मुलांकरतां आपण काय करावें, घरांतील व्यवस्था कशी ठेवावी, स्वच्छतेची काळजी कशी घ्यावी वगैरे जर बायकांच्या लोकांच्या मनावर बसविलें तर फारच फायदेशीर होणार आहे. मी अमेरिकेला आलो म्हणून जर बायकोला शाळेंत व मग उद्योगी सहज लागल्या व मी आतां तुझ्या पत्नीला शिकवावयाचा निश्चय केला असें कळलें तर तूं म्हणशील व हंसशील, पण थोडा विचार कर. मी घरीं असतानाच यावर विचार केला आहे व त्याप्रमाणें तुला बोलून ही दाखविलें आहे. व त्याप्रमाणें मी कृतीही केली आहे. आतां थोडें पुढें पाऊल टाकीत आहे. यांत मला तुझें पूर्ण साहाय्य पाहिजे. आज तुझ्या पत्नीला लिहिलेलें पत्र तूं पहाशीलच. उत्तरें देण्यास उत्तेजन दे. हें ध्यानांत ठेव कीं स्त्रियांची उन्नती स्त्रियांनीच केली पाहिजे आणि म्हणून प्रथम आपल्या घरांतच प्रारंभ करणें

मंगलताई व तिची कविनी यादोघींशी जर ममत्व घेतलेंस तर बरेंच काम होणार आहे. तूं मात्र त्यांचा तिरस्कार न करतां त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजेस. नाहींतर माझे विचार माझ्या मनांतच राहतील.

चि. मंगलताईचा पुस्तकें वाचावयाचा आग्रह हे वाचिल्याकारणांनी एक मासिक पुस्तक सुरू कर असें मी तुला कितीदा तरी लिहिले पण तूं त्याबद्दल कांहीं लिहिले नाहींस किंवा इच्छा दर्शविली नाहींस. इतकें दिवस तुला अभ्यास होते, इंग्लंड होता म्हणून वेळ मिळाला नाहीं. पण आतां खचीत वेळ मिळेल व तूं पुढें लिहशील अशी आशा आहे.

असो. या रविवारी तुझें पत्र वाचून पुढें तुला उत्तर देईन. मागील पत्रांचे उत्तर दिले असशीलच. श्री. नाडगीर यांच्या घरची काय हकीकत आहे ते सविस्तर कळीव.

मी येत्या १० तारखेस हें गांव सोडून "लेक जिनवा" नामक एका गावांस जाणार आहे. तेथें यंगमेन्स ख्रिश्चन असोसिएशनची कॉन्फरन्स भरणार असून मी येथील हिंदुस्थानीचे डेलिगेट म्हणून जात आहे. पुढें कोठें जाईन हें आतांच सांगवत नाहीं. तथापि हें खरें कीं पुढील तीन महिने या ठिकाणी मी येणार नाहीं. माझा पत्ता हाच कायम राहील.

कळावें. उत्तर लवकर यावें

आपला
नारायण

पत्रनंबर
२५

लेक जिनेवा; विस्कॉनसिन
युनायटेड् स्टेट्स अमेरिका.
यंगमेन् क्रिश्चन कॉनफरन्स
श्रावण — ता१३-८-१४

॥ श्रीराम ॥

ति.रा. वडिलांस नारायणाचे दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून साष्टांगनमस्कार विज्ञापना :- आपल्याकडून किती दिवसांत तरी पत्र नाहीं. कां बरें ? विशेष पाठवावयाला वेळ मिळत नाहीं काय ? कळवावे. गेल्या आठवड्यांत दुबळीचे पत्र आले नाहीं. कां ? कळत नाहीं. ठरल्याप्रमाणे मी येथें काल रोजीं सकाळीं आलो. आन आर्बर तारीख १० ला सोडले व वाटेंत एक दिवस ग्यारी नांवाच्या एका गावांत इंदूरचे श्रीयुत शेवडे नांवाचे एक गृहस्थ असतात त्यांचा पाहुणचार घेण्यासाठीं एक राहिलो नंतर वाटेंत कांहीं तास अमेरिकेंतील नावाजलेले दुसरें शहर 'शिकागो' या मुक्कामी घालविले. आजपासून येथील कामास सुरुवात झाली आहे. येथील कामाचें वर्णन वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध करण्यांत येईल त्यावेळीं वाचावयाला मिळेलच. असो. पत्राची उत्तरें मेहरबानी करून पाठवीत असावी विनंती करतो. पत्र येथेंच आटोपतें घेतो. मुलांच्या प्रकृतीबद्दल जपत असावे. ति.गं. पिकुअक्का आजी असल्यास माझा शिरसाष्टांग नमस्कार विदित करावा नसल्यास पोंचता करावा. कळावे. आपले बालक नारायण.

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष :- कां ? गेल्या खेपेस तुझ्याकडून पत्र नाहीं. घातले नाहींस कीं घातलें असून मला पोंचले नाहीं. कदाचित घातले असल्यास मला या खेपेस दोन्ही मिळून पोंचतील, नसल्यास हिरमुसला आधींच झालो आहे. ठरल्याप्रमाणे — मागून येत त्याप्रमाणे माझा डोळा पुजेला लवावयाचा थांबला. परंतु पुन: मधून मधून लवतोच आहे. काय करावें कळत नाहीं. अर्थ सुचेल कांय ?

गेल्या खेपेस चि. सौ. सीताबाईस पत्र घातलेच आहे. ह्या खेपेस पाठीं परंतु आपण दोघें मिळून काम करण्यास प्रारंभ केला पाहिजे. तुमच्यावरच घर-कामाची जबाबदारी आहे व त्या कामांत तुम्हांला वेळ मिळणार नाहीं हेंही मला ठाऊक आहे परंतु कसें तरी करून थोडावेळ मिळवा. व अभ्यास करा.

सध्या मला ज्यास्त लिहावयाला वेळ नाहीं. कारण येथें कॉन्फरन्सच्या कामांत मी अगदीं बांधला गेलो आहे. पुढील खेपेसही वेळ होणार नाहीं. नंबर २६ चे पत्र सविस्तर खुशालीचे लिहीन. क्षमा असू दे.

नारायण.

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद

तुमच्याच खेपेला मला पत्र लिहिण्यास वेळ नाहीं हें ~~[illegible]~~ पाहून मला वाईट वाटते. २६ नंबरचे पत्रांत ज्यास्त मजकूर.

नारायण

Letter No
25

॥ Ram ॥

Lake Geneva, Y.M.C.A. Camp.
Wisconsin. U.S. America
13th June 1914

My dear Ramu

Will write you in my next.

Your's Narayan

My dear Vinayak & Balu

Will you excuse me for not writing this time. Will write you in my 27th.

Your's Narayan.

See the scenery card sent

Nana

Letter No
26

|| Ram ||

Chicago; C/o Y.M.C.A.
U.S. America
21st June 14

My dear
Ramu

I am expecting your answer to my letters written from Ann Arbor about Vinayak. I hope to read in full about it. You might come to know everything about my tour, undertaken at present by me, if you can to read dear Vahini's letter. I am thinking of spending my vacation in Gary a city in Indiana state. Govind & Nadgir are ~~at~~ in Ann Arbor & perhaps they will join the summer school. I can not do so myself.

Letter No
26

|| Ram ||

Chicago; C/o Y.M.C.A.
U.S. America
21st June 14

My dear Vinayak

Yours to hand. I received your two letters in Lake Geneva on Thursday last. Glad to hear about your good health. Be writing often. Think. Increase the power of thinking & be a man. Do as I have requested you in one of my last. Don't fail.

Chicago C/o Y.M.C.A.
U.S. America

Letter No
26

|| Ram ||

21st June 14

My dear Balu

Yours to hand. (both together). Did you read my articles in [illegible], ज्ञानप्रकाश, केसरी & विहार? Please write me what you think of those. Will they be of use to students? If not, why not? If, how?

Did you subscribe for any magazine to dear Gangutai? If, which is that?

Have you written about Nadgirs family? If not, why sir? Let me know whether Nadgirs brothers are willing to send money to their ward or not.

The picture that I am sending with this letter is of the Chicago University Observatory. This Observatory has a telescope which has 40 inch diameter lens. It is the 1st in the world. The observatory is located on the shores of Lake Geneva where the conference was held.

Your's affly
Narayan

What was your opinion about the articles ~~in~~ in [illegible] etc? How far has Gangutai advanced in her studies & ideas? Please have an eye upon her. Remember my address — although I am not in Ann Arbor — will remain the same as before. my letters will be directed to my present address.

Nothing more. Your's Narayan

Balu, You have sent your marks. They are very poor. It seems to me that you never work. Although you work you never work carefully & do not give attention. Don't do so. Devote your whole soul to the work which you undertake. I may send you some pictures soon. My B. Namaskaras to dear Pillu akka

Your's affly
Narayan.

पत्र नंबर
२६

॥ श्रीराम॥

शिकागो % Y.M.C.A.
यु. स्टे. अमेरिका.
तारीख २१-नूव्हें १४.

ति. गं. वडिलांस नारायणाचे दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून

साष्टांग नमस्कार विज्ञापना:-

आपण बहुधा जन्मस्थानाला जाण्याच्या गडबडीत असल्यामुळे विशेष पाठविलें नसेल. कांही असले तरी आपण कुशल आहांत. जन्मस्थानाचे दर्शन घेऊन आल्यानंतर तरी आपले पत्र येईल अशी इच्छा आहे. मी काल रोजीं या शहरीं आलो. हें शहर अमेरिकेतील दुसरें मोठें असून जगांत पांचवें आहे. याची जनसंख्या २५ लक्षाच असून पारीस शहराच्या बरोबरीचे आहे. जगांत लंडन हें या शहराचा १ला नंबर. न्यूयॉर्कचा दुसरा नंबर; पारीसचा तिसरा नंबर व शिकागो (हें शहर)चा चवथा नंबर लागतो. या शहराजवळ शिकागो नांवाची एक नदी असून मिशिगन नांवाच्या सरोवरावर हें शहर वसलेलें आहे. या शहरीं २१ दिवसांपूर्वी मी आलो होतो त्यावेळीं फक्त तीन तासच राहून मी पुढील गावांस निघून गेलो. स्वामी विवेकानंदाची आठवण वारंवार होऊं लागली आहे कारण याच शहरांत सर्व-धर्म-परिषद १८९३ साली झाली त्यावेळीं ते हिंदु-धर्माच्या वतीने हजर होते. शहराची रचना फारच सुंदर आहे पण शहर थोडें घाण आहे. सर्व अमेरिकेच्या मध्यभागीं हें शहर असल्यामुळे येथें व्यापार फारच मोठा होत असतो. इतर वर्णन पुढें एखादेवेळीं वर्तमानपत्रांतून पाठवावयाचा विचार.

मी 'लेक जिनेवा' नामक गावाहून मागील रविवारीं पत्र धाडलें होतें. तेथें ९ दिवस कॉन्फरन्सचे काम झाले. कॉन्फरन्सची जागा सुद्धां फारच चांगली होती. जिनेवा नामक एका लहानशा सरोवरावर एका गर्द झाडींत तंबू मारून २ हजार मुलांना उतरण्याची सोय केलेली आहे. मोठमोठे बंगले ही त्याठिकाणी बांधले असून प्रत्येक तऱ्हेची व्यवस्था फारच उत्कृष्ट ठेविलेली आहे. जेवणाची, राहण्याची व इतर व्यवस्था बरी होती. जेवावयाला तीनदा मिळे. सकाळीं ७ ते ७॥, दुपारीं १२॥ ते १ सायंकाळीं ६ ते ६॥. त्याठिकाणी मी शाकाहारी आहे असें लोकांस कळूं दिलें नाहीं. पुढें जें जिन्नस येत त्यांपैकीं हवे पाहिजेत तेवढें जिन्नस मी निवडून घेई व मांसाचा पदार्थ आला कीं पुढें ढकलीत असें. तुला नको काय म्हटल्याबरोबर मला आवडत नाहीं, किंवा पचत नाहीं अथवा भूक नाहीं म्हणून सांगत असें. निजावयाला आंथरूण पांघरूण ठेवून असें. सरोवरावर ९ दिवस काढल्यामुळें व हवाही थंड असून जेवण बरोबर वक्तशीर होत असल्यामुळें माझी प्रकृती बरीच सुधारली आहे.

एकदोन दिवसांत मी याठिकाणाहून ग्यारीला जाईन व पोटासाठीं कांहीं काम पाहीन. तेथें गेल्यावर ज्यास्त मजकूर. ति.गं. पिलुअक्कास मातोश्रीसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करा. ति.गं. मावशीची प्रकृती कशी आहे? मुलांस जपावे. आपला
नारायण

पत्र नंबर
२५

॥श्रीराम॥

शिकागो; ℅ Y.M.C.A. 166
U.S America
तारीख २५ जून १४.

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष :- तुझीं तारीख १४ व २१ मे — चीं दोन पत्रें एकदमच मला गुरुवार तारीख १८ जून १९१४ रोजीं लेक जिनेवा येथें पोंचलीं. पत्रें पाहून आनंद झाला. आपण आपल्या आजोळीं फारा दिवसांनी जाण्याच्या गडबडींत असल्यामुळें पत्रांत साहजिकच चुका असणें ~~साहजिक~~ शक्य होतें; पण गंगाबाई, शिक्षणाच्याबाबतींत केंव्हांही दुर्लक्ष करूं नये हें विसरजात आहां! तसेंच मी आज तीन महिन्यांखालीं म्हणजे तारीख ८ मार्च रोजीं विचारलेला, ता २८ मार्च व ता. १२ एप्रिल यादिवशीं विचारलेल्या तीन प्रश्नांची उत्तरेंही आपल्याला देतां येऊं नयेत हें पाहून वाईट वाटतें. अशी कोणती आपद आपल्या शिरावर येऊन पडली कीं आपल्याला एकाही प्रश्नाचें उत्तर देतां येऊं नये? बहुतेक, मामी आली म्हणून तिच्याशीं गप्पा मारण्यांत वेळ दवडजात असें दिसतें. प्रत्येक खेपेस "मला येतील तशी मी उत्तरें देते" असें आपण मला थाप देतां आहां पण पुढें पाहूं जातां एकाही प्रश्नाचें उत्तर मिळत नाहीं. असा आळशीपणा केंव्हांही उपयोगी पडत नाहीं — हें आपण कसें विसरतात? मी इतक्या दुरून लिहितो म्हणून आपण मजवर रागावणार नाहीं अशी मला उमेद आहे. परंतु, काय करणार — ~~कि~~ ज्यांच्या मनांत लिहावयाचें नसतें त्याला उगीच त्रास देऊं नये असें मला वाटतें खरें आणि असें कर म्हणून सांगण्याचाही — कोणाचाही सांगण्याचा — मला अधिकार नाहीं — पण काय करणार! मला तसें वाटत नाहीं. चि. विनायक व बाळ यांचीही तशीच प्रवृत्ती दिसते अतएव म्हणून इतःपर मी माझा वेळ तुम्हांला — कोणालाही — कसलेही प्रश्न विचारण्यांत खर्च न करण्याचें ठरविलें आहे. इतर बऱ्याच उपयुक्त कामांत मला आपला वेळ खर्च करतां येईल. चि. गं. वहिनींच्या पत्रावरून आपल्याला इतर मजकूर कळेल. सोबत एक चित्र पाठविलें आहे. तें ठेवावें. कळावें प्रेमाची वृद्धी व्हावी हीविनंती.

आपला नारायण.

शिकागो

॥श्रीराम॥

तारीख २५ जून १४.

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद विशेष :-

आपल्याला मागील खेपेस दोनच ओळी लिहिल्या. याखेपेसही मला आता लिहिता येत नाहीं. पुढच्या पत्रांत विशेष मजकूर लिहीन. छकुलीची प्रकृती कशी आहे?

कळावें. आशी:

आपला
नारायण.

Letter No
27

167

Garry; Indiana
28th June 14 / camp

University of Michigan
Ann Arbor. Mich.
U. S. America } Address

॥ Ram ॥

My dear Bapu

Yours of 25th May to hand on the 24th of June. You know I am & was very busy with my own exams and the Y.M.C.A Conferance held in Lake Geneva, Wisconsin. I was asked to go to the Conferance as a delegate of all Hindu students from Michigan State. We were 13 in all from India. Students of all nationalities from all the quarters flocked to that place. This was the 32nd Conferance I believe. As they are holding these conferances there on the perticular spot, they have erected permenant camps ~~& building~~ ~~there~~. It is a hilly place on the Lake Geneva. This lake is 9 miles long & 2½ miles wide. The coast is full of trees. It is as if a wild forest. The scenery is a beatiful one. I was there for nine days with one of my friend Mr. Kokatnur of Minnisota University. They gave us good meal three times a day regularly. We had tents. One for eight students. The Program of the Conferance was a note worthy one.

6 A.M. ~~Morn~~ Rising bell.
6-30 to 7 Morning watch. (उपासना)
7 to Breakfast
7-45 to 8-20 Bible class
8-25 to 9-20 Mission study (how to go in foreign countries like India or China & how to convert the people etc.)
9-25 to 10-25 ~~Mass~~ Assosiation meating.
10-30 to 11-30 Platform meeting.
11-35 to 12-30 Extra lectures
12-45 to Dinner.
whole after noon devonted for rest
3 to 5 Swimming lessons (in the lake)
6 to Supper. 7-15 to 8-20 Life works meeting
8-30 to 9-20 Prayer lessons.
9-35 Ready to bed
10 lights out.

On the day on which we started ~~the~~ some of the Conferance men — leaders came to us & requested to accept Christianity. We asked them to become Hindus. I learnt good many thing from the Conferance. Just near the lake — near the Camp there stands the huge building of Observatory. It belongs to the University of Chicago. The telescope therein is the larglst & biggest in the world. It has a lens; a big lens — the diameter of which is 40 inches. We saw that too.

On our way myself & Mr Kokatnur went to Chicago & spent 4 days there. We saw the Campus & some of the Departments of the University of Chicago. The campus is a big one. I think it will equal Hubli Town. This University is one of the richest in the world as it has been extended by Rockifeller, the millionair.

I came here alone on the 24th when I found your letters & a ~~tele~~cablegram from Poona. I have sent a copy of Hindusthanee Student to Tatya. I will send one to you next week.

Nothing more. Be writing always.

Yours ever affec
Narayan

V. K. Shevade
Deccan College
Poona

पत्र नंबर 169 मुक्काम:- ग्यारी; इंडियाना. यु.स्टे. अमेरिका.
२८ ॥ श्रीराम ॥ पत्ता- [illegible] चर्च. युनिव्हर्सिटी पार्क.
तारीख - २८ जून १९२४

ति.सं. वहिनीस व चि. अक्कू या उभयतांस नारायणाचे दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना:-

आपणाकडून बिलकूल हकीकत कळत नाहीं असें करणें आपल्याला चांगले दिसतें काय? खचीत तुम्हांला कदाचित चांगले दिसेल पण इतक्या दूर असलेल्या तुमच्या नारायणाला मात्र चांगले दिसत नाहीं. या बाबतीत वाईट वाटतें. मागील आठवड्यापूर्वी मी एका कॉन्फरन्सला गेलो होतो हें तुम्हांला माहीत आहेच. तेथें की नाहीं मला ख्रिस्ताव होण्याबद्दल पुष्कळ आग्रह करण्यांत आला व ते लोक माझ्यामागें पडले म्हणून मला मोठा विचार पडला आहे. तर येथें मी ख्रिस्ताव झालो तर तुम्ही मला आपल्या घरांत घ्याल की नाहीं, जेवण वाढाल की नाहीं, तुम्ही मला दूर कराल आणि मग मला अन्नाकरितां हिंडावें लागेल अशी भीती वाटल्यामुळे मी त्या लोकांना असें सांगितलें की मी माझ्या वहिनीला व [illegible] विचारतो आणि मग तुम्हांला उत्तर देतो तर तुम्ही दोघांनी काय तो याचा विचार करावा व मी ख्रिस्ती झाल्यास तुमच्याबरोबर जेवावयास बसूं द्याल की नाहीं; ~~से~~ तुम्ही बाहेर असतांना मी जर स्वयंपाक केला तर माझ्या हातचें अन्न खाल की नाहीं या सर्व गोष्टी बद्दल भरपूर खुलासेवार लिहावा. म्हणजे या लोकांची मर्जी [illegible] होऊन तरी मिळेल. तसेंच मी तेथें गेल्यावर मला प्रायश्चित्त घ्यावयास लावणार की काय हेंही कळवावें. असो माझी प्रकृती बरी आहे. येथें उन्हाळा फार आहे. फार उकडतें. जीव नकोसा होतो. मुलांच्या प्रकृती बद्दल लिहावें. कळावे, आपला ख्रिस्ताव होण्याविषयीं संमती मिळूं इच्छिणारा नम्र दीर आपला अमेरिकेंतील नारायण.

पत्र नंबर ॥ श्रीराम ॥ ग्यारी, इंडियाना
२९ तारीख २८-६-२४

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:- तुझें तारीख २८ मे रोजी लिहिलेलें नंबर २५ चें पत्र मला तारीख [illegible] जून रोजी मी शिकागोहून आल्यानंतर पोंचलें. तुझ्या [illegible] मला [illegible] तार मिळाली व त्यामुळें समाधान झालें. लोकमान्य टिळकांची [illegible] म्हणून [illegible] केलें होतें. तार पुण्याहून आली होती. [illegible] कुरकी ठेवून [illegible] रामसेवा पडली. [illegible], मी तुला तुझें मत विचारलें तर तूं [illegible] कागद लिहिलेस आणि वर मलाही असेंच आवडेल" म्हणून मोठा आग्रह. खुशी आहे - तुझ्याबद्दल विचारीन की लिहावयाचें [illegible] तें लिहिलेस त्याचा अर्थ तरी तुला कळला काय? मनु म्हणतो [illegible] गंभीरपणानें पत्रांत त्याचा उच्चार केला आहेस. मला तें पत्र वाचून जरा हंसूं आलें. [illegible]? ते मनु हा कोण हें माहीत नसतांना तूं आपलें मत ठोकून दिलेस. [illegible] म्हणतात तें असावा. "गर्भाधान म्हणजे काय" असें तूं पत्रांत लिहिलें आहेस त्याचा अर्थ काय? तो तुला तुझा कळला आहे काय? मला नाहीं वाटत की तुला आणि त्याची कल्पना झाली असेल असो. आतां पुन: त्यांच्याकडून [illegible] लिहून घेईन. त्यांतही किती मुली. [illegible] संबंध [illegible] नाहीं. त्याचा अर्थही [illegible] नाहीं. त्या लोकांचे ही त्यांत कांहीं मुली आहेत हें पाहावें?

आणि तुझ्या अक्षरांत सुद्धां किती फेर झाला! यापत्रांत एकून ५० मुद्दे लिहिल्याचे मी प्रश्न गेले म्हणजे ते पत्र तुला दाखवीलच. मजजवळ मराठी पत्रें जतन करून ठेविलेली आहेत हें तुला माहीत आहेच.

गंगूताई "अमेरिकेतील स्त्रियांचा व्यायाम व व्यायामशाळा" हा लेख प्रकाशांतील लेख तुला वाचावयाला मिळाला कीं नाहीं हें मला लिहिलें नाहींस. ज्ञानप्रकाश तुझ्याकडे येतो ना? लोकशिक्षणांतील लेख वाचावयाला मिळतो ना? ज्ञानप्रकाश, केसरी, विहार वगैरे पत्रें यांतील लेख वाचावयाला मिळतो ना? तुला अनेकांचे लेख (माझे) वाचावयाला मिळतात हें तें लिहीत जा. व लेख स्वतः वाचून गंगूताईला व पिंकू अक्काला वाचून दाखवून त्यांची मतें काय पडतात तें कळवीत जा. विसरूं नकोस. तुमची मतें मला लिहिलीत म्हणजे ज्यास्त उत्तेजन दिल्याप्रमाणें होईल. कांहीं मुद्दे असल्यास मला कळवीत जा; कारण मला लोक लिहितां येत नाहीं हें तुला माहीत आहेच. पुन्हां वारंवार सूचना करीत जा.

यापत्रासोबत मी माझी छबी ठेविली आहे. ती बरी आली नाहीं अजून कांहीं दिवसांनी दुसरी पाठवून देईन. दुसरी प्रत हरीभाऊकरतां आहे.

कळावें आपला प्रिय नारायण

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद विशेष:-

नंबर ५८ च्या पत्रांत सविस्तर हकीकत ने पाठविली असें लिहिलें होतें. अजून तिकडे उत्तर आलें आहे. पण सविस्तर तें काय लिहिणार? येऊन जाऊन पुन: आपलें रडगाणें गावयाचें, झालें. हिंदुस्थानची प्रजा ३० कोट आहे. यांतील कोट ओंजळभर किती शिक्षित याचा जर मी विचार करूं लागलो तर मला वाटतें २८॥ कोट लोक निरुपयोगी निरक्षर व बाकीचे १॥ कोट लोक अर्धवट शिक्षित असतील. या १॥ कोट लोकांत इंग्रज लोक, मुसलमान, ताबीलवाज लोक विशेष येतात. तेव्हां बाकीची प्रजा आहे कीं? याचा विचार केला पाहिजे. असा विचार करतांना त्याला होत वाटतो आढळून येतात. ती होतीं बालविवाह व स्त्रियांचें अज्ञान. बालविवाहामुळें मुलीस १३-१४ वर्षांतच आई-मातृपदास जाते व मुलगा १८ वर्षांतच पितृपदारूढ होतो. या वयांत मुलीला आपला संसार आपल्याला करतां येत नसतो तोंच तिच्या माथीं एक बालक तयार होऊन बसतें. मुलीचीच जेथें वाढ व्हावी तशी होत नाहीं. मग तिच्या मुलाची वाढ कशी व्हावी. तसेंच मुलाचें. मुलगा २४-२५ वर्षे होईतोंपर्यंत तो बिलकूल वयांत येत नाहीं आणि तरी त्याला जगाच्या गोष्टी कळत नाहींत. असें असतां अशा अपक्व माता-पित्यांपासून झालेल्या मुलांची प्रकृति किती असावी? दुसरें अशिक्षित अज्ञानी व गरीब असल्यामुळें तिला पोराची व्यवस्था कशी राखावी हेंच कळत नाहीं. मुलीचें १३-१४ तें वय काय आणि तिच्या उदरीं एक मूल व्हावं लागतें तें काय? या वयांत या मुलीची शरीरवृद्धी झालेली नसते. या मुलीचे सगळे दांत सुद्धां आलेले नसतात आणि पहावें तों आई झालेली असते. सीताबाई, याचें एक उदाहरण तुला सांगतो — अगदीं अलिकडे मी घरीं असतांना हॉस्पिटल हून कांहीं मंडळी पाहुणे म्हणून आली. त्यांत एक १२ ते १३ वर्षांची बावरी लेकीं एक मुलगी होती. ती दिसावयाला उंचीनें पण तोंडावरून तर कोवळेपणा गेला नव्हता, पण त्या मुलीच्याकडे पाहून एक रोगी मूल होतें. मला वाटलें हें तिचें भावंड असेल. पण पाहतांक्षणीं असें कळलें कीं तें मूल तिचेंच असून ती त्याची आई आहे. मी मनांत म्हटलें शाबास त्या मुलाची कीं जो एवढ्या लवकर बाप झाला. सर्वीं आमच्याकडे हळदी व सायंकाळी जेवावयाला बसावयाची वेळ आली. तेव्हां बाईनीं तुम्हां सर्वांना हांका मारल्या. ही मुलगी यावेळीं माजघरांत निजली होती व जवळच तिचें मूल खेळत बसलें होतें. कांहीं वेळानें तें मूल रडूं लागलें. उत्सवाची ठिकाणच्याचा व लोक गप्प करण्याचा बराच प्रयत्न केला. पण, त्याचा उपयोग झाला नाहीं. त्या मुलाची आईही पण बराच वेळ जागी झाली नाहीं. शेवटीं त्या मुलीच्या वेळीं कोणीसें हलविलें त्यावेळीं ती उठली आणि त्या मुलाला निजवावयास सुरुवात केली. मी बाजूच्या असल्यामुळें तेथें न ~~[illegible]~~ उभा राहून हा प्रकार पहात होतो. शेवटीं त्या मातृपदास पोंचलेल्या पोरीची कींव केल्याशिवाय मला राहवलें नाहीं. अशा वयांत त्या बालकाचें काय बरें सोय पुरविले जाणार?

सांगण्याचा मुद्दा हा कीं हे लोक इतके सुंदर आहेत. याचें कारण काय तर ह्यांची जोपासना. त्यांस मातृपितृपद लवकर येत नाहीं. तसेंच शरीरसंपत्तीबद्दल. याचर पुढील खेपेस लिहीन. तिघांनीं जोर धरावें हा आशीर्वाद

आपला बंधू नारायण

Letter No
27

‖ Ram ‖

Gary; Indiana
28th June 19

University address.
Michigan; Ann Arbor.

My dear Vinayak

Yours to hand. Please explain Sitabais letter to all. Press Sitā bai to write. The reason why I have begun to write that way is to let know our family members every thing about the world & make them educated from all the sides. They should know what world is & what the people are doing. They should at the same time have a comparative knowledge of the world. The reason why I press you to oblige

आणि त्याची किंमत किती हें ठरवावी आपण? लांब कशाला मी माझें स्वतः
चेंच उदाहरण देऊन तुम्हीं स्वाधीं करतो. माझें आई बाप आणि धार्मिकनीति
सनातनियांच्या रीतिरिवाजा प्रमाणें त्यांनी मुलगी आणली, ती अगदीं अशिक्षित
निपजलो आहोत ; बरें, बालविवाहापासून मुलें केवळ अशक्त बनतात
असें म्हणावें तर तसेंही नाहीं. त्यांपासून किती तोटे होतात हें थोडक्यांत
सांगतो हें ध्यानांत ठेव — प्रजा तेजोहीन, कुरूप, मंदमती, आळशी,
आडमुठी, चिरकिरी अशी निपजते. हें सर्व बालवयानें म्हणून बोलतो आहे
असें नव्हे तर हें अक्षरशः खरें आहे. आपल्या हिंदुस्थानातील पूर्वीचे
लोक अगदी सुंदर होते पण सध्यां येतां येतां अगदीं हीनदीन बनत
चालले आहेत. हें सिद्धही करता, दाखविता येईल. अमेरिकेतील लोक व
विलायती इतक्या सुंदर आहेत कीं त्यांच्या [illegible] वैकुंठ आठवतां
येणार नाहीं. त्यांचा रंग पांढरा आहे म्हणून मी त्यांस सुस्वरूप म्हणतो
असें नव्हे तर त्यांच्यात ~~[illegible]~~ गुणही तसा असतो. मी लंडनला ज्यावेळीं
उतरलो तेव्हां मला असें वाटलें कीं आपल्या पुराणांतरी अप्सरा म्हणून
ज्यांना म्हणतात त्याच येथें वर नसतील ना! नंदनवनांत अप्सरा असतात असें आपण वाचलेलें आहे. अर्थात इंग्लंड म्हणजे पृथ्वीचें
नंदनवन असावें असें वाटलें. तें कसें तर ~~[illegible]~~ नंदनवन
या शब्दांत नंदन व वन असे दोन शब्द आहेत. कालांतरानें यातील
शब्दां पैकीं वन हा शब्द वगळला असावा व नंतर राहिला फक्त 'नंदन'
हा शब्द. येतां येतां बोलण्याच्या ओघांत याचें लंडन व इंग्लंड असें
नाव आलें असावें असें वाटलें. —— (उपहासानें)

Silabai to write me is that I want her to be
off with shy & improve her hand-writing & thought.
I want all our members to think over a point keenly
& discuss the subject openly & with open heart.
We should give scope to our family members to
mix with each other. Our women lack in this. We
should make them to take the responsibilities upon
their shoulders. They should stick to the Combined
family system. For which education is quite necess
It is therefore I have a mind to correspond with
every soul at home. Please explain them & write

Your's affly Narayan

Letter No
27

171

Gary; Indiana
28th June '14

4 Ram 4

University of Michigan
Ann Arbor - Mich
U S America
} Addr

My dear
Rama

Nothing from you this time. I know you have not taken any contract of writing to me often. But I think it is my duty to write to you, though you care very little for my letters. I know you are busy, but remember me to be thousand times busy than you. Still I spare my 1/2 day & 1/2 night for correspondence. Alright sir; Rama, is any one of your Company going to Panama Exposition? Ask your Trustees to go there. What are they doing of the hoard of money they have collected? Certainly, it's not my business, so excuse me. Nothing more. Your's affly

Narayan.

My dear Balu

Your's to hand. Glad to read. Thanks! for your hand writing. Balu, improve a little y articles from Satya? Did you give them to [illegible] [illegible]? What Mr. Bindwas says? Did you read all my articles? Did you read all the [illegible]! How did you like them?

When do you get up? When do you go to bed? Write. I was at Chicago in the last week. I am here now for three months more. Address is the same. Nothing more.

my B. Namaskaras to dear Pilluakka

Yours ever affec.
Narayan

Letter No
28

173

॥ Ram ॥

Gary; Indiana
5th July 1914

University of Michigan
Ann Arbor; Mich
U. S. America
Address

my dear
Bapu

Your postal card of 5th may to hand day before yesterday. Glad, you have kept up to a regular correspondance. Your regularity will force me to make time to write you in detail as I do unto others. I wish I could spare time for my people & write whatever they ask for. But sorry I have no time. However I shall never fail to write you every week at least few lines but you shall have to encourage me by writing in return. Some times I feel like writing on some points but when I see that they will not be of any use to you I leave that idea. It goes very hard with me to select the subject to write upon. So, I ask you to select any subject you want to & ask me to write upon it. Then I will gather the necessary information I require & send you all collected. That will not only save my troubles of selecting the subject but will give me some scope of entering into other subjects beyond my limited vision. I shall be benefitted there by. Please consider & write me.

The Independance of America was declared on the 4th of July 1776. Since then this day is celebrated as a National holiday. All the offices, schools & universities, factories & other working places are closed to the public by law. In the 19th century they were celebrating this day by spending their time in military parades & grand fireworks & some other jokes & funs having no sense in them (Just as દિવાળી in India) But now they have changed the system for good & they spend there time in parades, music, moving pictures to arouse patriotism, lectures & other exhibitions. They have stopped the display of fire works. Still however the children are allowed to play with the Chinese little fire cracks (ફટાકડા). I had a fine time yesterday. Went & saw there celebration. The whole city was decorated with nothing but flags — a sample of which I have sent for you. Men & woman, boys & girls had these flags even in their hats & round there body. They are so very fond of their flag. Certainly it costs them good many lives & many a million dollars. Why should they not love it? Why should we be jealous for that? Water-melons & lemon drink are the chief articles of their enjoyment today. They had good many shows just like our own — but a slightly different.

As promised I am sending the Hindusthanee Studen to your address today. There in you will find a marathi article published in ज्ञानप्रकाश — under the heading "अमेरिकेतील स्त्रियांचा व्यायाम व व्यायामशाळा". It was meant for dear Gangutai. But I hear that ~~she~~ no body has sent it to her as yet. Therefore please send this cutting to her at once. Don't keep it with you after you read.

Be sure you will receive every week from me. So be going to Tatya on every Saturday eve & take your letter & write an answer to it there on the spot, so that they will send it to me by the next mail. If you please be sending some books to dear Gangutai.

Nothing more for the present. Be writing

Af mo's ever aff

Narayan

Letter NO
28

"Ram"

Gary; Indiana
5th july 14

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America } Address

My dear Ramu

Nothing from you this time. Perhaps you might be busy & hence I don't wish to trouble you. Please let me know how you are keeping good health & how is your pretty little child — not son but girl — a female but not male child. What about your partner? Is Vishnu Tembe going to Europe; If when & to what particular part of the continent? Please don't forget to mention that to me. Are you dealing with any firm in America? If, why don't you give me some work on behalf of you? I shall be glad to help you up in that matter. By the by Is any one going to come here for the Panama Exposition in 1915? If, who is that? May I be of any service to him or her, or them? I, together with my "Maharashtra mandal", am ready to help any man from Hindusthan if he comes over here for any purpose. Please give information & my address to those who desire to do so. Are you subscribing to Lok-shikshan & Chitra maya jagattā? If, why don't you take them home for your brothers & sisters? Don't you wish that they should read those? Don't be too selfish always. Pardon me if I say anything to a 'Shetti' like you but Ramu, am I not older than you? You respect me as sir, as I am older than you. So, I command you not to be angry but do that what I tell you. More in my next. Yours affectionate Narayan.

ति. सं. वहिनी व चि. अक्का यांस नारायणाचे दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष:- पाण्यांत पोहावयास पडलेल्या मनुष्याला जर कुठें वाटेत बुडण्याचा प्रसंग आला तर तो तेथून [illegible] किनाऱ्याचा प्रयत्न करील. अशा प्राणसंकटाच्या प्रसंगीं त्यास सहाय्य मिळालें तर त्याला जितका आनंद होतो तितका किंवा [illegible] वेळी [illegible] घरीं [illegible] लिहिण्याचा [illegible] जितका आनंद होतो तितका अगर त्याहीपेक्षां ज्यास्ती आज आपले आणि वहिनींचें पत्र पाहून आनंद झाला. [illegible] ओळी पाठवत जाल तर फार बरें होईल. असें नाहीं आपणाला वाटत? [illegible] आहे. [illegible] पण पुन: सुरू झाला. तो कांहीं केल्या थांबत नाहीं. अर्थात [illegible] करण्याची जरूर नाहीं. वहिनीनाही स्वच्छ सांगा! ठीक. आज मी आपणाला एक प्रश्न करतो. आपण पाणी कोणत्या रीतीने पीतां हीं कळवाल? [illegible] रीतीने पाण्याला [illegible] आहेत [illegible] अनेक दृष्टीने पहातां तें पाणी फार खराब आहे. दिसावयाला जरी तें चांगले दिसले तरी तें — त्यांत बारीक जंतू [illegible] असल्यामुळे खराब आहे. पाण्याची परीक्षा करणारे डॉक्टर मुंबईतील [illegible] सरकारी डॉक्टरांशिवाय [illegible] मुंबई इलाख्यांत कोणी नाहीं हें मला माहीत आहे. अर्थात त्याची परीक्षा होणें शक्य नाहीं. [illegible] पाणी, गाळून तापवून आणि [illegible] पीत जा आणि [illegible]. [illegible] घरगुती गोष्टी [illegible] हातीं असतात. यांत [illegible] कांहीं करावयाचें नसतें. आज [illegible] मी [illegible] 'पाणी स्वच्छ कां असावें?' या विषयावर एक लेख लिहून पाठविला आहे. तो पुढच्या अंकांत ([illegible]) छापला जाईल. तो आपण मनन पूर्वक वाचावा व त्याप्रमाणे [illegible] करावें. त्यांत मी पाणी [illegible] असतें [illegible] सर्व विचार केला आहे. तो आपल्याला [illegible]. [illegible] मी [illegible] लिहीन. पाणी मात्र गाळून, तापवून, निववून व मग पीत जा. [illegible] नाहीं.
कळावे आपला नम्र नारायण.

शिकागो; इलिनॉय
पत्र नंबर श्रीराम ता २ ऑगस्ट ५४
३२ मिशिगन [illegible] पत्ता.

चि. बाळू यांस तुझें नंबर २८ चे पत्र पोंचले, मजकूर कळला.

खरूज ज्यास्त झालेली ऐकून वाईट वाटले. [illegible] पासून [illegible] औषध उपाय नाहीं. [illegible] Balsam of Peru या औषधाचा उपयोग [illegible] करावा. [illegible] मी लिहीले आहे. त्याच्याकडून कांहींतरी [illegible] पहावें.

Letter No.
32

॥ Ram ॥

~~Gary~~ 2nd Aug '14 203
Chicago, Ill.
U. of Michigan

My dear Ramu

Yours of 2-7-14 to hand on 1-8-14 at Gary. For some private business I have come to Chicago. Will return perhaps tomorrow to Gary. Glad to hear that you have already settled about Vinayak. I wrote you about his future with an intention to set you at thought about him from now. Days are very hard & a man is obliged to take precautionary step. You might have learnt everything about Nadgir by this time & it is no wonder why his brother is doing like that. I request you to inform me every now & then about his movements & if possible to enquire in to his correspondance. I leave it to you.

Yours
Narayan

My dear Vinayak

Very sorry to see that you are again suffering from the bubo". I don't know what it is. Such "buboes" are due to impure blood. So try always to keep yourselves clean both internally & externally. I am sure you would not be troubled in the least if you do so. Read the printed paper I have sent today for Dileep & Gangutai.

Narayan

आमांतील. नाईकांचें पत्र पाठवतां ना? त्यांत माझी खुशाली कळवावी. आपण कृष्णाला घेऊन वडुथ व्यायामास जात असालच. चि. गोविंदाची प्रकृति व्यायामानें दृढ असेल काय? शिवराम बरा आहे ना?

कळावे
आपला
नारायण

चि. विपीन यांस :- तुझी प्रकृती बरी आहे ना? अरविंद व इंदुमती यांना सडकून मारतोस कीं नाहीं? लिहीं. नारायण.

पत्र नंबर ३२ Poona 7/9 Public 10/9
Recd 10/9

॥ श्रीराम ॥

शिकागो; इलिनॉय;
ता. २ ऑगस्ट. १४

मिशिगन विश्वविद्यालय
अॅन् आर्बर. मिच.
यु. स्टे. अमेरिका.

2004

श्रीयुत रा. रा. भाऊ नारायणराव यांस सप्रेम आलिंगन.

तुझें तारीख २ जुलैचें पत्र ग्यारीस मिळालें. मी या ठिकाणीं कांहीं खाजगी कामाकरितां आलो आहे. उद्यां परत ग्यारीस जाईन. माझ्या नंबर २८ च्या पत्राचें उत्तर उद्यां येणार आहे. पहावें काय लिहिलें आहे तें.

चि. सौ. बिंधूकडून बिलकूल उत्तर नाहीं असें कां? ती कोठें आहे? तूं इकडे पाठवण्याच्या ऐवजी तिची तूं व्यवस्था कशी करणार? तिला कोठें ठेवशील? तुझ्या जागेकडे तिला त्रास होईल काय? कष्ट नाहीं पडत तिला माहेरी ठेवशील काय? विनाकारण तेथें जाणार नाहीं. म्हणजे करणार? आतां मी तुला गंगूताईकडे ठेवण्याबद्दल लिहिलें आहे. तसें करण्याचा प्रयत्न कर. तसें तुझ्या नाशिकच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें अगर गुरु ओकांच्याकडे. हा विचार कर — तिचे हाल होतील असें मात्र वर्तन करूं नको.

तूं डुबळीकडे गेल्यास चि. गंगूताईबद्दल प्रयत्न कर - तो असा:- इच्छा पुढील प्रमाणे: पतीना तूं विचार कीं गंगूताईला पुण्याच्या पाठवण्याच्या जोरदार आहेत कां? पुण्यास अनाथ बालिकाश्रमांत तिची चांगली व्यवस्था केली जाईल. त्यांना असेंही सांगावें कीं गंगूताई बरोबर चि. सौ. बिंधूही राहील. व दोघीही शिक्षकांच्या हातानें अभ्यास करतील. अनाथ बालिकाश्रम पसंत नसल्यास सेवासदन अगर ट्रेनिंग कॉलेज. तेंही पसंत नसल्यास तळेगांवास गुरु ओकांकडे खाजगी रीतीनें. आपलें मत काय आहे हें कळवावें. त्यांचें म्हणतील हें तर ठीकच. तेंही न पटल्यास विचार; पहा काय म्हणतात तो. त्यानें विचार किती प्रगल्भ आहेत यांची परीक्षा तर होईल. पाठवावयास सर्व जण कबूल झाले तर त्यांची तूं व्यवस्था कर, व अनाथ बालिकाश्रमांत पाठवून दे. कसें? तुला कसें वाटतें?

डुबळीस गेल्यास तुझ्या पत्नीच्या व चि. गंगूताईच्या एक निराळा फोटो काढून घे. पुढील प्रमाणें तुला हे कामें करावे लागतील हें ध्यानांत ठेव. अर्धवट कोवळ्या अट्टाहासी व अशिक्षित लोकांशी तुला वागावें लागेल. त्या दोघींचा, चि. सौ. बिंधूबाईचा व तात्याच्या बायकोचा असे चार निराळे

205

फोटो मला पाहिजे आहेत. सर्व मिळविलेले असावेत. (एकत्र असूं नयेत.

श्रीयुत ओक यांनी पैशाबद्दल जें विचारलें त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आभारी आहे. मी स्वतः त्यांचा लेखक नाहीं. व लेखक हें नांवही मला शोभत नाहीं. माझे लेख हे केवळ मराठी भाषेंतल्या ४थ्या दर्जाच्या पुस्तकांत्या निबंधापेक्षांही यांमध्ये अधिक असें मला वाटत नाहीं. अर्थात् बाजारांत त्याला किंमत येत नाहीं. तशांतून लोकशिक्षणकार्याला सर्वस्वी वाहिलेल्या मासिकांतून एक दमडीही मी घेऊं इच्छित नाहीं. व माझे निबंध — त्यांस लेख असें नांव दिल्यास — मी विकूं इच्छित नाहीं. मी हिंदू आहे, मी सनातनधर्मी आहे, सनातनधर्माची आज्ञा मला शिरसावंद्य करण्याची आहे. मला त्या आज्ञेप्रमाणे माझ्या जवळ असलेली ~~थो~~ थोडी विद्या ती मी बिलकुल विकूं इच्छित नाहीं. श्रीयुत ओकांना आपण तसें स्पष्ट सांगावें अगर हें पत्र वाचून दाखवावें. मला पैसे देण्याचा त्यांना जर कांहीं आग्रह असेल तर त्यांनी त्याच पैशांत लोकशिक्षणांत आणखी सुधारणा करावी. एकाद्या अंकांत लोकशिक्षणांत एखाद दुसरा फोटो देण्यास सुरुवात करावी. अगर एखाद दुसरें पुस्तक काढून फुकट वाटावें. अथवा एखाद्या अगदीं गरीब विद्यार्थ्याला फी, पुस्तकें म्हणून ते पैसे द्यावेत. मला पैशांची वाण नाहीं कारण मी आश्रमांत राहतो आहे व केव्हांही मला पैसे मिळतील. त्यांनी आमच्यावर प्रेम ठेवलें म्हणजे झालें. लोकशिक्षणाच्या जर जनतेचे अधिक शुद्ध करण्यास अधिक लागले तर इतर सवड लेख हळूहळू पाठवीन.

~~[illegible]~~. चि. शंकरची प्रकृति चांगली. (एकदम बरें वाटते.

कळावें. लोभाचे असावा.

आपला
नारायण

पत्र नं. ४१
३२

208

॥ श्रीराम ॥

ग्यानी, तारीख ८ ऑगस्ट १४.
सिव्हिल लाईन्स

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:-

गंगूताई तुझें तारीख ८ गुरुवारोजीं लिहिलेलें मला दुसरें पत्र पोंचलें. वाचून समजलें. येत नाहीं म्हणून रडूं नको. असें म्हणणें समजतें येतें. सध्या पत्र लिहावयाला फारसा वेळ नाहीं म्हणून विशेष कांहीं लिहित नाहीं तरी तूर्त जगांत चाललेल्या गोष्टींची थोडी माहिती देत आहे, ती वाच.

जर्मनी व ऑस्ट्रिया हंगेरी या दोन राष्ट्रांविरुद्ध एकजात सर्वजण भांडत आहे. या युद्धांत बायकाही गेल्या असून त्यांच्यापासून फार फायदा होत आहे असें कळतें. आमच्या इकडच्या प्रमाणें त्या बायका घरांत बसत नाहींत. आमच्या बायकांना घराबाहेर जावयाला भीती वाटते. असो.

या युद्धांतल्या राष्ट्रांतील युद्धाला कारण दुसरें कोणतेंही असलें तरी कौरव पांडवा प्रमाणें निव्वळ भाऊबंदकी हेंच मुख्य कारण आहे. भाऊबंदकी नातेवाईक कशी जागृत होते हें या युद्धावरून चांगलें कळून येईल. इंग्लंड, जर्मनी व रशिया ही तीन राष्ट्रें चालविणारे राजे आप्त आहेत. हे तीनही राजे इंग्लंडच्या व्हिक्टोरिया राणीचे नातू. पैकीं इंग्लंड व जर्मनीचे राजे हे मुलाचे मुलगे व रशियाच्या राजा हा मुलीचा मुलगा. म्हणजे रामू व शंकर किंवा बाळू यांचेमध्यें जें नातें आहे तें नातें इंग्लंड व जर्मनीच्या राजाचें आहे व तुला जर एखादी आत्या असती तर तिच्या मुलाचें व रामूचें जें नातें झालें असतें तेंच या दोन राजांचें व रशियाच्या राजाचें आहे. पुन: रशियाची सध्यांची राणी जी आहे ती इंग्लंडच्या राजाची बहीण आहे. यावरून पुरे म्हणजे झालें. ही तीनही राष्ट्रें अतिशय बलाढ्य असून एकमेकांविरुद्ध भांडत आहेत. व त्यांत भयंकर वैमनस्य उत्पन्न झालें आहे. रशिया व इंग्लंड व त्यांच्या सहाय्यार्थ इतर आणखी कांहीं राष्ट्रें हीं एका बाजूला व जर्मनी आणि दुसरें एक राष्ट्र एका बाजूला. कोणता भाऊ कोणाला जिंकतो तें पहावयाचें आहे. कौरव पांडवांच्या युद्धांत एकूण १८ अक्षौहिणी (म्हणजे [illegible]) सैन्य होतें. येथें फक्त एकेका राष्ट्राजवळ त्याच्या तिप्पट सैन्य लढण्यास तयार आहे. उदाहरणार्थ जर्मनीजवळ ७० लक्ष, रशियाजवळ

६० डिग्री, सकाळी उकाडा ५० डिग्री व रात्रींजवळ सर्व मिळून ५०-६० डिग्री असें थंड आहे. यावरून अंदाज दिसून येतें पहा.

तुम्हां सर्वांना ही हकीकत कळवावी म्हणून मुद्दाम लिहिले आहे. विनायक, बाळू, शंकर किंवा रामू ओळखीसाठी त्यासही माहिती विचारल्यास तें सांगतील.

अमेरिकेच्या अध्यक्षाची — म्हणजे [illegible] — बायको परवां मेली. म्हणून सर्व अमेरिका आज तीन दिवस सुतकांत असून आणखी दोन दिवस सुतकी राहील. पुढें तिचे शव समारंभाने पुरण्यांत येईल. गोरे लोक आपल्या रिवाजाप्रमाणे त्याच दिवशीं मूठमाती देत नाहीत. त्याचा तीनचार दिवस किंवा ज्यास्त ठेवतात. ~~[illegible]~~ व तें शव कुजूं नये म्हणून मेल्याबरोबर त्यांत एक तेहेल औषध, मसाली भरून ~~त्यांत~~ घालतात. अलीकडे कित्येक लोक आपली मढी जाळतात.

अस्तु. पुढील खेपेस ज्यास्त. तुझा नारायण

चि. सौ. सीताबाईंस अनेक आशीर्वाद.

बाळूताईचा मजकूर अर्थात पत्राबरोबर. मी आजच्या ज्याचा पुढील खेपेस लिहीन.

आपला नारायण

ति. गं. वहिनी व विठू अक्का नारायणाचे दोघींस जोडून त्रिवार मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंति विशेष:
आपला आशीर्वाद पोंचला. माझा नमस्कार [illegible] कळवावा.

आपला
नारायण

Letter No
33

"Ram" Gary. 9th Aug '14

Dear Ramu
Your's to hand.

more in my next.

Your's Narayan

Letter No
33

Ram Gary 9th Aug '14

Dear
Vinayak
Your's to hand

more my next.

Your's affly
Narayan

Letter No
33

"Ram" Gary; 9th Aug '14

Dear Balu Your's to hand together with Mr. Dhongadi. My B.C. to him. Your questions will be answered in my next.

Your's Narayan

Be always reading the news of the European war.

Be always reading the news of European War.

Be always reading the news of the European war.

Be always reading the news of European war.

208

Gary Indiana
9th aug '14

Letter No
33

"Ram"

Michigan University
Ann Arbor, Mich
U. S. A.

My dear Bapu

Nothing from you. Why so?
You might have been disappointed
for 2 or 3 times. I know. But I
am sure you are writing me now-a-days. Are you receiving my letters?

More in my next.

Yours affly
Narayan

209

Maharashtra Mandal
American Section

A. M. GURJAR
President
V. Y. SHEWADE
Sec'y-Treas.

पत्रनंबर
३४

प्रकृती बरी आहे

शिविगाव-मार्ग पत्ता
सिकर; इंडियाना
तारीख १५ आ /1914

ति. गं. वहिनीस व चि. कुमार नारायणाचे दोन्ही कर जोडून शिरसा चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना:-

आपणाकडून यरखेपेस पत्रें आली नाहीत असा [illegible] पत्रद्वारे होय, कदाचित् उद्यां लिहतील. सध्यां मी एका खेडेगांवीं असून पुढील आठवड्यांत मी दुसरीकडे जाणार आहे तथून पत्र धाडीन. पत्रें वेळेवर न मिळाल्यामुळें (पुष्कळ मिळणार नाहीत) काळजी करूं नये. तुमच्या प्रकृतीस जपत असावे कळावे आपला नारायण.

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:- अलीकडे बोटी फारच उशीरा येत असल्यामुळें आपली पत्रें इथं वेळेवर मिळत नाहीत. म[illegible] आपणापाशी मिळणार नाहीत तरी काळजी करूं नये. नेहमी प्रमाणे मी पत्रें पाठवीन पण जास्त मजकूर लिहिणार नाहीं कारण पत्रें मिळतील की नाहीं हें संभवत नाहीं. आज पावणे दोन महिने मी ह्या गांवीं राहत असे तें गांव सोडून पुढील आठवड्यांत दुसऱ्या एका गांवीं जाणार आहे बहुधा तेथें एखादे वर्ष राहीन. आता आर्विस जाणार नाहीं. अर्थात् जरा अडचण तो पुढील खेपेस कळवीन. तुझा [illegible] पाठ होय. पुस्तकें वाचीत जा. व [illegible] करण्याकरतां मनाचा दृढ निश्चय कर हीच विनंती
तुझा नारायण.

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद विशेष:- आपणाकडून यरखेपेस पत्र पाठवायाचा पाहिजे होते. परंतु आपली ओढवर सवड नाहीं तो. मी एका खेडेगांवीं कांहीं काळ निवांत आहे असल्यामुळें आपणाकडे ~~[illegible]~~ हा विषय सुरूं करतां येत नाहीं पुढें लिहीन. उत्तर यावें. आपला नारायण.

My dear Vinayak & Balu

Nothing from you. More after I find time.

Yours affly
Narayan.

My dear Ramu

Too busy. Excuse.

Yours affly
Narayan

210

श्रीयुत [illegible] [illegible] अर्जदारास
ब्रिटिश म्यु. ८६ [illegible]. पेठ [illegible],
[illegible] प्र. [illegible].

चि. [illegible] [illegible] [illegible]
ब्रिटिश म्यु. ८६ [illegible].

Limaye.
Send your letters next week
i.e. 25th also here. Don't fail
Bhaskar.

पत्र नंबर 211
३५ व ३६

॥ श्रीराम ॥

म्याडिसन्, विसकॉन्सिन्.
तारीख २८ ऑ '१४.
[illegible] पत्र.

चि. गंगूताईस नारायणाचे प्रेमपूर्वक आशीर्वाद विशेष:-

तुमचीं तारीख १९ व २२ जुलै नंबर ३२ व ३३ची दोन पत्रें मला एकदम मिळाली. ३४ नंबरचे पत्र मागील आठवड्यात मिळावयास पाहिजे होते पण उशीरामुळे मिळाले नाहीं. माझीं पत्रेंही तुम्हांला उशीरा मिळत असतील, नव्हे? मिळत नसल्याबद्दल काळजी नको.

मी हल्लीं म्याडिसन् नावच्या एका गावांत असून उद्या उत्तरेकडे असलेल्या मिनियापोलिस नावच्या शहराप्रत जाणार आहे. म्याडिसन् हें एक टुमदार शहर असून येथेंही एक विश्वविद्यालय आहे. हे एका टेकडीवर वसवलेले असून त्याच्या पायथ्याशीं एक रम्य सरोवर असल्यामुळें त्यास उत्कृष्ट शोभा आली आहे. या विश्वविद्यालयांत पाहण्याजोगें म्हणजे एक पुस्तकालय आहे. पुस्तकांची संख्या जवळ जवळ १५ लक्ष असून इमारत पांढऱ्या दगडाची आहे. असेंच [illegible] दुसरे पुस्तकालय न्यूयॉर्कला मला पहावयास मिळाले.

"एक जिनेव्हाचा [illegible] मिळून गेला होता काय?" असा तूं प्रश्न केलास. त्याचें उत्तर "नाहीं" असें आहे. माझे दोघेही सांथीदार आता [illegible] शहरात असून शाळा सुरी [illegible] मी एकटाच हिंडत आहे. मिनियापोलिसला गेलो म्हणजे त्याच ठिकाणी शाळेत जाण्याचा करण्याचा बेत आहे. पहावें काय होतें तें. असें झाले म्हणजे अर्थात त्या दोघांची बरेच महिने गांठ पडणार नाहीं कारण आता [illegible]हून तेथें जावयाला ५० रुपये पडतात.

अलीकडे माझ्या प्रकृतींत पुन: फरक झाला आहे. हल्लीं [illegible] नाहींसे झाले आहे. वजन पुष्कळच कमी झाले आहे. त्याचें कारण प्रवास व उन्हाळा. थंडीमध्यें

Nos 35 & 36 212

Madison
Wisconsin
~~[illegible]~~
Michigan address.

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

Dated 28th Aug 1914

To My dear Ramu

Sir, Learnt about your departure to Bombay & Poona. Glad you are having a tour. I am doing well & hope the same with you all.

Yours affly
Narayan

४

असल्याने तुझा [illegible] आहे. फार काय लिहूं? तूं अलीकडे कोणकोणती पुस्तकें वाचतीस; त्याची एक यादी पाठीव. पाठवशील काय? पुस्तकें तुला कोण पाठवून देतो? नवीन कांहीं पुस्तकें वाचावयास मिळाली आहेत? कळीव.

चि. अरविंद व विपीन व चि. छकुली यांची प्रकृती बरी आहे ना?

ति. गं. वहिनी व [illegible] यांस माझा [illegible] नमस्कार [illegible] व चि. सौ. [illegible] आशीर्वाद.

विशेष पुढील खेपेस. तुझा नारायण

३

आणि किंचित् आज. मी माझ्या स्वतःच्या चरित्राचे सिंहावलोकन केले व माझ्या पुढें गोखले घराण्याच्या संगतीत गेलेल्या आयुष्याचे मला स्मरण झाले. गंगूताई, मी जरी येथें शिकावयाला आलो आहे व मला जें जें पाहिजे तें तें मी प्रत्येक पटकन जरी शिकत आहे तरी ~~मा~~ माझा बहुतेक वेळ पुढें काय करावयाचे आहे याचाच विचार करण्यांत जातो. व त्या अनुरोधानेच मी माझें शिक्षण संपादन करीत असतो! माझ्या गंगूताईस पुढें कोणत्या रीतीचे काम दिले असतां तिला सुख होईल याचाही विचार झाल्याशिवाय एक दिवसही सुना गेला नाहीं व पुढें जाणार नाहीं. गंगूताई, तुझ्या चरित्र फेरबदलाचे मला तुझें विचार करणे, आणि म्हणून माझी तुला इतकीच प्रार्थना आहे कीं "गतं न शोच्यं" या म्हणी प्रमाणे मागें घडलेली प्रत्येक गोष्ट विसरून जा व पुढें येणाऱ्या आयुष्याचा उत्कर्ष करण्यास तयार हो. दुःख, कष्ट, त्रास या करितांच जणूं माझा जन्म आहे अशी मी दृढ समजूत करून घेतली आहे तशीच तूंही समज करून घे. म्हणजे तुला स्वर्गीं सुखसमाधान झाल्याशिवाय राहणार नाहीं. मला पैशाची टंचाई आहे, मला कर्ज झाले आहे, मला दुसऱ्याची काळजी असें म्हणत जरी मी आज आनंदाने बसलो असतो तर मला ज्या ज्या गोष्टी साधावयाच्या होत्या त्या त्या साधतां आल्या नसत्या. एक दुःख झाल्याबरोबर त्याला धिक्कृत करून दुसऱ्याची अपेक्षा करीत बसावे. अगर दुसरें दुःखच येणार नाहीं अशी व्यवस्था करावी. म्हणजेच [illegible]. तुझा जन्म व्यर्थ असें तुला वाटूं लागले आहे. तर माझें सांगणें असे आहे कीं ती समज काढून टाक, तिला दूर झुगारून दे. माझ्या जन्माचे मी सार्थक केल्याशिवाय ~~मी~~ कधीही राहणार नाहीं असा मनाचा निश्चय कर. व त्याचेंच सदाचिंतन कर. तुझ्या प्रत्येक कार्यांत तुला सहाय्य करणारा तुझा नारायण तुझ्या जवळ आहे. तुला दुःखात [illegible] पाहून असणाऱ्या मजकडून सुख अनुभविले जाईल असें तुला वाटते काय? तुजप्रमाणेच गेली चार वर्षे तशाच प्रकारचे दुःख अनुभवणारा मी तयार

४

झाली सुधारेल. मध्यंतरी पंधरा दिवस मी शिडर नावाच्या एका स्टेशनांत (ग्वालीजवळ) सोजराऊंशीं पायपाळून पंधरा फुटावर एका तंबूत राहिलो. शिपायांत सोजरांचे पाणी गार असल्यामुळे व तें एका मनुष्याला अठरा रीतीने पकडले असल्यामुळे या देशांत गोळा आली आहे. असल्या सोजराऊंशीं उन्हाळ्यात वेळ घोडे [illegible] राहत. [illegible] सोजरांचे कायम दिवस पाण्यांत राहतात. मी ग्वालीस असतांना प्रत्येक शनिवार आदितवार तेथें जात असे; पण पुढें पंधरा दिवस मात्र सतत त्याच ठिकाणी राहिले. तुझ्या हवा अतिशय चांगली असल्यामुळे व स्वतःचे अन्न स्वतःच शिजवून खावयास मिळत असल्यामुळे प्रकृती बरीच सुधारली. व सर्व ओझे कमी होऊन हिंडता फिरतां आले.

तुझें जन्मचरित्र मला माहीत नाहीं असें नाहीं; पण आपल्या मनांत खेळत असणारे विचार आपल्याला स्पष्ट रीतीने उघडपणे मांडता यावेत एवढ्याच उद्देशाने मी तुला लिहावयास सांगितले होते. व त्याच उद्देशाने तुला न दुखवितां मी प्रत्येकही विचारीत असतो. लिहावयाला येत नाहीं म्हणून सोडूं नये. एकदां होत नाहीं म्हणून प्रयत्न करावा. शेवटी सार्थक तेच लिहावे. जन्मतःच कोणी लिहावयाला शिकते असें तुला वाटते कां? नाहीं, ही एक कला आहे व तिचा सराव करावा लागतो. तुला तूं जरी दुःखी समजत असलीस तरी माझ्या गंगूताईला मी स्वतः शहाणीच समजतो. व तिच्याकडून माझ्या नेहमीही ज्यास्त काम होईल असें मला वाटते. तुला लिहिण्याच्या नादू लागावा व तूं तिकडे लक्ष द्यावेस एवढ्याच करितां निरनिराळ्या रीतीने मी तुला लिहितो. म्हणून कां कोणी वाईट वाटून घेतात? गंगूताई, तुझ्या नंबर २२च्या पत्रांतील मजकूर व चरित्रांतील तुझें चारित्र्य वाचून मला काय असें वाटले असेल! याची तुला कल्पना करवेल असें तुला वाटतें काय? तुला त्याची कल्पना करणे शक्य नाहीं. मनुष्याच्या शरीराचा सुधा होऊन त्यांस धक्का दिला म्हणजे त्यांत जशा वेदना होतात तद्वत माझ्या अंतःकरणाची स्थिती झाली

Nos. 35 & 36, 215

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

~~Hubli~~
Madison, Wisconsin
Dated. 28th Aug 1914

Sir,

To my dear Vinayak

Your two letters to hand at Gary. Glad to know the contents. Thanks for your feelings towards me.

Are you following the war news? If not do so. It will teach you some experience, history & geography. Let our dear boys at home know about it.

I am here at Madison, a capitol and a university town of Wisconsin State. The Campus of the University is fine, situated on the shore of a lake. I am here for the last two days

Take care about your health.

How are you progressing now a days?

Please write. Nothing more.

Yours affly
Narayan.

My B.C. to Mr. Dhongadi

N.S.H.

& I shall be off tomorrow to Minneapolis a big city in a northern state called Minnisota. The city is just on the border of Canada I don't know how many days I shall be there Perhaps I may live there a permanant life (as long as I am in U. States) 216

Please take care of your health & studies.

My B.C. to dear ~~Vahi~~ boys & girls & B.Ns to dear Vahini & Pillnakka

Yours ever affecti
Narayan

Address the same as before.

Lett Nos 35 & 36

Madison, Wis.
28th Aug

My dear Balu

Your chit to hand. Glad. Why don't you find time? Are you so busy as not to write in detail? Yes! I received from Mr. Dhongadi. He writes better than you do. Why don't you try? There is nothing like trial. Remember.

Do you receive letters from Anna & Tai? Where are they? & why don't you write about them.

Letter Nos
35 & 36

श्री

Ram

Madison
Wisconsin

28th Aug '14

My dear Bapu

Your's to hand. Glad to read the contents. I am sorry you don't receive my letters although I am writing you regularly. You please ask Talya & Bhaskar.

I am here for the last two days & I shall be off tomorrow to mineapolis a city in a northern state called minnisota. This town has the Wisconsin state University situated on a hillock near a beautiful lake. The Campus is one of the best of the United states. It is said that it stands 2nd of 500 Universities & colleges. It has a splendid library with a collection of one ~~lak~~ one & a half million books. It also stands 2nd; the first being the central library of New york. The biggest & best of all is at Washington, the Capitol of U.S.A.

minneapolis is also a big city. Its population is 4 Lacs. University of minnesota is located there. Perhaps I may stay there the whole college year. I am not sure yet. I shall have an opportunity to ~~the~~ see the river missisipi, the length of which is 4 thousand miles. It stands first in the world. more about this in future.

Convey my B.C's & thanks to Mr. Kabbur. I receive a card from him the other day at Gary. As I am on tour I can not spare time to write to all. So, Please ask him to excuse me for not writing him seperatly. Will write him when I settle.

Are you following the European War. Please follow minutely.

Nothing more.

Yours ever
aff
Narayan.

Address the same as
before.

पत्रनंबर
३७

[illegible]
॥ श्रीराम ॥

मिनियापोलिस
मिनिसोटा
[illegible] पत्ता
तारीख ६ सप्टेंबर १४

219

चि. मंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:-

तुझे तारीख ३ जुलै पत्र (नंबर ३४) मला तारीख १ सप्टेंबर रोजी मिळाले. आनंद झाला. ~~[illegible]~~ गद्य आणि पद्य लिंइ गेस थापर जो लिहून पाठविले आहेस तो तूं स्वतःच्या बुद्धीने लिहिले आहेस काय? मला वाटते तूं दुसऱ्याकडून लिहविले आहेस. चि. विनायकाने तरी लिहून दिले काय? असल्यास हरकत नाहीं. परंतु विनायकास सुद्धां तशा प्रकारचे लिहितां येणार नाहीं असें मला वाटते. आणि खरोखरी [illegible] लिहिले असेल तर तो फार शहाणा आहे. कारण चांगले लिहिले गेले आहे. मंगूताई, आता मी तुमच्या तुझ्या प्रश्न विचारण्यास सुरुवात करीत आहे. रागावू नको. — आपल्या घरावर एक छोटासा निबंध लिहून पाठीव. विनायकाचा विचार, तो कॉलेज

मागील पत्रांत लिहिल्याप्रमाणे मी तारीख २० ऑगस्टपासून येथें आलो. हें गांव मोठे आहे. मी विश्वविद्यालयाच्या बाजूला एका मित्राबरोबर राहत असतो. प्रकृती सुधारत आहे. काळजी नको.

चि. अरविंद व विपीन व चि. इंदुमती या तिघांच्या प्रकृती कशा आहेत. कळवावे. आपल्याकडील मंडळीकडची पत्रें नेहमी पोंचतात काय? तुझी व्याकरण आहे नाहीं. —— हो. ठरल्यापासून या गावांत एक जत्रा भरण्यास प्रारंभ होणार आहे. ही पांच दिवस राहील. ही जत्रा दर पांच सहा वर्षांनी भरत असते. [illegible] वेळ आली पुढील खेपेस. कळावे आपला नारायण.

ति. गं. वहिनीस व चि. अक्कास नारायणाचे दोनी कर जोडून शिरसा मस्तकी ठेवून साष्टांग नमस्कार विनायकाचा —— आपले पत्र — आला दिवसाची तारीख घेऊन लिहिलेले पत्र परवां पोंचले. मजकूर कळला. प्रायश्चित्ता बद्दल काय लिहावयाचे. ~~[illegible]~~ घेतल्याशिवाय घरांत घेऊन देत नाहीं असें जर तुम्हीं म्हणत असाल तर भाग घ्यावें लागणार. बाकी प्रायश्चित्त घेण्याची माझी कांहीं तयारी नाहीं. आणि तें कां म्हणून घ्यावे, असत्य कांहीं तसें सांगितले नाहीं किंवा मी कोणाचा खून केला नाहीं अगर पापाचरण केले नाहीं. मग कशाची भीती? केवळ वहिनींच्या जवळ राहण्याकरितांच जबरीने प्रायश्चित्त घेतल्यास घेईन. गळ्यातले जानवे —— माझ्या गळ्यातले जानवे तुटले. बरोबर पांच सहा आणली होती म्हणून एक तरी मिळाले. सध्या गळ्यांत आहे. पुढे मात्र मिळणार नाहीं कारण [illegible] देशांत माझ्याजवळ असलेली सर्व संपली. [illegible] तुम्हीं तो विद्यार्थ्यांच्या हातचे स्वावलंबनाने तयार करविलेले ठेवून परत पाठवाल. बाकी तसा प्रसंग येणार नाहीं. पण अगदी पाहिली, इकडील एखाद्या पोरीचे भिजविलेले अन्न खावयाची जर तुम्ही

पत्रद्वारें इच्छा प्रदर्शित केलीत 220 तरी मी तुम्हांला असें विचारतो कीं आमच्या हिंदु लोकांच्या हातचे पाणीसुद्धां; तुम्हांला चालत नाहीं तें इकडील महासागरात लोकांच्या हातचे कसें चालते व चालेल? आपण येथें [illegible] तरी तें [illegible] पण मी गंभीर रीतीने तुम्हांला प्रार्थना करतो कीं अशा स्वराष्ट्रांच्या हातचे स्वयंपाकपूर्वी तुम्हीं माझ्या गंगूताईच्या हातचे पाणी पिण्यास सुरुवात करावी. व नंतर हळू हळू जेवण वगैरे घ्या असें केल्यास फार आपलें म्हणणें खरें वाटेल. बाकी, या लौकिक जगांत आल्यावेळेपासून व इतर जगांशी आमच्या हिंदुस्थानची मी तुलना करावयास लागल्यापासून फार आमच्या भगिनी वर्गाबद्दल अत्यंत आदर वाटूं लागला आहे. जगांच्या पाठीवर कोणत्याही ठिकाणी जरी तुम्हीं गेलात तरी तुम्हांला हिंदु स्त्रियां सारख्या [illegible] वर्तनाच्या स्त्रिया आढळणार नाहींत. सर्व जगाच्या दृष्टीने हिंदु स्त्रियांस 'माता' व 'देवी' हीच नांवे शोभतात. जर त्यांच्यात कोणती उणीव असेल तर ती शिक्षणाची. असतु. याविषयावर फार फेरबदल लिहिण्याचे असल्यामुळे सध्यां लिहीत नाहीं. पण पुनः एकदा आपल्यास विनंती करतो कीं आपण माझ्या वरील प्रार्थनेचा विचार करावा. व काय झालें तें कळवावे. एखाद्या मुलीच्या डोक्यावरचे केस गेले म्हणजे तिच्या हातचे अन्न कसें चालते व तें केस नाहींसे म्हणजे असें चालत नाहीं याचेच फार गूढ पडले आहे. आणि हें गूढ उकलेपर्यंत कोणी मतभेदांनी मूर्खपणाने कोंबडे करूं नये असें मी केसरीतून प्रसिद्ध करणार आहे. पहावे माझ्या म्हणण्यास कोणकोण उत्तर देतात तें! वहिनी व पिकु अक्का, आपण — मी जरी तुम्हां दोघां पेक्षां लहान असलो तरी माझ्या म्हणण्याकडे मान द्याल ना? असें सांगे म्हणतो मी आपल्याकडून सर्व आशा होईल. चि. अरविंद, विपीन व इंदुमती यांस आशीर्वाद

कळावे यापुढील अवश्य उत्तर यावे

हे विनंती आपला

नारायण

चि.सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद:-

स्त्रियांना कोणाही मनुष्याशी पत्रव्यवहार ठेवावयास 'लाज वाटावी' यांत कांहीं वावगे नाहीं; उलट लहानपणा पासून त्यांना निर्भय शिक्षण मिळालेले असतें. पण सीताबाई, ही वाईट चाल आपल्या देशांतून आपल्याला काढून टाकावयाची आहे आणि तीकरितां आपणच प्रथम सुरुवात केली पाहिजे. तुमच्यासारख्या मुलींच्या व बहिणींकडून आमच्या कार्यास जर हातभार लागणार नाहींत तर ती तडीस कशी जावील वगैरे विचार करून उत्तर पाठव. नारायण.

Letter No 221:
37
"Ram"

Minneapolis; Minnisota
Michigan address.
Dated 6th sept '14.

My dear Vinayak

Yours of 30th July to hand. Glad to read the contents. Please go through the accompanying letter of dear Vahini and explain that to both. I think there will be no difficulty at all for you to understand. If you don't read twice or thrice. Then you shall be able to grasp. **Create** a sensation of that sort among the women at home & write me the response they give. I have spoken to you once while at Hubli about dear Gangutai; Perhaps you might recollect the occassion. Don't fail to persuade your sister-in-law. Remember there are good many ways of persuading her — i.e. a woman in her position. Follow some of them. You shall be crowned with at the end. Help dear Gangutai to write an essay on "our home". I am alright. more in my next. Yours affly Naraya

---

Letter No
37
"Ram"

Minneapolis 6th 9-'14
Minnisota
Address the same.

My dear

Balu

Yours together with Mr. Dhongade's to hand. Glad. How are you going on with your studies? Have you made any progress in your sanscrit? What about your mathematics & history? You did not write me anything about the subject you like. You did not answer all my questions as ~~yost~~ yet. It seems that you speak much but do nothing. You say you will do this & that & at the end do nothing. More in my next.

Yours affly Narayan

Letter No 222.
37

Ram.

Minneapolis
Minnisota 6 9/14
Address:- as before.

My dear
Ramu

Your letter of 1st August posted seperatly to hand on the 3rd Sept. Glad, you care for me. thanks for the information given about Mr. Nadji I don't care if his brother or uncle sends him money now or not. He is well fixed in Ann Arbor and I have nothing to do with him henceforward. I have taken precautions now & I shall be able to support some friends within few months. However I shall give him the needed help & friendly advice if he cares. sorry for Ganu anna's not paying to dear Bhaskar. Gods will be done. More in my next. Narayan

---

Minneapolis
Minnisota 6 9/14
Address the same.

My dear Mr. Dhongadi

Excuse me for not writing on another slip. Yours to hand. Glad to see that you are helping Bhaskar in preparing two copies of the article he sent. Be always writing. I am doing well. You take care of yourself & your own people.

Yours

Narayan S. Hardi

Letter No
37

1/3 Ram 11

223

minneapolis 6th 9/14
minnisota
address:- the same

My dear
Bapu

Nothing from you this time. Why so? If you are getting your mail regularly even now please ask once more to Tatya & Bhaskar & if they don't heed please let me know. I shall then post you seperate letters to your address.

I want to write about this city but I think I shall do ~~it~~ so better next time as there is a state fair for 5 days in the next week commencing from tomorrow. however I may say this much that this city is divided into two parts by the river nississipi which is 2nd (not 1st as per my last) in he world, the first being the Amazon in South merica. (Brazil) The river runs in a deep alley which has on its both banks a beautiful cenery, surrounded with ~~thick~~ trees. Every big city, I think s divided like this. For example Paris, London, New york, Berlin, Chicago & others. Our own cities in India:- Calcutta, Delhi, Madras, Hyderabad (Deccan) & some others.

By the time you receive this letter I am sure you will leave for Hubli to enjoy the vacation. How have you prepared for your exam. Pleas write.

Nothing more. Have you conveyed my B. C. to Mr. Kabbur? If not Please do so.

Yours aff

Narayan

Minneapolis; Minn.
13th Sept 1914

Michigan address.

Letter No
38.

My dear Vinayak

Nothing from. I am doing well. & hope the same with you. How are you going on with your studies? Do you receive from Bapu & Bhaskar? Do you read war news or not? If not, read.

More after I read from you.

Yours affly
Narayan.

My dear Balu

Nothing from you. I may write you in detail after I receive from you.

I shall be staying here for some time. & if at all my help is needed I may go to Europe. Please write

Yours affly
Narayan.

To Rama & his wife next time.
My regards for them both. NDH

पत्रनंबर
३८

॥ श्रीराम ॥

मिनियापोलिस; मिनिसोटा
तारीख १३-९-१४

मिनेसोटा विश्वविद्यालय

ति. सौ. वहिनी व चि. अक्कास नारायणाचे दोन्हीकर जोडून [illegible] चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विशेष:-

आपणाकडून या खेपेस पत्र नाहीं. कदाचित उद्यास मिळेल. इकडे आठवडे पासून सुरू झाला आहे. हवाही थंड पडत व थंडीस प्रारंभ झाला. मी उत्तरेकडील गावांत असल्यामुळें थंडी लवकरच भासूं लागली. बाकी प्रकृती बरी आहे. काळजी नसावी.

आपला नम्र
नारायण.

पत्रनंबर
३८

॥ श्रीराम ॥

मिनिआपोलिस. मिन.
१३-९-१४.
मिनेसोटा विश्वविद्यालय

चि. गंगूबाईस अनेक आशीर्वाद विशेष:-

तुजकडून या खेपेस पत्र नाहीं. बोट उशीरा येण्याची व जाण्याची कारणे तुला मागें कळविलीं आहेतच. युद्ध कारण जोरात आहे असून आतांपर्यंत जवळ जवळ ८ लक्ष लोक मेले व जखमी झाले. पुढें हिंवाळा आला तेव्हां किती लोक हकनाक मरतील कल्पना करवत नाहीं. कदाचित मी युरोपला जाईन. अद्याप कांहीं नक्की नाहीं. घायाळ लोकांची सेवा करण्यास मी तयार आहे असें सरकारला लिहिले होते व त्यांनी माझें नांव नोंदल्याचे आज मला कळविले आहे. रणांगणात गेल्यास कारण भयानक देखावा दृष्टीस पडेल. असो; याबद्दल पुढील खेपेस.

गेल्या आठवड्यात येथें जत्रा भरली होती. रोज ६० हजारावर लोक पहावयाला जात होते. पहाण्याकरतां फी १।। रुपया होती. मीही एके दिवशीं गेलो. सकाळ पासून संध्याकाळपर्यंत सर्व ठिकाणी पाहिलीं. या गावाच्या आजूबाजूची शेती ही मागच्या आठवड्यात पाहून आलो. कळावे. आपला नारायण.

Minneapolis, Minn
13th Sept 1914
Michigan U. address

Letter No.
38 "Ram"

My dear Bapu

Nothing from you for the last two weeks. Why so? Please be writing often.

I am well with my studies & health. Hope the same with you all.

Yours affly
Narayan

Letter No
39

" Ram " 228

Minneapolis, Minn
20th Sept 1914

Michigan address.

My dear Bali

Yours to hand. Glad that you read my letters so very carefully. I wish I would write you everytime in detail but you know I have so many things to do. I receive good many letters from India & other parts of America & I am obliged to answer them all. At the same time I ~~am~~ think it is my duty to spare time for my dear Gangatai & write her everytime upon a new subject. Ofcourse a letter written to her is meant for all members of our house & they should also take some lessons from that. I have no time to write on the question you asked this time so please wait for a week more. I think I shall answer your question in one

229

of the future जगतगुरू. Thanks to you for going to Mr. Bindurao M. Desai. I am sorry I don't wish to write letters to those who don't care for them. I shall be writing to those who desire to answer me in return & not to any one else. I have no time to waste for them. If Bindurao asks you tell him the same thing. What more shall I write you? You did not take dear Pillnakkas signature last time. Why so. Take next time without fail. I would like to see her hand writing. Make a trick then she will sign.

Your's affly Narayan.

230

Letter No
39

"Ram"

Minneapolis; Minnisota
20th Sept 1914

Address — as before

My dear Bapu

Yours of.... dateless letter to hand. Glad, you received my letter at last. If you will read my शाणपद No 8 I think you will understand some thing about the term Indian. The Word Indian is used to the Natives of America — the Red-Indians. We donot call our selves as Indian but as Hindu. If we say Indian then the americans take us to be red people. Hindusthani is the General term that designates the ~~Hind~~ people from Ind.

Sorry to hear about the lecture on "the "Past glory of Karnatak". Well it should be so.

Bapu, I am thinking of going to the War Zone to relieve the suffering humanity as a member of British Red cross society. I have applied & they have accepted. I don't know what will happen next. If I go I will let you know. The British Embassy to america was seen personally & he gave me some hopes of taking me to the battlefield. Let me see whether I would get some experience or not.

Well, how have you done in your Exam. Please write. Bapu, I think you shall be able to ~~gy~~ take a group of our family once again. You know we had a group last year & it is not good. I wish I would get one group of all my bros & sis. at Hubli Don't send me that dirty picture but have one for me when you shall be there & please be kind enough to send one. I am very eager to see. Never mind if Kaveri or any ~~one~~ other member misses. but have one. Don't hesitate to spend some ~~three~~ or four rupees. I shall pay you when I return [illegible] you like. More in my next.

Yours affly
Narayan

232

Letter No
39

" Ram "

Minneapolis, Minnesota
20th Sept. 1914

Michigan address.

My dear Rama

Your two lines chit to hand. Glad to go thro' it. Thank you for the kind information you gave about Mr. Nadgir & his family. I don't care if Mr. K. Nadgir sends money to his brother or not. I have done whatever I wanted to do. I don't wish to take a single pie from him although he receives crores of Rupees from his brothers or state. I will work & depend upon my own talent for my livelyhood & studies. God has endowed me with intellectual powers & ability, Courage & presence of mind & I shall make use of them to [illegible] shine in the world for the sake of my poor Countrymen. I have every confidence in me & so, I request you all not to care a bit for me.

Yours ever aff. Narayan.

233

~~[illegible]~~

My dear Vinayak. Glad
yours letters to hand. your
You are pretty busy with your
Preliminary exam. Let me know how
You do in that. Vinayak! I am told by
three different persons about your careless-
ness towards your family members. They complain
against your conduct. Why? You are an educated
boy & you should never do so. Why don't you take particu-
lar care about your sisters reading & writing. You can very
easily spare some minutes to correct her letters which
she write to me or to others. Why don't you
Keep a close watch on her correspondance?
Remember such a watch serves double
purpose. You should not avoid
that. See what you shall
do towards that &
write me. Yours
Affly Narayan

234

लोक इंग्लंडात, हिंदुस्थानात — विद्यार्थ्यांचे हाल दिसतील व आपणाला देखावे पहावयाला मिळेल. लोक केव्हांही अशांत असतात. रेल्वेच्या गाडीतून जाताना तीं तिकडे फिरतात व इकडे येतात म्हणजे इकडे [illegible] लोकांची शिस्तशीर रीतच आहे. सर्व जीव [illegible] [illegible] [illegible] सोडून देणा-च्या लोकांच्या मागे इकडे आनंदोत्सव करावा पडतो. अशाप्रकारे आज करीत असावे. आज तूं माझ्याशी पत्रव्यवहार ठेवितोस म्हणून जर तुझी आई निंदा करील तर उद्यां तूं बोलणार नाहीस? माझ्या तुझ्या पत्रव्यवहारांत ही कधी होणार नाहीं म्हणावयाला? असें वाटते, आणि लोकांना समजावयाचा भाग म्हणजे. हिंदुस्थानांत मी परत गेल्यावर माझी व तुझी दृष्टादृष्टी होणे कठीण होणार म्हणूनच? तें असेल की नाहीं? आज असेल तें मला लिहिणे कठीण म्हणजे मी आपल्या स्थितीस [illegible] व तुझ्याशीं असाच पत्रव्यवहार [illegible]करतो असा पुढें नाहीं वाढवायाचा नको. हरीभाऊंकडे कधून मधून पत्रें पाठवीत जा. आणि त्यांस लेखाच्या विषयावर लिहून पाठीव, म्हणजे तो तुझ्या मुळाक्षरांना उत्तर पाठवील. हें एक प्रकारचें शिक्षणच होय.

मंगलाई, तिच्या पुढें बसत असतात त्या नीट कुशल जा. पुष्कळ वाच आणि तें ध्यानांत ठेऊन त्याचा सारांश लिहून ठेव म्हणजे उपयोग होईल.

तुझाली उभाग भारदिवशी पडली त्यादिवशीं पाळण्यांत दूध किती लवकर घेतले होते. लागले व्यर्थ गेले ना? "वहिनी, मला थोडी चाय द्या" म्हणून वहिनी पुढें हात पसरत असतां तर "थोबाडीत देईन" म्हणून त्यांनी मला उत्तर दिले असतें. आतां उभाग पडलेल्या दिवशीं जर दूध जर नाहींसे झाले असेल तर वहिनींच्या [illegible] जीव खाण्यावर आला असेल नव्हे? बरें वाटले.. मंगलाई, मला पिंकुअक्काच्या व वहिनींच्या दातांत उभावा असा वाटतो. आम्हा ~~[illegible]~~ हमेशा रोज रात्रीं १०-१०॥ वाजतां त्यांपैकी ही नाहीं कोणीतरी थोडी, किंवा पाव, अथवा अर्धी पाव किंवा द्राक्षांवरही, कोरे कोरे उभेच खात असतील आणि मी वाकडे तोंड करून पुढें बसून खात रडतो. मग त्यांच्या दातांना उदीन आले असे म्हणता येईल? अलबत दातांत केव्हांच पडतील. आतां, तूं वहिनींना व पिंकु अक्कांना आंगठीं रात्रीं खावयाचा बहाणा करतांना [illegible] बाधा होऊं नये व डोळे लागूं नयेत म्हणून लोक जांबें [illegible] थोडेसे असे फेकून देतात. तसें नारायणाला दातांत सोडूं नये म्हणून थोडकेसे पाव पीठ अथवा कुणा ओणागी जिलबी लोंढांत यांचे येण्यापूर्वी, पावबिस्कुट उठून ठेव म्हणजे खात्रीचे अंगाचा [illegible], नाहीतर नाहीं. असो.

चि. अरविंद व बिपीन आणि इंदुमती यांच्या प्रकृती कशा आहेत ना? त्यांना अनंत आशीर्वाद.

तुझा नारायण

पत्रनंबर
५९

॥ श्रीराम ॥ 23 कु मिशियपोठिक, मिजिसोच
तारीख- २०-९-३४

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद:- आपणाकडून माझ्याकोणत्याही पत्रास उत्तर नाहीं. पत्रे धाडणे अर्थ उरत नाहीं तरी कृपाकरून (कुशलवार्ता तरी कळवावे अशी विनंती आहे. आपला नारायण.

~~चि. सौ.~~ ಚಿ॥ ಶ್ರೀಕಾಂತ ಕುಲಕರ್ಣಿ ಇವನಿಗೆ ಅನೇಕ ಆಶೀರ್ವಾದಗಳು:-
ನಿನ್ನ ಚಿತ್ರ ಮುಟ್ಟಿದೆ. ಮಜಕೂರು ತಿಳಿಯಿತು. ನಿನ್ನ ಕಡೆಯಿಂದ
ಚಿತ್ರ ಬರಲಿಲ್ಲ ಅಂತ ನಾನು ಕಾದಿಲ್ಲ. ನೀನು ಬರೆಯುತ್ತ ಹೋದರೆ
ಅದಕ್ಕೆ ಉತ್ತರ ಕೊಡುವೆನು. ಶಾಳೆಗೆ ಹೋಗು. ಅಭ್ಯಾಸ ನೆಟ್ಟಗೆ ಮಾಡ
ಬೇಕು. ಇಂತಿ ಆಶೀರ್ವಾದಗಳು. ನಾರಾಯಣ.

॥ श्रीराम ॥

चि. बिपीन यांस अनेक आशीर्वाद:-
तुला लिहावयाला येते ना? मग
कां लिहीत नाहीस? तुला काय काय
येतें तें मला कळीव. अरविंद तुझ्या
बरोबर खेळतो कीं नाहीं? तू त्याला
मारतोस कीं तो तुला मारतो? लढु कोण
आहे? अक्काकाकी कडून (मामूलप्रमाणे) रोज दूध पीत
चला. नमस्कार घालतात ना? मारुती
स्तोत्र म्हणत असतात ना? इंदुमती कशी
आहे? कळीव. उत्तर धाड.
तुझा
नारायण

गं. भीमा— सोबत पाठविलेले चि. सिंधूचे पत्र सुद्धा तिच्याच हातात जाईल असे पाठीव. व तिच्याकडून उत्तर मागवून मजकडे धाड. विसरूं नको. आपला नारायण.

पत्रनंबर 236
50

॥श्रीराम॥

मिनियापोलिस
मिनेसोटा
तारीख २७-९-२५

पत्ता- मिशिगनचाच.

ति.गं. वहिनी व चिऊ अक्का यांच्या पायाला दोन्ही कर जोडून त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना:- उद्यां म्हणजे तारीख २८ सप्टेंबर रोजीं (सोमवार) विजयादशमी - दसरा - असल्यानें मला कॅलेंडरवरून समजलें. आपण दसऱ्याला श्रीखंड करून खाल्लेंत कीं 'कोरडकडबू' केले होतेत अथवा बासुंदी पुरीवर ताव मारलात कळवा. या आठ सहा दिवसांत मी तर खूप चैन केली. कारण नवरात्र होतें (एके दिवशीं श्रीखंड केलें; दुसऱ्या दिवशीं शिरा केला; तिसऱ्या दिवशीं कडबू (उकडीचे) केले व उद्यां साखरभात करीत आहों. शिवाय डाळवांग, बटाट्याची भाजी, भजीं वगैरे मिळेत. कारण सध्यां मी जेथें राहत आहे तेथें दोन आमच्यातील मराठी मुलें आहेत. ते स्वतः करून खातात. मी चैनीत कांहीं दिवस घालविण्याकरतां येथें आल्यामुळें अनायासें घरचें खाद्य खावयास मिळूं लागलें. तथापि स्वयंपाक कर-ण्याचा हुरूप आला व मी तें शिकून केलें. फार फार चांगलें झालें होतें. खातांना तुमचे दोघांचें नांव घेघेऊन खातो; कारण आपल्याकडे हे पदार्थ करावयाला मला शिक-विलें नसतें तर असा परदेशांत असे पदार्थ खावयाला कधींच मिळते ना. तुम्ही चार दिवस बाहेर गेलेल्या वेळीं मला हे सर्व स्वयंपाक शिकवीत होता म्हणून तुमची वारंवार आठवण होते. विनायकराव व भास्करराव यांच्या सल्ल्यानें तुम्ही आतां पासून स्वयंपाकी नवीन नेमला म्हणे. सुटीच्या दिवसांत तरी आपले पदार्थ करून खावयाचा शिकलीच. वहिनी व चिऊअक्का तुम्हीं मला स्वयंपाक शिकविल्याब-द्दल मी तुम्हां दोघांचा फार फार आभारी आहे. पण ह्याबद्दल मी परत गेल्या-वर मला तेंच काम करावयास मात्र लावूं नका. असो. मी एक दोन दिवसांत ऍन आर्बरला जाण्यासाठीं निघणार आहे. पुढील पत्र ऍन आर्बरहून धाडेन. हें पत्र दिवाळीच्या सुमारास तुम्हांस पोचेल. त्यावेळीं तुम्ही निरनिराळे पदार्थ खात असतील नव्हे ? चिऊअक्का, अमेरिकेतील तुझ्या भावाची आठवण भाऊबिजेच्या दिवशीं आली होती काय ? कळवावें. कळावें. आपला [illegible]

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद :- तुझें तारीख १९-ऑगस्ट २५ नंबर २७चें पत्र पोचलें. मजकूर समजला. अभ्यासाची तूं येवढ्याशा तेवढ्याशा गोष्टीला रडतेस ! खरेंच मी तुझ्या मनासारखें तें काय करीत होतो ? आणि आतां मी नाहीं म्हणून तुझ्या मनासारखें करणारा कोणी नाहीं असें वाटतें ? पण काय गंगूताई ! तुझें मना-सारखें करावयास मी तेथें नाहीं म्हणून तूं तर सर्व दिवस रडत बसतेस म्ह-णावयाची ! का अभ्यास काय आता [illegible] काय ? खरीच आतां तुझा फोटो पाहावयास पाहिजे म्हणजे गुंजेएवढे डोळे तरी मला दिसतील ! मला एक फोटो पाठवून तरी दे.

तुझ्या शाळेतील आणि विनायक, बाळ, गोंद्या हे सर्वजण खुशाल आहेत ? बापूरावांचें पत्र आलें इतकें लिहिलें तरी अद्यापि कळलें नाहीं ! मग तुम्ही काय करतां हें सांग गंगूताई ! तुझा कमलादेवीचें व विठ्ठलरावांनीं जीं पत्रें धाडलीं तीं न्यूयॉर्कहून. आणि मी अजूनही त्यांच्यां-त आहे. न्यूयॉर्कला मी बोटींतून उतरल्या त्यावेळीं होतो. त्यानंतर तेथें

कशाला जाऊं? आन् आर्बर न्यूयॉर्कहून ८०० मैल आहे. व मिनिआपोलिस १५०० मैल आहे. म्हणजे मी असलेल्या गावांहून न्यूयॉर्क – मुंबईहून कलकत्ता जितकें दूर आहे तितके दूर असें ही गावें आहेत. मग कमलादेवीने लिहिलेल्या पत्रांत मी "तुमचा फोटो पाठवून द्या" असें कसें बरें लिहीन? मला तेथें उडून जाण्याकरतां पंख आहेत असें तुला वाटतें काय? बरें, तुम्ही सर्व असें म्हणाल कीं कदाचित कमलादेवीने पत्र लिहून मजकडे पाठविलें असेल आणि मग मी लगेच एक वाक्य लिहून पाठविलें असेल पण लक्षात ठेवा, कमलादेवी ही गोरी स्त्री आहे. तिच्या अंगी स्वतंत्र बाण्याचें रक्त खेळत आहे. आमच्या लिहाप्रमाणे ती आपण पत्र लिहून नंतर तें तपासण्यासाठीं मजकडे पाठवील असें होणे शक्य तरी आहे कां? या गोष्टी आमच्या – तुझ्यासारख्या स्त्रियांपाशीच कराव्यात. बरें; आपल्या एका दृष्टीने जरी विचार केला तरी अशा रीतीने मी पत्र लिहिणे असंभवनीय होय, कारण मला तुम्हां सर्वांचा व विशेषतः वहिनीचा स्वभाव माहीत आहे. तुझा फोटो आजपर्यंत एकदाच काढला आहे आणि तोही परवां सर्व मंडळीबरोबर. तुझा निराळा फोटो उपलब्ध नाहीं हें मला ठाऊक आहे. आणि फोटो काढून तूं पाठीव असें जर मी तुला लिहिलें तर तुला फोटो काढवितां येणे शक्य नाहीं कारण तूं परतंत्र आहेस आणि फोटो काढण्याला तुला मामा किंवा भाऊ कोणीही परवानगी देणार नाहीं हेंही मला पूर्णपणे ठाऊक आहे. मग मी तुला असें बरें विचारेन? तुला न विचारतां मी काहून असा काहून विचारीन कारण लोक कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं. आणि लोकांप्रमाणे मी मागेंच लि. काहून लिहिलें आहे. आतां तरी तुझी खात्री झाली ना? आतां या सर्व गोष्टी बाजूला जरी ठेवल्या तरी माझी इच्छा तुम्हां सर्वांचा एक फोटो काढलेला असावा अशी आहे. फोटो सर्वांचा – म्हणजे वहिनी, पिंटुअक्कापासून तो चकुलीपर्यंत सर्वही जण त्या फोटोत असावेत. आपण पूर्वी एकदा एक फोटो काढून घेतला आहे. तो चांगला नाहीं म्हणून मला आतां सर्वांचा एक फोटो पाहिजे आहे. तो तुम्ही मला द्याल काय? तूं तुझा फोटो कमलादेवीला पाठीव असा मोह पण मला तुम्हां तिघांचा एकत्र असा एक फोटो पाहिजे आहे. तूं, सिंधू व सीताबाई आणि कावेरी असेल तर यावी. मी अर्थात तो कोणालाही दाखविणार नाहीं. तुम्हीही पाहिजे असल्यास कोणाला दाखवूं नको. असो; याचा अवश्य विचार करा.

गंगूताई! कमलादेवी व विमलादेवी यांच्याशीं तुझा आतां पत्रव्यवहार सुरू झाला. दुर्दैवाने तुला इंग्रजी येत नसल्यामुळें त्यांच्या लिहिण्याचा अर्थ तुला कळत नाहीं व तुलाही स्वतंत्रपणे त्यांना लिहितां येत नाहीं, तरी तुला त्या गोष्टींची माहिती पाहिजे असेल त्या पद्धतीने एक मराठी पत्र लिहून तें विनायकाकडे अगर भास्कराकडे दे. ते त्याचें निरक्षर भाषांतर करून देतील. वहिनी, पिंटुअक्का, सीताबाई अथवा दुसरे यांच्या पत्रांतील वाचक अगर आपलीच कोणत्या तरी वाचका यांच्यामध्यें कमलादेवीच्या पत्राची चर्चा कर. आणि मग त्यामध्यें जर स्पष्ट होईल तो पाहून

मग लिहून काढ. आणि कुणाकडे दे. तुझ्यासारख्या इंग्रजी न येणाऱ्या कुणाशी पत्रव्यवहार करून लोक अमेरिकेची माहिती देण्यासाठीं मी आपल्याकडे कांहीं निराळी व्यवस्था केली आहे. येथें असलेल्या "महाराष्ट्र मंडळांत" तीन जणी आहेत. त्यांना मुंबई पुण्याकडल्या अशा लोकांना आपल्या भगिनींशी पत्रव्यवहार ठेवण्यासाठीं मंडळाने विनंती केली आहे व ती त्यांनी मान्य केली असून लवकरच तुझ्याबरोबर त्यांचा मंडळामार्फत पत्रव्यवहार सुरू होईल. त्यांचे पत्र आलें म्हणजे त्यांना तूं उत्कृष्ट मराठी अक्षरांत — कारण त्या तुला होतं नदेतां — त्या उत्तरे द्यावीं आणि चांगले चांगले प्रश्न विचार. प्रश्न विचारणे, तें केव्हांही पाहून विचारावे. उगीच पांचट प्रश्न करूं नकोस कारण इकडील लोक किंवा विद्यार्थी केव्हांही ज्ञात अथवा अज्ञात असतात. कित्येक कठीण प्रश्नांना त्यांना उत्तरें देतां येत नाहींत. कारण वेळ नसतो. म्हणून विचारपूर्वक प्रश्नमालिका तयार करावी. तसेंच इकडची तिकडची थोडी हकीकत लिहावी म्हणजे पत्र वाचण्यासारखें मोठें मनोरंजन होते. विनायक, भास्कर तुला कळवतील.

Minneapolis, Minn
27th Sept 1914

Letter No
40

॥ Ram ॥

University of Michigan
Ann Arbor, Mich,
U. S. America.

My dear Vinayak

Yours – No 37 – to hand. Glad to read your detailed. What a fool you are! You say that I have written for the photo? Is it possible? Read Gangutai's & you will understand how impossible it is. Although I have not asked in Kamala Devi's, I ask in this for such a photo. Will you try to get one for me & send at your earliest Convenience. Before answering to Sister Kamala's letter ask Gangutai to write a marathi answer & then translate it in a very easy way. Let me tell you to take precautions again. Kamala Devi should not, at any rate, understand the ignorance of our ~~sister~~. Write me in full about such letters, so that, I may hint you the way how to answer questions. Has she asked you ~~to~~ say to Gangutai – to establish a club there? Has she asked ~~you~~ her to send the names of the members? If form a भगिनी मंडळ of गंगूताई, सीताबाई, कावेरी, सिंधू, Tatya

एकदोन दिवसांत मी हें गांव सोडून ॲन आर्बर ला जाईन. जातांना वाटेत एक दिवस शिकागो मुक्कामी राहीन. पुढील खेपेचे पत्र त्या ठिकाणाहून लिहीन. नंतर १५ दिवसांनी मी उन्हाळ्याची सुटी कशी घालविली याबद्दल "ज्ञानोदय" मधून पाठवीन. माझी शाळा पुढील आठवड्यात उघडेल. असो, आतां बरीच रात्र झाली, उद्यां उठायला उशीर होईल आणि अजून बरीच पत्रें लिहि-ण्याची आहेत तरी येथेंच तुझी रजा घेतो. नारायण —

चि. सौ. सीताबाईस अनेक आशीर्वाद :— तुमच्या साठीं मी आज खरीच एका युवतीस (ही युवती ब्राह्मण कन्यका आहे) आपणाबरोबर पत्रव्यवहार ठेव-ण्याचे मोठ्या आनंदानें विचारले आहे. गंगूताईच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें उत्तर देण्याची व्यवस्था करा. सर्व जगा सारखे आपआपल्यामध्यें कांहीं तरी गोष्टींची चर्चा करा. माझी थट्टा केली तरी चालेल पण कृपा करून काम करा. कामाची दिशा भास्कर सांगेल. कळावे — आपला नारायण.

wife & some women from Tembe's & others. Have policy & then place your foot. Bapu & Bhaskar shall be of use. I have written to Bhaskar today & you read that if you find it. Write हरिभाऊ for that. I am leaving this city in a day or two & will go to Ann Arbor to join the University. My next letter will be written to you from Ann Arbor. Do you read War news? Why don't you write anything about that? Do you get papers to read? Write. Nothing more —— Your's Affly Narayan.

My dear Ramu

Your two lines to hand. Glad. Will you please read dear Gangutai's & try to get a photo for me? A group Photo of all the members. Don't keep any Copy at home if you like, but send me one. I shall be thankful to you for that. Please write.

Your's affly
Narayan

Letter No 238
40

Minneapolis, Minn
27th Sept 1914

॥ Ram ॥

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America

My dear Balu

Your two lines to hand. Glad. Let me know how you have done in your exam. It's bad! You are suffering from itches again. Sorry. Did you receive any ointment

ಮಿನಿಯಾಪೊಲಿಸ್, ಮಿನ್.

॥ಶ್ರೀರಾಮ॥ ತಾ. ೨೭-೯-೧೯೧೪.

ಶ್ರೀಯುತ ಧೋಂಡಿ ನಾಯರಿಗೆ ಅನೇಕ ಆಶೀರ್ವಾದಗಳು:—

ನೀವು ಬರೆಯುತ್ತಿರುವ ಪತ್ರಗಳನ್ನು ನೋಡಿ ನನಗೆ ಬಹಳೇ ಆನಂದ ವಾಗುತ್ತದೆ. ತಾವು ಭಾಸ್ಕರನಿಗೆ ಮಾಡುವ ಸಹಾಯವನ್ನು ನೋಡಿ ಆದರೂ ನನಗೆ ಸಂತೋಷವಾಯಿತು. ಇದೇ ಪ್ರಕಾರ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡ-ಬೇಕು. ತಮ್ಮ ಅಭ್ಯಾಸ ಮಾಡಿ, ಪ್ರಕೃತಿ ಕಡೆಗೆ ಲಕ್ಷ್ಯವನ್ನು ಕೊಟ್ಟು, ತಮ್ಮ ಬೇಕಾದ ಕೆಲಸವನ್ನು ಮಾಡಬೇಕು. ..... ನನ್ನ ಜಾನವರುಗಳನ್ನು [illegible]

239

from Talya? How do you feel? Thanks for Dhongadi. Take care of your health. Study hard. I need not tell you about it. Try to get ideas of Vahini & Pillu akka everytime. Don't forget.

More in my next.

Ys ms affly

Narayan.

ತಮಗೆ ಇತ್ತಕಡೆಯ ಹಕೀಕತ್ತು ತಿಳಿಯುವದು. ತಮಗೆ ಯಾವ ಪ್ರಶ್ನೆಯ ಉತ್ತರ ಬೇಕಾಗಿದ್ದರೆ ಅದು ನಾನು ಕೊಡಲಿಕ್ಕೆ ತಯಾರ ಇದ್ದೇನೆ. ತಾವು ಮಿತ್ರರೊಳಗೆ ಚರ್ಚೆ ಮಾಡಿ ತಮ್ಮ ದೇಶದ ಸಲುವಾಗಿ ವಿಚಾರ ಮಾಡುತ್ತಿರಬೇಕು.

ತಾವು ಹೆಚ್ಚಿಗೆ ಬರೆಯಬೇಕಾದರೆ ಸ್ಪಷ್ಟ ಬರೆಯಬೇಕು. ಅಂದರೆ ನಾನಾದರೂ ತಮಗೆ ಬರೆಯುವೆನು.

ತಮ್ಮ

ನಾರಾಯಣ.

पत्र नंबर ५१ 240

आन् आर्बर; मिच.
~~Hubli~~
मिशिगान विश्वविद्यालय

Dr.
N. S. Hardikar
M. C. P. & S.

Dated..५. आक्टोबर 1919

To ति. गं. वहिनी व चिउ अक्कूस नारायणाचे दोन्ही कर जोडून त्रिकाळचरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार.

Sir
विज्ञापना:—

हें पत्र आपणांस नोव्हेंबरच्या सुरूच्या आठवड्यांत केव्हां तरी पोंचले पाहिजे. मेल स्टीमर बरोबर जात असेल तर हें पत्र पहिल्या आठवड्यांत; नसेल तर दुसऱ्या आठवड्यांत आपल्या हातीं पडेल. त्याच सुमारास केव्हां तरी तारीख ११ नोव्हेंबर येईल. वहिनी, त्याच दिवशी मी तुम्हां उभयांचा निरोप घेऊन या १५००० मैलांवरील देशास येण्याचा निघालो. चिउ अक्कूचा निरोप मी त्या पूर्वी आठीं दिवस घेतला ~~हो~~ होता. (एका वर्षानंतरचे माझें हें पत्र आहे असें तुम्हांस त्याचवेळीं वाटेल; व तुम्हीही त्याच सुमाराचे जें पत्र लिहाल त्यांत मला जाऊन बरोबर एक वर्ष झालें असें म्हणाल! स्वर्गस्थ झालेल्या आप्तेष्टांचा आत्मा शांत रहावा व त्यांस स्वर्गातील मार्ग सुलभ जावा म्हणून मृत्युलोकींचे लोक ~~[illegible]~~ श्राद्धाच्या दिवशी अन्नदान ~~व~~ वस्त्रप्रावरणादि पुष्कळ ब्राह्मणांना देतात. पण ~~[illegible]~~ वहिनी, व चिउ अक्कू अमेरिकेसारख्या पाताळलोकीं गेलेल्याचे आप्त स्वजन ~~[illegible]~~ हिंदुस्थानासारख्या मृत्युलोकांतील बांधव, त्यांच्या आत्म्यास शांती प्राप्त व्हावी, त्यांचा त्या पाताळ

आतां अभ्यासाचा बैल एकदां जुंपला म्हणजे तो वर्षाच्या डोंगराहून चालत चालत जून १९३५ पर्यंत चालू राहील. विश्रांती फक्त वर्षाला पर्वत दिसूं लागला (ख्रिसमस-नाताळ) म्हणजे १५ दिवस मिळेल. मग वर्षाचा डोंगर उतरून खाली मैदानावर आलो म्हणजे थोडी धाप लागल्यामुळें पुनश्च १० दिवस (वसंत ऋतु) सुटीरूपी विश्रांती मिळेल. जून महिन्यांत तो बैल (आपली स्वारी) विशेष थकून गेल्यामुळें त्यास (आपल्या स्वारीस) ३-३॥ महिने उन्हाळ्यात विश्रांती घ्यावी लागते. ह्या वर्षीचा कार्यक्रम असा. असो —— चि. सौ. मावशीस चि. ना. नमस्कार कळवा. मुलांच्या प्रकृती चांगल्या आहेत. उन्हाळ्याची काही माहिती आपल्यास पुढील खेपेस पाठवीन. ह्या वाक्यामुळें पुढें मला आता बरेंच पडले आहे व डोकेंही दुखत आहे. म्हणून तुमची रजा घेणे भाग आहे. [illegible]

आपला होणारा प्रिय
[illegible]
नारायण

पत्रनंबर
४१

॥ श्रीराम ॥

मिशिगन विश्वविद्यालय
आन आर्बर, मिच.
यु. स्टे. अमेरिका
ता. ८-११-१९३४

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद विशेष:——

ती. गं. वहिनी व पिंडूआक्का यांना बाळाचे दोन्ही कर जोडून त्रिकाळ धरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती विशेष:- तुमच्या पत्रावरून आपणापैकी पिंडूआक्का कोल्हापुरास गेल्याचे समजले. हे पत्र हाती पडेल त्यावेळी पिंडुआक्का परत आलेली असेल. अर्थात माझे साष्टांग प्रणिपात पोंचतीलच. असो. यंदांनी कोल्हापुरची हवा एकदाची पाहिली पाहावयाची. त्यांची व बेपीनची प्रकृती बरी आहे ना? कळविणे. माझी प्रकृती बरी आहे. विशेष हकीकत कळविण्याजोगी कांहीं नाहीं तरी पण घरची आठवण फार फार होते. खोलीत बसलो म्हणजे मन एकदम घराकडे जातें म्हणून मी अर्धाकडे रात्री ११॥ वाजल्याशिवाय खोलीवर जात नाहीं. सकाळी ८ वाजल्यापासूनचा रात्रीचा वेळ (जेवणाच्याकरितां तीन तास खर्च करून) मी प्रयोगशाळेत काढतो. खोलीत असलो म्हणजे मन तुमच्याकडे जाण्याचा कंटाळा फार कमी म्हणून असें करणें भाग पडतें. असो- वारंवार पत्रें पाठवीत असावें ही विनंती:

आपला नम्रविनीत
नारायण

चि. गंगुताईस अनेक आशीर्वाद विशेष- तुझें तारीख २३ आक्टोबर बेंगरूळचे पत्र मला तारीख १६ नोवेंबर रोजी सकाळी पोंचलें. पत्र पाहून आनंद झाला. तुझा फोटो काढण्याला वहिनींनी परवानगी कशी दिली याचेंच मला आश्चर्य वाटत आहे. घरच्या सर्व मंडळींचा मला एक फोटो पाहिजे होता म्हणून मी भास्कर, हरीभाऊ व बापूस लिहिले होते. त्यावेळीं तुझ्यां तुझ्यांचा निरनिराळा फोटो काढून पाठविण्याकरताही त्यांना मी कळविलें होतें. असें करण्यांत माझे बरेच हेतू होते. एक हरीभाऊ व भास्कर यांच्या हातून हे काम कितपत तडीस जाते व ते दोघे वहिनींचे मन कसें वळवितात हें मला पहावयाचें होतें. दुसरें शुद्ध वहिनी त्यांना किती दाद देतात व फोटो काढण्याची कोणती कल्पना होतात हें पाहून त्यांच्या विचाराची दिशा मला समजावयाची होती. तिसरें खरोखरीच मला तुझा फोटो पाहिजे होता. का पाहिजे होता हें मात्र पत्रद्वारें मला कळवितां येत नाहीं. तुम्ही लोक सर्वे कविता माझ्या मनात घुसून शोधून काढावे. कमळीकडून मी फोटो मागविला असें जें तूं म्हणतो लिहितेस तें अगदीं खोटें आहे. शिवाय ताईकडून मी अशी व्यवस्था करणार नाहीं. सर्व मंडळींचा फोटो आला असता तर मला फार फार आनंद झाला असता. माझ्या प्रिय पुतण्यांना व बहिणींना मला रोज दिवस नजरेसमोर ठेवतां आले असते. असा फोटो कधीं पाठवून देशाल काय? कळवी.

माझी खोली एका गरीब बाईच्या घरांत आहे. त्या कुटुंबात मी राहात आहे. माझ्या खोलींत जो पाहुणा पाहील त्याला जिकडे तिकडे तुमचे फोटो लावलेले दिसतात. एक आईचा, दुसरा पुरोहिताचा, तिसरा पुरोहितांच्या स्त्री-

घेतल्या, नवव्या खुद्द पुणें अमेरिकेंत आणि पांचवा आफ्रिकेंत हिंदुस्थानांत. याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. कधीं फक्त भाऊसाहेबांना एक फोटो पाठविला आम्हीं युनिवर्सिटीत घेतलेला फोटो असे निराळे दोन आहेत. आतां पुढें जर फोटो माझ्या खोलींत काढावयाचा झाला! त्यायोगें खोलीचा शोभा तर येईलच परंतु विशेषतः माझ्या स्मृति जागृत आपल्या अंत:करणांत राहतील. अरे, उदईक येणारा फोटो माझ्या प्रिय मनुष्यांना होय. तसाच सर्वांना आया असतां तर बरें झालें असतें. अस्तु.

युरोपमध्ये — लढाईच्या जागेवर — जाण्याकरितां मी लिहिलें होतें — जावें न जावें अजून ठरलें नाहीं असें मी कळविलें होतें. आणि आजही कळालें काय बरें असेल? माझें नक्की ठरल्या खेरीज मी आपणास लवकर ~~[illegible]~~ कळविणार नव्हतो परंतु त्यांवर दृष्टी ठेवून मी त्यावेळीं लिहिलें होतं त्यावेळीं मला अल्पावधीचा ती हकीकत आधीं कळवली पाहिजे असें वाटलें, म्हणून मी लिहिलें. आतां तिकडे जाण्याची इच्छा असतां कां गेलो नाहीं याचें कारणही मी तुम्हांस यापूर्वीच कळवायला पाहिजे होतें. पण कांहीं कारणाकरितां कळविलें नाहीं. आतां याउपर जाणें म्हणजे ~~[illegible]~~ अशक्य आहे कारण मी एक वर्षपर्यंत युनिवर्सिटीचा 'फेलो' नात्यानें बांधला गेलो आहे. अर्थात कायद्यानें करून करारांत गेलो.

तुमचा अभ्यास कसा चालला आहे? तुमचा डोळ्यांना एखादा विषय समजत नसेल तर मला विचारीत जा — अनुमान नको. अस्तु

कळावें आपला नारायण.

चि. सौ. वहिनीस अनेक आशीर्वाद विशेष —

तुमच्याकडून पत्र मिळत नाहीं. तें कां? मी तुम्हांस उत्तर-लिहित होतो असें वाटून लिहिलें नाहींस काय? असेल — नाहीं तरी म्हणावे आतां परत ~~[illegible]~~ — नाहीं कधीं जाणार. बरं तर रहावयाचा घरं नसेल कारण आणि दुसरी कुठें राहून गेलेंना? येथें तुमच्या आईच्या घरीं तू काय करीत आहेस? कांहीं वाचतेस काय? कळावे — आपला विनंती लक्ष्य देऊं नको.

नारायण.

Letter No
49

282

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America
29th 11-14

॥ Ram ॥

~~my dear Ramu~~

Yours of 23rd oct to hand on 26th Nov. Glad to read. You say you received yours as well as your wife's letter & as she is not there you are writing for her. But Ramu, why were you not writing for her or rather why were you not asking her to write while she was there. I was not so fortunate enough to get a single line from her although I wrote several times. One word from a husband to his dear wife would have brought me a sweet letter — meant only to improve the relation & brotherly affection we had already & to improve the hand & language of our female department of Shevade's family. Will you do that when she returns back? Please, I shall be highly obliged to you for that.

Letter No
49

॥ Ram ॥

U of michigan
Ann Arbor, Mich
U. S. America
29-11-14

My dear Vinayak,

Received yours of 23rd oct. Glad to read. Your exam. I guess is now over & by the time you receive this letter you might have gone to Poona for education. I don't know yet. However I may learn from you about your result in January. I am glad you boast of my age; but I don't understand why you do so. What is the reason of it. Please don't forget to write.

Winter in Ann Arbor hasn't yet really commenced. Sometime we get snow rain. But the climate is just like Hubli. I enjoy it. In the next month, from ~~at~~ the last week, the real winter

Ramu, I know you never disappointed me before. So, I want to request you to urge your wife to write to me. I want to strengthen the work which I intend to do when I return home & I want her & other female cooperations. To receive a co-operation from Women, we ought to be free with them, & they ought to know the way to ~~become~~ familiar with the males with whom they are to come in contact in their after life. This is the draw back in our society & I want to set an example through my sisters at home. I want your wife to co-operate in this, will you see that she does so? Please.

You might read the letter No 48 written to Tatya last time. You will understand good many things.

I am doing well & hope the same with you all.

Yours affectionately
Narayan

---

will begin & we shall have to walk on snow. I am sure we shall stand that horrible cold climate as we have received a lesson first at the very begining of our American life.

In Ann Arbor ~~we~~ there are five Hindu students. We 3 (from our side) & the rest two one from Bengal & the other from Punjab. The Bengalee is studying Chemistry while the Punjabee — medicine. All except Natgir & Aurklikar live seperate — far from each other. We meet every day but hold conferances once in a while.

Nothing more for the present.

Yours affly
Narayan

प.सं. [illegible] श्री [illegible] १०१ नारायण पेठ
३ ता. २-१२-१८ २८४ पुणे ४११०३०

चिरंजीव पु. चि. डॉ. नारायण [illegible]

सप्रेम अनेक आशीर्वाद [illegible]

[illegible]

285

POST CARD — CARTE POSTALE

UNIVERSAL POSTAL UNION — UNION POSTALE UNIVERSELLE

BRITISH INDIA

THIS SIDE FOR THE ADDRESS

DEC

Dear Narayan
I am getting on well
with my practice
as well as health.
How are you doing?
nothing more yours
affly
from 2·12·14 G Hardikar
LCPS.

K. S. Hardikar
401 Narayanpeth
Poona City
Bombay.
India

PASSED CENS
To **BOMBAY.**

Dr Narayan Subrao
Hardikar
M.C.P.S.
Michigan University
Ann Arbor
Mich. U.S.A.
America

पत्र नंबर
५०

२८६

॥ श्रीराम ॥

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर: मिश.
यु. स्टे. अमेरिका
ता. ९-१२-५४

ति. रा. वहिनी व पिठ अक्का या उभयतांस नारायणाचे दोनीकर जोडून शिरसा चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार — विनापत्र — गेल्या आठवडी हिंदुस्थानची मेल आली नाहीं अर्थात कोणाचीच पत्रें मिळाली नाहींत. उद्या मिळतील, पहावे तोंपर्यंत तुमच्या कांहीं विशेष आहे का. काय मौज आहे पहा! मनुष्याची किंमत तो स्वतः पुढें असतांना कळत नाहीं. तेंच तो अगदी दूर असला किंवा दृष्टीआड झाली म्हणजे त्यांचे महत्त्व कळूं लागते. घरीं असतांना मला तुम्हां लोकांबद्दल ही विशेष कांहीं वाटत नव्हतें पण आतां घर सोडून वर्षावर महिना होत जसा आला तसें हूं हूं वाटूं लागलें. मधूनमधून आपण किती जवळचे होतो आहोत याची कल्पना होऊं लागली. आपण घरीं केव्हां जाऊं व सर्व मंडळींना केव्हां भेटूं असें सध्या तरी मला झाले आहे खरं — पुढें हीच स्थिती राहील कीं नाहीं हें जरी सांगवत नाहीं तरी तूर्त तरी या विचारांत माझे मन मग्न झाले आहे हें निश्चयानें सांगतो आहे. गेल्या वर्षांत मला असें कधींही वाटले नाहीं. गेल्या वर्षी पैशासाठीं मला मानसीक त्रास बराच झाला असें असूनही कांहीं वाटले नाहीं आणि यंदा वर्षी मला पैसे मिळाले असूनही अशी स्थिती झाली — अशी स्थिती म्हणजे घरच्या मंडळींची आठवण व तिकडे जाण्याचा ध्यास — पैशाच्या व्यतिरिक्त मी ज्यावेळीं होतो त्यावेळीं माझ्या मनांत जे विचार खेळत होते ते अभंगाच्या रूपानें आज आपणाकडे पाठवीत आहे. हे अभंग डायरीमध्ये ठेवले होते. पण पाठविण्याचा प्रसंग आजपर्यंत आला नव्हता तो आज आला. असो — माझी प्रकृती बरी आहे. जेवण खाण यथा तथा चालले आहे. थंडी अद्याप सुरू झाली नाहीं. केव्हां होईल हें आतांच सांगवत नाहीं. मुलांच्या प्रकृतीस जपत असावे उत्तर देणेस कळावे. आपला नारायण

चि. [illegible] नारायणाचे अनेक आशिर्वाद विशेष:-

तुझे पत्र — हिंदुस्थानची मेल न आल्यामुळे — तुझा फोटो अगर पत्र मला गेल्या आठवडी मिळणे दुर्घट होते. कदाचित उद्यां मिळेल. पहावे. ~~[illegible]~~ मी मिनियापोलिसहून ॲन आर्बरला तारीख २ ऑक्टोबर रोजी शिक्षणासाठीं आलो; त्याला आज दोन महिने तीन दिवस झाले. तारीख २ ऑक्टोबर पासून आतांपर्यंतचा माझा काळ बराच [illegible] मंडळींत गेला. म्हणजे अलीकडे तुम्हां सर्वांची मला अतीशय आठवण होऊन मी घरीं केव्हां जाईन असें झाले आहे. रोज स्वप्ने सुद्धां तींच. परंतु काय करणार! केव्हां केव्हां वाटते कीं अभ्यासही बरोबर होत नाहीं; असो, माझी थोडी थोडी हकीकत तुम्हांला या पूर्वी कळविली आहेच. आज थोडी शी विस्तारपूर्वक कळवीत आहे. [illegible] प्रत्येक ठिकाण [illegible] वार्षिक [illegible] जाईल. येथल्या [illegible] पहिल्या आठवड्यात माझ्या फुलांच्या प्रतिमा फोटोसह [illegible] आपणाकडे रवाना करीन. अर्थात त्यांचा इकडून तुझकडे येईल.

मला विश्वविद्यालयाकडून वर्षाला तीनशें डॉलर जरी मिळताहेत तरी बॅंकेचें कर्ज आहे. तरी तें कर्ज फिटलें जावें व पुनः कर्ज होऊं नये म्हणून मी जेवणाकरितां काम करूं लागलो. खाणावळीतून जेवण केलें म्हणजे महिन्याला ४० रुपये खर्च. बरें हातानें करून घेतलें तर २५ रुपये खर्च. कसेंही केलें तरी परवडत नाहीं. ४० किंवा २० रुपये खर्च अगदीं बेताचा. म्हणून तेवढे पैसे वाचवून कर्ज फेडावें या हेतूनें काम करूं लागलो. कामाकरितां जास्त वेळही लागणे शक्य नाहीं, हें मला माहीत होतें. (एका खाणावळीत स्वयंपाकाची भांडी धुण्याचें काम मी सुरुवात म्हणून घेतलें. दुसरें चांगलें काम मला मिळालें असतें पण मला अगदीं खालपासून वरपर्यंत अनुभव घेण्याची इच्छा होती. ५५ दिवस तें काम केलें. कॉस्टिकसोड्यानें बोटांचा हाल होऊं लागले व मलाही [illegible] येऊं लागल्या म्हणून हळूच निमित्त करून काम बदललें. [illegible] पायरी वर चढलो. मी टेबलें पुसूं लागलो. नंतर ५ दिवसांनी चमचे, चाकू, काटे पुसण्याकडे बदली करून घेतली. पण त्या खाणावळीत माझा बराच वेळ जाऊं लागला. सकाळी ९ ते १०, दुपारीं १ ते २ व सायंकाळीं ६—७॥ असें काम करावें लागे. केव्हां केव्हां एखादा तास ज्यास्त लागे. मला अभ्यासाचा वेळ कमी मिळूं लागला म्हणून हळूहळू निमित्त करून मी ती खाणावळ सोडली. सोडण्यापूर्वीं हॉस्पिटलमध्यें काम मिळण्याची खटपट करून ठेवली. तेथें चाकू, चमचे, पुसण्याच्यावरची पायरी मिळाली आणि ती वाढण्याची (Table Waiting) होय. सध्यां तेथेंच काम करीत असून कामाची वेळ सकाळीं ~~६॥~~ ७॥ दुपारीं १२ ते १ सायंकाळीं ५ ते ६ काम विशेष नसतें. लोकांची ताटें वाढून घ्यावयाचीं व तीं त्यांच्या त्यांच्या टेबलावर ठेवावयाचीं; जेवणें आटोपलीं म्हणजे टेबलें स्वच्छ करावयाचीं व निरनिराळे चाकू, चमचे, काटे व बशा मांडून ठेवावयाच्या. आम्हांला जेवावयाला ब्रेड, रोट, दूध व भाज्या मिळतात. आम्हीं मांस खात नाहीं म्हणून आम्हांला दुधावरील साय (Cream) देतात व इतर भाज्या देतात. एकूण काम बरें चाललें आहे. याशिवाय मी इतर काम करीत नाहीं. व करण्याची मला जरूर नाहीं कारण मला एक वर्ष पुरेल इतका पैसा विश्वविद्यालयाकडून मिळत आहे. कर्ज फेडण्याकरतां थोडा पैसा पाहिजे आहे तो त्याकरतांच गोळा करून पाठवून देईन.

तुझी प्रकृती बरी आहे ना? अभ्यास कसा चालला आहे? उत्तर पाठव.

तुझा नारायण

Letter No
50

|| Ram ||

University of Michigan
Ann Arbor. Mich
U. S. America
6-12-14

My dear Ramu

Nothing from you all. May, perhaps, receive tomorrow. I have written to you last week about requesting your wife. I want to ask you the same thing today. Have you done that? Please write me your ideas upon that. Don't think me otherwise. Think & expand your views for a time & write of what you observe. Don't despise me by writing only two times 'Allright' 'safe' etc. & "don't write anything I have no time" etc. I want you to be free.

Letter No
50

|| Ram ||

University of Michigan
Ann Arbor. Mich
U. S. America
6-12-14

My dear Vinayak

If you go to Poona, protect yourselves from the bad company of student & other classes. Remember you are going to a place which is noted for its गुंडगिरी as well as education. Which of these you ~~who~~ want to master? First or the second? Write me. Keep yourselves away from bad habits — such as smoking, hot drinking, drinking, turning arrogant, going after girls etc. Remember that you are in a quite new place ~~to you~~ You ought to keep your fathers as well as family reputation and do your duty towards your Countrymen. You are to pick up every good ~~thing~~ by observing things. Open your eyes, look arround, keep silent & try to please all, so that you will learn something. Don't be dis spirited

How far has dear Gangutai advanced in her reading & writing? Do you help her every now & then. If not please do help her. Keep a strict watch & see that she does every thing in a satisfactory manner. Let me see whether you write some thing about your wife & dear sister. More in my next.

Yours affly
Narayan

---

if you happen to meet difficulties. Be alert to give your phisical, mental, & pecuniary assistance to those who need it at your own cost. In short be human, & achieve the goal of your mission ~~to~~ in this mortal world.

Young boys like you, when they go to cities like Poona & Bombay, ~~begin~~ are tempted at good many things. The trap of temptation is laid in such cities, & boys, when they don't observe minute are caught in the trap & are lost for ever to the we~~half~~ of the community. That is always the case. We have known good many examples of this sort. So, my boy, take care & be observant.

More after I read yours — Your affly
Narayan

While in India I was teaching you to walk an american walk. But here I am to learn from these people. Do you walk that way I taught you? If not try ~~to you~~ to do so.

How is Dhongadi? & all your friends? Do you go to Sachitra Bharat Office? How is that going on?

Please convey my B.L. to all my friends.

Nothing more
Yours affly
Narayan

Letter No 291
50

"Ram"

University of michigan
ann arbor; mich
U. S. America
6-12-14

my dear Balu

Since you left Hubli for Solhapur you did not write me. Why so? Balu, Now that you are in the sixth standard you ought to be a good & intelligent boy. I am told ~~th~~ your manners are very good. they say ~~that~~ you have a good system of work. I want to know which is that. Will you write?

American people are very fast walkers. there are two reasons for this. One is they are very busy; second is by walking fast in Winter a man gets himself warm. He does not feel cold.

Letter No 292

51

"Ram"

University of Michigan
Ann arbor, Mich
U. S. America
13th Dec 14

My dear Ramu

Sorry to hear that you lost your grand-mother-in law. Don't be disheartened. Be satisfied at the real mother-in-law. Oh my dear Ramu, don't be sorry for that. Wipe off your tears from your beautiful cheeks & start your work. Your wife might be there by this time & I am sure she will give you some courage. I guess your father-in-law is safe. Is he not? —— Away with joke!!! I am doing well & hope

University of Michigan
Ann arbor, Mich
U. S. America
13th Dec 14

Letter No

51

"Ram"

My dear Vinayak

Yours to hand. Glad. Yes! I guess you have written to Kamala Devi. ~~to~~ Read her Remarks of your letter ——

"As to dear little sister I think her letter most dear, intelligent in questions & a hand writing not unlike your own. I do wish she could get interested in this work in which I feel much encouraged even with the heap of obstacles which I have met!"

So, you see, dear Vinayak, how Kamala Devi has remarked upon your (Gangutai's) hand writing & questions. You shall have to keep the same hand through out & answer her letters at the

the same with all of you. How is your work going on? — Send then your Photo —

N S Hardikar

चि. गौ. कावेरी स अनेक आशीर्वाद विशेष! —

तुझें पत्र पोंचले मजकूर समजला – पुढील खेपेस ज्यास्त लिहीन —

earliest convenience. Ask very nice questions ~~to~~ supposing yourself a girl (I am sure you will not mind it for Gangutai's sake). Put yourself amidst female circle thinking that you are a fine, bright & beautiful lady without a husband & with no better prospects of future life. See what you observe, note down what you think - ask questions to girls of your age & suffering the same difficulties & enduring the curse of widowhood. When you do that, give a little time to consider ~~the use~~ how a widow like you shall be of some use to her country & ~~then~~ what knowledge would help the widows most. Then ask questions to Kamala Devi & her friend in New York.

Hoping to be excused for the simile

Your affectionate
Narayan

पत्र नंबर
५१

॥ श्रीराम ॥

मिशिगान विश्वविद्यालय
आन् आर्बर, मिश.
यु. स्टे. अमेरिका
ता. १३.१.२०.

ती. गं. वहिनी व चि. अक्कू यां उभयतांस नारायणाचे दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणी मस्तक ठेवून नमस्कार — विज्ञापना — माझी प्रकृती ठीक आहे. काळजी नसावी — इतर मजकूर मुलांच्या पत्रावरून. आपला नारायण —

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद — तुझें तारीख २८ ऑक्टोबरचे पत्र तारीख १ डिसेंबर रोजीं मिळालें. आनंद झाला. अमेरिकेच्या माझ्या प्रवासाच्या हकीगती तुजपर्यंत गेल्या नाहीं हें तर तुला दिसतेंच आहे. अर्थात तुमची एक काळजी तर दूर झाली. आतां कुठली काळजी तुम्हांला करण्याचा संभव आहे — ती कोणती तर या थंडीच्या दिवसांत मी जिवंत राहतो कीं नाहीं. थंडी अजून सुरवातही झाली नाहीं. फक्त तुफान कोठें पडले आहे इतक्यांत आमची स्वारी दोनदा रस्त्यांत आदळली सुद्धां. आतां पुढें तीन महिन्यांत कितीदा साष्टांग नमस्कार घालणार हें मला कळत नाहीं. असो — तरी काळजीचें कारण नाहीं.

इतक्यांत तूं पत्रें घालतीस पाहिजेत असें माझें तुला सांगणें नाहीं. तुला केव्हांही तुझ्या आईच्या, चि. अक्कूच्या व भावाच्या आज्ञेत राहिले पाहिजे व ते सांगतील तसें केलें पाहिजे असें मी मागेंच सांगितलें आहे व एकदां पत्रांत तुलाही कळविलें आहे. त्यांच्या शब्दाबाहेर केव्हांही जरी जावयाचें नाहीं तरी ते सांगतात म्हणजे तुला तुझा नेहमीचा अभ्यास मात्र बिलकूल सोडावयाचा नाहीं. या बाबतींत तुला कोणाचेंही ऐकावयाचें नाहीं हें मात्र ध्यानात धर. एखादेवेळीं त्यांच्या सांगण्यावरून किंवा कशाकरतां माझ्याशीं पत्रव्यवहार बंद केलास तरी चालेल परंतु वाचनव्यासंग चालू ठेव. आयुष्याच्या शेवटीं जो माल तुझी आई, भाऊ अगर इतर कोणीही मदत करणार नाहीं तो तुझें तुलाच मदत करावें लागणार. आणि तें वाचन, लेखन, वगैरेनें याच्या मदत करावें पाहिजे. मी स्वतंत्र नाहीं, शहाणी नाहीं, म्हणून सतत म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. केव्हांही आपण शहाणे आहों स्वतंत्र आहों असेंच समजत असून काम करावीत तरच फायदा होतो. स्वतंत्र नाहीं म्हणजे काय? आपल्याच ज्या गोष्टी करावयाच्या असतात त्या करण्याकरतां इतरांची मनें वळविलीं कीं मनुष्य हळू हळू स्वतंत्र होऊं लागतो व त्याचें इच्छित कार्य तडीस जातें. खरें पाहतां आपण कोणीच स्वतंत्र नाहीं. मी पुरुष असलो तरी, किंवा शहाणा असलो तरी परतंत्र आहे कारण केव्हां केव्हां मी मायाजालांत गुंडाळला जातो. मी अमुक एक गोष्ट करीन म्हटलें तर मजजवळ पैसा नाहीं अर्थात दुसऱ्यावर अवलंबून राहवें लागतें — म्हणजे परतंत्र आहे. देशाकरतां अमुक करीन म्हटलें तर

तर सरकार आड येत — अर्थात मी परतंत्र आहे. बरें गहाणा आहे म्हणावे तर तसेंही नाहीं. ~~[illegible]~~ परंतु मी केव्हांही स्वतःला हीन कोटींत ओढवून घेत नाहीं. सतत चांगल्याच स्थितीचा मी अनुभव घेतो — तुझें अगर कुणाचेंही असेंच आहे. सर्व गोष्टी मनावर अवलंबून आहेत. करितां मनाला धडा द्यावा.

कमलादेवीचा पत्रें पाठवायची. तुझी आई व माझ्या व इतर कोणी नको म्हणणार नाहींत. कारण ही पत्रें केवळ तुझ्या नावाने विनायक लिहील. कमलादेवीशीं मी स्वतः पत्रव्यवहार ठेवणार आहे व तिला तुझ्याशीं पत्रव्यवहार ठेवावयाचा ही कळविले आहे. याचे कारण तुझ्या एकटीचाच फायदा व्हावा म्हणून नव्हे तर महाराष्ट्रीय सर्व भगिनींना त्यापासून फायदा व्हावा. स्त्रियांच्या मतें कोणकोणत्या गोष्टीची जरुरी आहे, त्यासंबंधाने तुम्हांला व तिला परस्पर पत्रें लिहून खुलासा करून घेतां यावा म्हणून ही तजवीज केली आहे. तूं घरांतील सर्व स्त्रिया, टेंबे यांच्या घरामधील स्त्रिया, व इतर भगिनी यांच्यामध्यें कमलादेवी कडून आलेल्या पत्रांतील मजकुराची चर्चा करावी — व सर्वांना विचारून काहीं प्रश्न मालिका तयार करावी. ती प्रश्ने मराठीत स्वतः लिहून विनायकाकडे द्यावीत. मग विनायक कमला देवीला इंग्रजीत ती प्रश्ने विचारील. या प्रश्नांची उत्तरे चांगली असल्यास ती वर्तमानपत्रांतून अगर मासिकांतून प्रसिद्ध करावीत. यायोगें स्वतःच्या मनाचा विकास होतो व आपल्याच बऱ्याच गोष्टी कळू लागतात. मला परवाच कमला देवी कडून पत्र आले असून तिने तूं (म्हणजे विनायकाने) लिहिलेल्या पत्राची विशेष तारीफ केली आहे. विनायकाच्या पत्रांत तिच्या पत्राचा एक उतारा दिला आहे.

मंगलाई, सध्या विशेष काहीं नाहीं — माझी प्रकृती बरी आहे. काळजीचे कारण नाहीं —

कळावे आपला

नारायण

पत्र नंबर २९४
५२

मिचिगान विश्वविद्यालय
ॲन आर्बर; मिच
यु. स्टे. अमेरिका
१२-२०-१९१९

॥ श्रीराम ॥

चि. रामूस अनेक आशीर्वाद विशेष:—
तुमची मागील आठवड्याची पत्रें पोंचली. आनंद झाला. माझी प्रकृती बरी आहे. काळजी नसावी.

आपला नारायण.

चि. गंगूताईस अनेक आशीर्वाद — तुझें तारीख ६ नोव्हेंबरचें पत्र काल मागील आठवड्यांत पोंचलें. मजकूर समजला. पत्रास उत्तरें वेळेअंती लिहीन. सध्यां माझा बिलकूल वेळ नसल्यामुळें विशेष कांहीं लिहितां येत नाहीं. क्षमा असावी. प्रकृती बरी आहे. अभ्यास कसा चालला आहे? कळविणे. ति. गं. मामी व पिलुअक्कांस त्यांच्या नावाप्रमाणें माझा शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करणे. विशेष कांहीं नाहीं.

कळावे तुझा नारायण

चि. विनायक व बाळकूस अनेक आशीर्वाद —
तुमची पत्रें पोंचली आनंद झाला. अभ्यास कसा चालला आहे? सध्यां आम्हांला नाताळची सुटी मिळाली आहे. तारीख ५ जानेवारीला विश्वविद्यालय पुनः उघडेल. तरी आमचा अभ्यास चालू आहे.

कळावे आपला
नारायण.

Please inform Haribhau that he will receive from me next time Narayan

ANN ARBOR
DEC 2
7 PM
1914
MICH.

U.S. POSTAGE
ONE CENT

U.S. POSTAL CARD
ONE CENT
McKINLEY

THIS SIDE OF CARD IS FOR ADDRESS

BOMBAY
PASSED CENSOR

India

R. K. Shevade
Esq
Shevade Tembe Co
Hubli
Bombay Pres, India

पोच ता.
२७-११-५८

श्रीरामचंद्र 285 नारायण पेठ
पुणे शहर

प्रियबंधु चि. डॉ. नारायण [illegible]

[illegible]

[illegible]

296

POST CARD   CARTE POSTALE

UNIVERSAL POSTAL UNION   UNION POSTALE UNIVERSELLE

BRITISH INDIA

THIS SIDE FOR THE ADDRESS

PASSED CENSOR,
BOMBAY.

POONA
28

Dear Narayan
Your last Post Card
to hand. I am doing well.
Wishing you practice & health.
Be writing always
Yours
L S Hardikar

From
L.S. Hardikar
401 Narayanpeth
Poona city
Bombay
India

To

Dr. Narayan Subrao
Hardikar
M.C.P.&S.
Michigan University
Ann Arbor
Mich U.S.A.
America

Letter No
53

" Ram "

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America
27-12-14

My dear Vinayak

Yours of 13th Nov. to hand. Glad to read the contents. I guess that you will not go to Poona till May 15. If you don't go teach dear Gangutai. Begin to teach her Geography of India & the world. By Geography I mean not the very detailed information but very broad ~~[illegible]~~ things. She should know where Europe is, To what they call Ocean & sea — The route to America & Europe. The situation of Japan & China. Teach the broad facts of the Indian history too. Don't fail to do so. These are the days when you can do so. Please consider

[illegible]

Yours affly
Narayan.

Letter No
53

" Ram "

U. of Michigan
Ann Arbor. Mich
U. S. America
27-12-14

My dear Balu

Yours to hand. Glad to read the contents. Has not yet Pitu akka come from Sholapur! For how many days will she be there? How are you going on with your study? Please write. Nothing more for the present.

Yours affly
Narayan.

Dear Balu —

Please see the accompanying letter ([illegible]) to Venkatrao Anklitkar Esq is dispatched to the proper address at once

My dear Bapu

Yours to hand after a long time. Glad to read the contents. I am sure to know the result by the 1st week of February. Don't fail to write if you haven't written before ———— If you are at home in vacation teach Gangutai - some Geography more in my next.

Yours affly
Narayan

My dear Dhongadi

Yours to hand. Glad. Be always writing. I am sorry I have no time I may write some time after. Excuse

Yours sinly
NHardikar.

पत्रांक
५३ [illegible]
वर्ष २५

॥ श्रीराम॥

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिश.
यु. स. अमेरिका
ता-२७ १२/५४

ति. गं. काकीस व पिळू अक्कास बाळाचे दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार. विनंतिविशेष — आपल्याकडून आशीर्वाद आला नाही. का? कळत नाही. कृपा करून दर रविवारी पत्र पाठवत जावे. सध्या माझी प्रकृती बरी आहे. [illegible] [illegible] आहे. औषधाच्या लेपावर काही परिणाम होत नाही. [illegible] (मद्रास) [illegible] होण्याचा फार संभव दिसत आहे. काय होईल ते सोसले पाहिजे. असो — तुमच्या प्रकृतीस संभाळून असावे. कळावे आपला नारायण

चि. मंगलाईस अनेक आशीर्वाद — तुझे तारीख १३ नोव्हेंबर ५४ रोजीचे (नं. ४८) लिहिलेले पत्र काल तारीख २६ डिसेंबर रोजी पोचले. आनंद झाला. तुझा, सिंधूचा, बापू, हरिभाऊ व भास्कराचा असे तीन फोटो आजरोजी पोचले. सध्या नाताळची [illegible] सुटी आहे अर्थात तुमच्या सर्वांच्या फोटोवर [illegible] ते [illegible] मी विचार केला आहे.

तुझा फोटो — तू कोणाकडे तरी खुर्चीवर बसली आहेस. फोटो काढून घेताना तुला आनंद झाला आहे. का ते मला कळत नाही. [illegible] तू अखंड, [illegible], [illegible]. चेहरा हसतमुख आहे [illegible] आनंदी नव्हे तर हा आनंद [illegible] असल्यामुळे तू [illegible] [illegible] तरी तो आपोआप [illegible] झाला असता. [illegible] वर्णन, म्हणजे मी तुझा [illegible] पाहून तो फोटो [illegible] पर्यंत [illegible] अवस्थेत तू [illegible] असावीस असे दिसते. तुझ्या गाण्यावरून ही परिस्थिती असे नव्हे तर तुझ्या [illegible] हीच परिस्थिती होत आहे. फोटोत तुझा चेहरा [illegible] असे मला वाटले होते पण तुझे डोळे [illegible] आहे. मी जर 'सर्जन' झालो असतो तर यापेक्षा तुझ्या गाण्यावरील [illegible] तुझ्या नाकावर [illegible] आणि ते नाक [illegible] केले असते. पण तुझ्या दुर्दैवाने मी सर्जन न होता [illegible] झालो आहे. [illegible] सर्जन करून तुझे नाक [illegible] माझी तयारी नाही. [illegible] तेच [illegible] पाहिजे. विचार [illegible] आपल्या हातातली [illegible] कोणाच्या [illegible] म्हणजे तू ती [illegible] उजव्या [illegible] बोटाने [illegible] आहेस. तुला का अशी भीती वाटली कळत नाही. [illegible] अशी तुला भीती वाटली असल्याने [illegible] [illegible] हातातल्या [illegible] [illegible] [illegible]. तुझ्या [illegible] [illegible] असे दिसते. असो. [illegible] फोटो असा आहे. फोटो पाहून आनंद झाला — तुझा फोटो [illegible]

कधीही पत्रावाचून [illegible] तुझ्या आठवणीत तुझी चिंता [illegible]. व असेच फोटो पाठवीत जा. तुझे स्वतःचे वर्णन [illegible] दिवसात पाठवल्यास बरे होईल.

किंशुकचा ~~फोटो~~:— ही आणखी सुरेख निघून बसली आहे. ती अभ्यासाबद्दल तिला किती महत्त्वाकांक्षी आहेत परंतु [illegible] एक भीती तिच्या मनात [illegible] असावी. या भीतीने [illegible] वाव देणं येईल. दिगू तरी फोटोच्यावेळीं तिच्याजवळ उभा असावा; अगर इतर काहीं मंडळी असावीत. तिच्या [illegible] ठळक पहा. सर्व अंग आखडून घेऊन बसली आहे. तिच्या पायाकडे पहा. ते कसे ठेविले आहेत. तिने आपला पदरही नीट नेटका आवरून घेतला नाहीं. पूर्वीच्या बंगल्यावर घेतलेल्या फोटोत व या फोटोत बरेच अंतर दिसून येते. असो —

बाळू, हरिभाऊ व भास्कर यांचा फोटो — हरिभाऊ — [illegible] बसलेल्या गुंड सरदाराप्रमाणे दिसत आहे. [illegible] केस बरेच उंच असतात, व [illegible] असतात. हरिभाऊ अशा लोकांपैकी एक दिसत आहे. याची [illegible] फोटोत [illegible] दिसतो तसा हा फक्त दिसतो. बाळू अंगाने जरी विशेष पुष्ट नाहीं तरी दिसण्यात बराच पुष्टसा आहे. त्याच्या तोंडावर पडलेल्या प्रकाशामुळे [illegible] हे गृहस्थ (स्वतःच्या घरीच 'बाळ' बनले असतील असा संशय येतो पण तो खरा आहे. भास्कर पायातील पायजमा, बूट, हातातली काठी, [illegible], डोळ्यावरील चष्मा [illegible] पाहून "ओळखणार दिसतात आपले रावसाहेब" असे उद्गार काढल्याशिवाय [illegible] विशेष [illegible] पाहिजे असतो [illegible] येईल व 'इतर हे काय बाई' म्हणून आपल्या [illegible] असे वाटल्याशिवाय राहवत नाही.
भास्करचा चेहरा [illegible] असावा तरी हे विवेकी पोर प्रयत्नशील दिसत नाहीत असे यांच्या केसांच्या भांगावरून दिसते. बाकी गंभीर आहे.

सर्वांचे फोटो पाहिल्याबरोबर प्रथम मला असे वाटले की मी एखाद्या खेड्यात असेन. तरीही [illegible] बोलत बसलो आहे. [illegible] व पाहिल्याने [illegible] मी अर्धवट [illegible] तिचे फोटो ठेवले नाहीत. बाळूचा फोटो खेडेगावातील एखाद्या पाटलाप्रमाणे दिसला. [illegible] लावलेल्या खेडवळ नटासारखा दिसतो तसा मला बाळू दिसला. खेड्यातील पोरांना [illegible] सोडणाऱ्या गावगुंडाप्रमाणे हरिभाऊ दिसला, आणि भास्कर ~~[illegible]~~ मोठ्या सुधारलेल्या शहरातून [illegible] गेलेल्या तरुणाप्रमाणे दिसला. माझी नजर [illegible] बाळूशी व किंशुकशी [illegible] कारण तिला [illegible] व आजारामुळे तिच्यात [illegible] होय. असो.

होय! मंगलाई [illegible] माझ्या मनांत बराच फरक झाला आहे. माझी धार्मिक, सामाजिक, राजकीय इत्यादी मतें हळूहळू बदलू लागून ती तुझ्या ही उलट बाजूची आहेत. ~~[illegible]~~ उदाहरणार्थ मी घरीं असताना सोवळ्याबद्दल [illegible] वागत असे हे तुला माहीत आहे. आताचे माझे सोवळ्याविषयी मत आज रोजी [illegible] पाठविलेल्या 'स्वच्छता' या लेखांत दिले आहे. ते वाचल्यानंतर तुझे काय मत होते ते मला कळव. माझे वहिनीला मी तुझ्या सासरच्या मुलींना घरांत ~~[illegible]~~ शिवण ~~[illegible]~~ येत नाहींत हे वाईट होय वगैरे बद्दल लिहिले होते. आणि वहिनींनी यावरून याबद्दल मी प्रसिद्ध करतो असे म्हटले होते. ~~[illegible]~~ 'स्वच्छता' लेखांत मी त्याच्या उत्कट [illegible] आहे. त्याबद्दलही तुम्हां सर्वांचे अभिप्राय कळवा. [illegible] इकडे मी जे गद्य पाहिले [illegible] नीती रिवाज [illegible] ज्यामुळे आपल्या देशांत 'जनतेचा ऱ्हास' होऊन [illegible] मला बरोबर [illegible] आहे. [illegible] दिसतो त्याचे कारण तरी हेंच.

आज आर्थिक [illegible] देणार नव्हतो तो आठवडा [illegible] तुम्ही [illegible] फार कठीण आहे. आज आर्थिक येत नाहीं अशी [illegible] मी समजून [illegible] होती. [illegible] पुरोहित जातीबद्दल [illegible] पुरोहित जातीची [illegible] इच्छा नव्हती. कोणकोणत्या [illegible] म्हणून म्हणतो हे पाहून [illegible] असें उद्गार [illegible] वाटले होते. तू तुझ्या [illegible] — [illegible] पुढें [illegible] — [illegible] बोलून दाखवावेस! माझ्या [illegible] अजून कांहीं लिहिले नव्हते. [illegible] ओळखी गेले नकोत. अजून पैसे नाहीत म्हणून शाळा सोडली नकोती. माझ्या अनेक प्रयत्नांपैकीं [illegible] हा एक प्रयत्न होता [illegible] तुमच्या [illegible] ~~[illegible]~~ [illegible] त्यामुळे माझा [illegible] — मी कधीही [illegible] येत नाहीं हे तुला माहीत आहेच. [illegible] पाठ फिरविली व अल्प काम करून येतो. असो — फोटो पाठवले आहेत [illegible] — काहीं [illegible] नये. [illegible] किंशुक ~~[illegible]~~ फोटो [illegible] असतें तर [illegible] असतें. [illegible] फोटो असतील तर [illegible] फोटो पाठवीत म्हणून मी म्हणतो [illegible] प्रचीती येईल. मंगेश — [illegible] विशेष कांहीं नाहीं.

प्रकृती बरी आहे — कळावे नारायण.

कुठीक [illegible] मी माझी दुसरीकडे पाठवीत आहे. आम्ही [illegible] असे दोन फोटो पाठवीत — मी [illegible] निघून एक [illegible] जुने फोटोची वर्णने दिली आहेत तरी तूही [illegible] येत नाहीं म्हणून रडू नको. नाना —

चि. अंबरीनास अनेक आशीर्वाद विशेष:

दुसरा फोटो तू पाठवून दिला नाहीस का? कळव. अजून तुझे किती दिवस राहणार आहेस? तुजकडून पत्र नाहीं. घरी कांहीं [illegible] असेल तर [illegible] पुन्हा कळवशील? स्मरण असावे.

तुझा नारायण

Letter No
53
Last of the
1st year.

302

॥ Ram ॥

University of Michigan
Ann Arbor. Mich
U. S. America
27-12-14

My dear Ramu

Your's to hand. Please read dear Gangutai's letter. My second visit of the year 1914 will be sent to you next time. A single photo & a group of three of us. See what remarks you will pass if you have time at all. I am doing well & hope the same with you all,

Yours affly. Narayan.

श्री. वेंकटराव अंकलीकर यांचे नांवे जे चिठ्ठीवजा केलें ठेविलें आहे ते वाचल्यानंतर व वहिनीस वाचून दाखविल्यानंतर लवकरात लवकर त्यांच्या पत्त्यावर रवाना करावें.
चिरंजीव नारायण

Address the letter to Sj. Dattatray Venkatesh Anklikar Esq Pleader
Gadinglaj
Kolhapur State

पत्र नंबर 303
2/२

॥ श्रीराम ॥

मिशिगान विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिश.
यु. स्टे. अमेरिका
३ जाने १५

चि. गंगूताईस नानाचे अनेक आशीर्वाद विशेष:-

तुझें तारीख २९ नोव्हेंबर '१४ नंबर ४८ चे पत्र मला तारीख ३० डिसेंबर रोजीं पोंचलें. हें पत्र धारवाडहून लिहिलेलें असून यांत तुझ्या मनाची स्थिती प्रदर्शित केलेली आहे. पत्र वाचून वाईट वाटलें असें नको म्हणूं. म्हटलें तर वाईट वाटावयाचें कधीं तरी राहील काय? स्वतःच्या प्राणापेक्षां प्रिय असणाऱ्याला कोणाही तऱ्हेनें सुख जर होत नसेल तर वाईट वाटूं नये तर आणखी काय व्हावें? माझ्या [illegible] मनावर आईच्या मृत्यूचाही परिणाम झाला नाहीं; माझ्या डोळ्यांतून एकही आसव बाहेर पडलें नाहीं. मी कांहीं दुःखाच्या डोंगरांतूनच आतपर्यंत जरी वाट काढीत असतो तरी माझ्या मनावर त्या दुःखाचा यत्किंचित परिणाम होत नाहीं; आजपर्यंत कधीं झाला नाहीं व पुढें होणार नाहीं; पण, पण गंगूताई देशांतील दुःखी लोकांकडे पाहिलें म्हणजे जीव तिळतिळ तुटून येतो. हृदयांत एकदम उमाळा येतो आणि भडभडून येतें. सुधारलेल्या देशांतील सुखसाधनांच्या या सर्व साधनांकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं आपल्या लोकांना हाल-अपेष्टेतच मरण्याची पाळी येणार काय? अरेरे, तुझ्यासारख्या दुःखी स्थितीचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें म्हणजे आपल्या समाजांतील सामाजिक रीतींत एकदम फरक करावा असें वाटूं लागतें, व तावडतोब अमेरिका सोडून दुबळीस निघून जावें असें मनांत येतें. पण जाऊन करणार काय? हा प्रश्न पुढें आला कीं कांहीं नकोसें होतें. माझ्या कार्यांत मला कोण साहाय्य करणार? मला मदत कोणाची होणार? हिंदुस्थानांत न जातां आतां येथेंच आपलें आयुष्य घालवावें असें वाटूं लागतें. पण तुझी, बाबांची व इतरांची पत्रें आलीं कीं मन बदलतें. मला मदत करणारी मंडळी आहेत, माझ्या प्राणास आपला प्राण असें मानणारे अनेक जण आहेत, मी न गेल्यास त्यांना वाईट वाटेल, त्यांना दुःख होईल असें मनांत येतें आणि तावडतोब असा निश्चय करतो कीं घरीं जावयाचें. गंगूताई, मी खरा दीन आहे मी तुम्हां सर्वांच्या प्रेमाचा भुकेलेला आहे. ज्यावेळीं तुम्ही तुमच्या प्रेमाचा माझ्यावर [illegible] वर्षाव कराल त्यावेळींच माझ्या मनाची तृप्ती होईल. आणि अशी तृप्ती होण्याकरितांच मी मायभूमीला जाऊं इच्छितो. [illegible] मी [illegible] जाणार [illegible] वस्त्र धाडून व [illegible] मला वाईट वाटलें [illegible] काय? तूं मला वाईट वाटूं नये म्हणून जरी लिहिलें नस तरी [illegible] गोष्ट होईल काय? नाहीं, माझ्या प्रवासांत जर सुख नाहीं तर मलाही सुख नाहीं; सर्वदां तूं [illegible] ध्यानांत ठेव.

घर सोडून अमेरिकेस निघाल्यापासून माझ्या विचारांत बरीच मोठी भर पडली आहे. माझे पूर्वींचे आचार विचार आजी बदलले असें नव्हे तर त्यांत बंधुत्वाची भर पडत चालली आहे. अशा विचारांमुळें आपल्यांत पाहिजे असलेल्या सुधारणांची एकेक नोंद मी आपल्या डायरींत करून ठेवीत असून हिंदुस्थानांत पाय ठेविल्यावेळेपासून त्या अमलांत आणण्याची मी सुरुवात करणार आहे. अनेक सुधारणांपैकीं [illegible] सुधारणा व्हावयाची असून त्यांत मला [illegible] पाहिजे कारण मला स्त्रियांच्या दुरवस्थेचा प्रत्यक्ष उत्तेजन आलेला आहे. तुझी भगिनी

विचार करावयास प्रारंभ करावयाला. यासाठीं फक्त तुझें सहाय्य पाहिजे. तुला 304
जेव्हांजेव्हां जितकें शिकतां येईल तितकें तूं शिकत जा. त्याशिवाय
इतक्यावर माझीं पत्रें तुला शिकवत जातील. आजचें पत्र कुठल्या वर्गाचें
आहे हें ठरव; हें वरील ½ नंबरावरून तुला कळेल. यापुढची सगळी
पत्रें तुला भरपूर माहिती देतील. व प्रत्येक आठवड्यास एकेक निराळा
धडा शिकेल. हा धडा सबंध आठवडा करून ताबडतोब त्याचें उत्तर
मला लिहून कळविलें पाहिजे. १९४५ या सबंध वर्षी म्हणजे जवळून ५२
पत्रांतून तुला शिकविण्याचा मी मानस केला आहे. तूं शिकण्याचें मन
तयार करावें पाहिजेस. इतक्यापैकीं कोणत्याही पत्रांत धडा दवडली
विशेष केली जाणार नाहीं. या दिवसापासून पुढें दुबकीनी पत्रें दुबकी-
च्याला पत्तावर येत राहतील - उशीर राहू दुकानात नेऊन तर पत्राच्या
दिवशीं दुकानात नाहींसा करून ठेवा म्हणजे बरोबर पत्रें मिळतील. पत्राला
मार्जिन सोडलें म्हणजे ~~धर्माच्या~~ संबंधी अशीं शिक्षण पत्रें ~~तुला~~ लिहून
तुला पुस्तक बांधतां येईल. पुस्तकाच्या कागदावर इतरांचा मजकूर
असणार नाहीं. माझ्या आयुष्य वर्षे पैकीं आठवड्यांतील एक तास मी
तुझ्याकरितां खर्च करण्याची तजवीज केली आहे. त्याचा तूं चांगला उपयोग
करून घेतला पाहिजेस. तुझ्याकरितां हें मात्र म्हणजे कांहींच नव्हे. पण तुझ्या
मला स्वतःला बऱ्याच गोष्टी शिकावयाच्या असल्यामुळें तुजकडे विशेष लक्ष
देतां येत नाहीं आपल्याला भक्तेत कांहीं समजून, नवीन गोष्टी, जगांतील गोष्टी
समजून घेण्याजोगी बुद्धी अधीकडे मला येऊं लागल्यामुळें तुजसारख्या मुलीचा
किती मास होत असेल याची मला बरोबर कल्पना करतां येते. आणि अशी
कल्पना करतां येऊं लागली म्हणून मी आजन्म ब्रह्मचर्य व्रतानें राहण्याचा निश्चय
केला आहे. तुजसारख्या अर्भकाला जर कौमार्यावस्थेत सर्व जन्म घालवितां
येतो तर मजसारख्या पुरुषाला कौमार्यावस्थेत राहतां येऊं नये काय असें वाटू लागून
मी माझा दृढनिश्चय केला. स्वतः अशा रीतीनें राहून इतरांस उदाहरण घालून
देतां येण्याजोगें आहे अशी विचारांती माझी पूर्ण खात्री झाली. आतापर्यंत मी
माझें तनमनधन खर्च करणार आहे त्याच कार्यांत तुलाही घेऊन, तुझ्या
जन्माचें सार्थक करावें असें वाटू लागलें. आणि त्याच कार्याची तुला माहिती
होण्यासाठीं मी आतां पत्रद्वारें तुला शिक्षण देण्यास सुरुवात करणार आहे.
त्याकरितां माझीं प्रत्येक पत्रें नीट लक्षपूर्वक वाचीत जा. त्यांत एखादें वाक्य अगर
शब्द न कळेल तर मला विचारीत जा. आणि तुझे विचार विस्तृत रीतीनें स्पष्ट
मांडून लिहीत जा. आतां इतक्यावर मला सुखवावें अशी तुझी इच्छा
असेल तर माझ्या प्रश्नांचीं उत्तरें अगदीं बरोबर देऊन जरा मनापासून
लिहीत जा. प्रारंभीं तुजकडून चुका अधीं येतील अगर प्रश्नांचीं
उत्तरें न लिहितील ^प्रारंभीं^ तर मला अतिशय वाईट वाटेल असें समजून. तरी
हलगर्जी करूं नको. असें सांगण्याचें कारण तुला तुझी विचार शक्ती
वाढवितां यावी हें होय. मनुष्य जसजसा आपलें [illegible]
ज्ञान वाढवितो तसतसे त्याचे विचार वाढत जातात. आणि एकदां
विचार वाढावयास सुरू झाले म्हणजे तो खरा मनुष्य होऊं लागला
असें समजावें. असो

3 305 परवांपासून तों तारीख २ जानेवारी १९४५ पर्यंतचे हिशोब करून आज पुण्यास
रवाना झाले आहे. तसेंच बुकपोस्टनें आम्हां शिकविण्याचा एक मोठा ग्रुप ही पुण्यास
व पुढील सर्व निरनिराळे रवाना केले आहेत. ही वर्षांतील दुसरी प्रतिज्ञा होय
आतां माझी एकट्याची प्रतिज्ञा येथें जूनपर्यंत रवाना केली, ती तिसरी मे ते देईल
पुढें डिसेंबर मध्यें जायची. हिंदुस्थानामध्यें अशा गोष्टींचे निराळ्याच मला कळत
नाहींत त्या मी तुला खाजगी रीत्या सांगत आहे. त्याविषयीं गुप्त आहेत असें नव्हे
तर त्यांत विशेष कांहीं अर्थ भाकला नाहीं.

माझ्या अनेक निरनिराळ्या स्नानाशिवाय खाणें वाजवी राहिलें तर मला
स्नानाशिवाय खावें लागेल, कारण सकाळीं धावतांना हॉस्पिटलमध्यें पाळण्यानें
काम करावयास जावें लागेल. सकाळीं अतीशय थंडी असली म्हणजे अंघोळ
सोसेल असें वाटत नाहीं. स्नानाआधीं उठतो कीं स्वच्छ तोंड धुऊन सरंजाम घेऊ-
नितो व हॉस्पिटलमध्यें जातो. तेथें तासभर काम करून जेवण म्हणजे सकाळची
न्याहारी करतो आणि मग वर्तमानपत्र वाचीत शांत बसतो. असें करण्याचें
कारण मला तिथल्या कष्ट लागतो हें होय. दुसरें, स्नान बहुधा रात्रीं करतो
पण केव्हां केव्हां दोन दिवसांत एकदां करतो. सुतीत हिंडत असतांना आठ आठ
दिवस स्नान घडत नाहीं. — तिसरें, संध्याकाळीं जेवणाशिवाय अगर पाण्यांत पुस्त-
कांच्या वाचनाशिवाय इतर धर्मकृत्यें कांहीं घडत नाहींत. कधीं कधीं
या मुदतीं. — पांचवें, सुतीत हिंडत असतांना मला पाहिजे असलेलें अन्न मिळे
कठीण झालें. पैसे मात्र जात पण अन्न कांहीं मिळत नसे. तेव्हां मधून
मधून मी अंडी खाऊं लागलो. प्रथम फार जड गेलें पण मांसाहारी हळूहळू
नाहींसा झालो. पाडुंग मिनियापोलिस येथें असतांना मला अंड्यानें सुरुवात
पदार्थ करावयास शिकलो. मला सर्व पदार्थ करतां येतात. पण मधून मधून येथें
आल्यानंतर मी अंडी बिलकूल सोडलीं — पांचवें, आज कित्येक वर्षें तरी मी सुपारी
खाल्ली नाहीं. तुम्हीं मला कितीदां तरी विनविलें असेल पण मी निक्षून नकार दिले
नाहीं. परंतु अगदीं अलीकडे १५ दिवसांपासून मी सुपारी खावयास प्रारंभ
केला. गोविंदाच्या आईनीं कुटलेली सुपारी गोविंदाबरोबर दिली होती. ती
आज एक वर्षभर तशीच पडून राहिली. एकदां सर्व सामान उघडलें असतां
ती सुपारी माझ्या दृष्टीस पडली. तेव्हां ती नासून बिघडून जाऊं नये म्हणून
इतक्या श्रमानें ती तयार केली आहे असें वाटल्यावरून ती टाकणें मला
पसंत पडलें नाहीं म्हणून ती खाऊन संपविण्याचें मी ठरविलें. मी सुरू केल्या
बरोबर निरनिराळी खावयास प्रारंभ केला. एकूण सध्या रोज सुपारी खात आहे.
वरील गोष्टींतील मात्र — पांचवें व सहावें लिहिलें आहेत. यांतील तुला कुठलाच
जेवणाच्या तत्त्वा कळविल्या आहेत काय हें तुला माहीत व विश्वास बसावा म्हणून.

आतां, सुखदुःख या वस्तु आहेत काय? असल्यास त्या कोठें
आहेत तुला माहीत आहे? दोन्ही आहेत [illegible] कीं एक आहे तूं सांगशील काय? तुला
दुःख होतें सुख होत नाहीं असें जर वाटेल तर दोन्ही वस्तु आहेत अशी कल्पना
करावी पाहिजे. कशी आहे काय? बरें, आतां सुख म्हणजे काय व दुःख म्हणजे
काय हें माहीत आहे काय? सुख कोणाला होतें व दुःख कोणाला होतें? हें कळवि-
शील काय? याखेरीज तुला धडा — तूं स्वतः तुला सुख होत नाहीं म्हणजे जें
म्हणतेस त्या सुखाची कल्पना काय आहे तें हें पत्र पोंचल्या वेळेपासून तों मला
पत्र लिहीपर्यंत विचार करून तुझ्या बुद्धीला स्फुरेल तशी स्वच्छपणें लिहून
कळीव. तसेंच घरांत मी मुंबईहून पाठविलेली हिंदी ज्ञानेश्वरी आहे.
त्यांत [illegible] पहिले २२ पानांत २२ श्लोक आहेत ते हंगामी त्याच्या खालचा मराठी अर्थ

गुप्त गोष्टी पाहिल्या नाहीं. माझ्या एकट्याला माहित आहे.

30 ⑥

नीट वाच. एकदां नव्हे दोनदां नव्हे, तर समजेतोंपर्यंत वाच, व समजल्यावर त्याचा विचार आणि त्यावर तुझ्या स्वतःच्या आचरणांत काय फिरवायचें तें फिरव. घाबरूं नको, लाजूं नको, चिडूं नको. मनात आणलें म्हणजे सर्व कांहीं होईल. त्यातील श्लोकांत सुख कशाला म्हणावें व दुःख कशाला म्हणावें हें श्रीकृष्णानें म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांनी स्पष्ट व्यक्त केलेलें दिविविके आहे. तें बरोबर मनात बिनविघ्नाचा ग्रहण कर. असें करणें तुला कठीण जाईल हें खरें पण मनुष्याच्या इच्छेबाहेर या जगांत कांहीं नाहीं हें तूं लक्षात आण. ज्या गोष्टी मागं पडून गेल्या आहेत त्यांचें कोणीही स्मरण करीत बसण्यात कांहीं हशील नाहीं. आजच्या माझ्या पहिल्या अध्यायात मी तुला सुखदुःखाकडे पाहावयास व विचार करून निश्चयास प्रवृत्त आहे, तसेंच मी तुला गोष्टी आपल्या मनाजोग्यात म्हणून मी आपला स्वच्छपणे खुलासा करीत आहे. याबद्दल तूं मला क्षमा कर.

आयुष्यांत व पुस्तकांत संसार करूं लागणें म्हणजेच सुख अनुभविणें असें वाटतें. लग्न झाल्यानंतर दोन चार मुलें बाळें झाली कीं जन्माचें सार्थक झालें. अगर मुलांबाळांत खेळून खिदळून काळ कमणा केली म्हणजे सुख झालें अशी तुझी कल्पना झालेली असावी, पण नाहीं; हा निव्वळ मायापाश आहे. हा निव्वळ भ्रम आहे. तूं अंगात्याच्या प्रेमात असतेस म्हणून तुला असें वाटतें कीं आपणही इतरांप्रमाणें सुवासिनी असतों तर मुलांबाळांसमवेत संसार केला असता व आपल्याला सुख झालें असतें. तसें नाहीं म्हणून तुला दुःख होतें. असें तुला कां वाटतें? कारण तूं अशा तऱ्हेच्या सुखाचे पछाडलेल्या मनाशी मध्यें कल्पना करीतेस म्हणून. पण कांहींतरीही, तें खरें सुख नव्हे. खरें सुख एकच शाश्वत आहे आणि परमेश्वरी कंकणानें तुजवर तें पारखें गेलें नाहीं, म्हणजे तुला एक शाश्वत भाग्य पडलें आहे. अशावेळीं याही प्रसंगाचा तूं उपयोग करून घेतला पाहिजेस. खऱ्या सुखाचा तुला भरपूर उपभोग करून घेतां आला पाहिजे. कारण असें पहा ज्याचें अन्न कधींही चाखलें नाहीं त्याची रुची व अरुची कधीं कळेल काय? पति म्हणजे काय हेंच ज्या कन्येस माहीत नाहीं तिला त्या पतिसुखाची कल्पना तरी कशी येईल! ज्या मनुष्याशी आपला संबंध आपल्या लहानशा वयांत आपल्या मातापितरांनी जडवून आणला त्या मनुष्याशीं एकदोनदा ही आपलें बोलणें झालें नाहीं त्या मनुष्याच्या निधनानंतर एखाद्याच्या कोणच्या पण अधिक कल्पनेनें आपलें सुख नष्ट गेलें म्हणून आयुष्य घालवावें व अहोरात्र दुःख करावें हें मला आश्चर्य दिसतें. कारण तिला कांहींच माहीत नसतांना ती असें कां करते? तिला दुःख करण्याचें कांहीं कारण नाहीं. सुख ही वस्तु कांहीं निराळी आहे आणि निजविण्याकरतांच परमेश्वरानें आपणास मुक्त केलें असें समजून अशा कल्पनेनें उपेक्षा करावी. कांहींतरीही, तुझी स्थिति अगदीं अशी आहे. करतां माझी परमपूज्य [illegible] तुला अशी प्रार्थना आहे कीं ज्याबद्दल शोक करणें योग्य नव्हे त्याबद्दल तूं शोक करूं नको. संसाराबद्दल दुःख करीत असशील तर हिंदुस्थानातील प्रत्येक गोष्ट दुःखी आहे असें तूं समज. अनाथांना दुःखानें मरणारे सर्व लोक तुझी अर्भकें, तीं बाळें आहेत असें समज आणि त्यांच्या पालनपोषणाकडे आपला देह खर्चून सुख प्राप्त करून घे. ज्या गोष्टीची तुला कल्पनाही नाहीं त्याबद्दल व्यर्थ शोक करूं नको. जीवनाच्या बरोबर शेवटपर्यंत कौमार्यावस्थेतच राहण्याचा निश्चय केला व माझें मन कधीं कधींही ढळलें नाहीं असेंच तूं समज. तूं हिंदमाता आहेस असें मी समजतो आणि तुझ्या हिंदपुत्रांचें पालन पोषण करण्याकरितां तुला अवश्य असेल तें साहाय्य मी करतो. याबद्दल तूं निर्धास्त रहा. माझ्या स्पष्टपणाबद्दल मला तूं क्षमा कर.

माझी ठिकाणें पत्ते हि. गं. वाड्यांनी वगैरे अक्कलनात तूं वगैरे [illegible] जा. कोणीही सांगून देऊं नको.

तुझा तात्या

पत्र नंबर २/१ : ३०७

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिश.
यु. स्टे. अमेरिका.
३-१-१९१५

॥ श्रीराम ॥

ति. बां. वडिलांचे चरणीं अपत्य नारायणाचे दोन्ही कर जोडून त्रिकाळ चरणी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती. आपणाकडून बरेच दिवसांत आशीर्वाद आला नाहीं. तो, कृपा करावी. आजवर माझी प्रतिज्ञा पाळलेली आहे. तसेंच विद्याभ्यासही चांगला गेला आहे. तें पूर्ण करून घ्यावे.

माझी प्रकृती बरी आहे. तुमच्या प्रकृतीची खबर असावी.

कळावे आपला
नारायण

पत्र नंबर २/१

मिशिगन विश्वविद्यालय
ॲन आर्बर, मिश.
यु. स्टे. अमेरिका
३-१-१५

॥ श्रीराम ॥

चि. विनायक यास अनेक आशीर्वाद.

गेल्या आठवड्यात यस्वाकडून गंगूताईचे पत्र आले. अशा वेळी तुमचें पत्र येणे संभव नव्हतें. गंगूताई तुमच्याकडून येणारी पत्रें प्रत्येक आठवड्याला येतात हें मी समजून आहे. नियमितपणा गंगूताईसारख्या अबलेच्या अंगी असावा आणि तो तुमच्या सारख्या होतकरू पोरांना होऊ नये हें माझें दुर्दैव होय. तुमच्याकडे पैसे नसतील अशी ही एक सबब पुढें येईल पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. दोन पैशाच्या पाकीटात गंगूताईकडे जर तुम्हांस तुमचीं पत्रें पाठवितां आलीं असतीं तर दोन पैशाचीं तिकिटें. राहिलें तुम्हांला आणून दिलीं असतीं. दुकानात नोकराच्या तुम्हांला तिकिटें देत नाहीं असें कधीं म्हणत नाहीं हें मला ठाऊक आहे आणि म्हणूनच मी तुम्ही फक्त आळशी असून तुम्हांला नेहमी जरा बाहेर ध्यानात यायची कल्पना नाहीं असें म्हणतो. कां? असेंच कीं नाहीं? तरुणपणांत जे शिकण्याचे प्रयत्न करावयाचे असतात ते स्वतःच्या कल्याणाकरितांच होय हें ध्यानात ठेवावे

Letter No
2/1

३०४

"Ram"

University of Michigan
Ann Arbor, Mich
U. S. America
3-1-18

My dear Ramu Nothing from you. Very sorry. Let me know how you are doing with your work & health. Has your sweetheart returned? How is your baby? Any hopes of another sister to that baby? Please write

Yours affte
Narayan

पाहिजे. असो, या बाबतीत फार ज्यास्त लिहावयाचे नाही. तुम्हांला प्रत्येक गोष्ट कळेल. तुम्ही तुम्ही पाहून घेतले पाहिजे.

अभ्यास कसा चालला आहे? प्रकृती कशी आहे? माझी प्रकृती चांगली असून अभ्यास बरा चालला आहे. विशेष काहीं नाही. कळावे

नारायण

अभ्यास झालेला असल्यानी त्यांची कल्पना आली आणि म्हणून यासही विद्यार्थ्यांत प्रवेश मिळाला. माझ्या केसरीतील "वैयक्तिक कथा" या लेखावरून तुला प्रवेश होणे किती कठीण असतें हें समजेलच. पण त्या गोष्टीचें यांना कांहीं वाटत नाहीं हें आमचे दुर्दैव. आमच्या कार्यांस त्यांजकडून साहाय्य होवो व हातीं घरलेलें कार्य निर्विघ्नपणा पार पडो येवढीच माझी प्रभूपाशीं प्रार्थना आहे. तो आपलेपणानें वागतो म्हणून मी त्यांच्याशी तसें वागत असेन अशी तुला वाटेल: पण, छे! माझ्या आजन्मांत मी कोणाशी इतक्या सलगीने वागलो नसेल तितक्या सलगीने त्यांच्याशी वागत आहे. याचे कारण आपण परदेशांत आहोत. व येथें मनाचा आराम याच गोष्टीचा असावयाचा. तूं स्वतः येथें येणार आहेस त्याअर्थीं तुला सर्व गोष्टी कळतील.

-

येत्या तारीख १० रोजीं म्हणजे आणखी तीन दिवसांनी बुधवारीं सकाळच्या प्रहरीं मी आन् आर्बर सोडून 'विसकॉनसीन' नामक संस्थानांत 'लेक जिनेवा' येथें यंगमेन्स ख्रिश्चन असोसिएशनचे कॉन्फरन्स भरणार आहे तेथें जावयाचा निश्चय. मज त्या ठिकाणी आमंत्रण आहे. ६०-७० रुपये खर्च येईल. त्या ठिकाणी मी तारीख २२ पर्यंत राहीन व मग कामासाठीं (एखाद्या गावांला जाईन. (तें गांव ठरविलें आहे तें पुढील खेपेस कळवेन) गोविंद व नाडगीर या ठिकाणी राहतील. नाडगीर यांस "समर स्कूल"मध्यें शिकण्यास सांगितलें आहे. काम करून त्यांची फी भरेल. गोविंद काम करेल (येथेंच) मला ज्यास्त पैसे मिळाल्यास त्यांसही अभ्यास करावयाचा आहे. काय होतें पहावें. माझीं पत्रें याच (मिशिगान आन् आर्बरच्याच) पत्त्यावर पाठवावयाचीं. पत्ता बिलकुल बदलावयाचा नाहीं. माझीं पत्रें मला वेळेवर मिळतील अशी मी व्यवस्था करीत आहे.

हें पत्र तूं वाच व तुळशीला चि. रामूकडे पाठवून दे आणि चि. गोदूताईकडे आइक करण्यास सांग. घरांतल्या मंडळीशिवाय हें पत्र दुसऱ्याशी वांचता कामा नये किंवा त्यांतील मजकूर दुसऱ्यांस कळता कामा नये अशीं त्यांस विनंती कर. अस्तु

दिवाकर तुझा
नारायण

५ ता. क. - पत्र रात्रौ (१२ वाजून गेल्यानंतर) लिहिल्यामुळें फार गडबडीत लिहिले गेले आहे. - तुझा अक्षराचा कं[illegible] आहे. ते सुधारून घे. आणि त्याबद्दल रागावूं नको.

मग तूं काय आणणार? सर्व हितचिंतकांचे आशीर्वाद तुझा कीर्ति पाहून घेऊन ये. मोठ्या खुबीने कीर्त झा. आपण त्यांच्याजवळ होईल. तसेंच इतर मैत्रिणींचे प्रेम व त्यांची प्रीती व वडिलांची ममता ही एक दुसऱ्या प्रकारे [illegible] (कीर्ति नव्हे) आण. यांशिवाय आणखी पत्रांत लिहिलेले जिन्नस घेणार. शक्य असल्यास गणुअण्णाला आण.

कळावे. तुझा नारायण.

चि. सौ. सिंधूस अनेक आशीर्वाद :- तुझें पत्र पोंचले. मजकूर समजला. माझ्या मागील सर्व पत्रांचा सविस्तर उत्तर पाठीव. हरी, भाऊ लिहितात म्हणजे तुझें काम अभ्यासाचे. व तो आणीक पत्रांत लिहिल्याप्रमाणे तूं व गंगूताई शिकून कामकाजाचा हें ध्यानांत असूं दे. आम्हीं परत येईतो तुम्हांला (चि. सौ. सीताबाईला सुद्धां) चांगले लिहितां आले पाहिजे, विचार करतां आला पाहिजे. इतिहास व भूगोल कंठपाठ पाहिजे. पुढील खेपेस ज्यास्त मजकूर.

कळावे तुझा भ्राता
नारायण

श्री. हरिभाऊंस :—
ना. कृ.

चि. गंगूताईने तुला विनंती करावयास लिहिले आहे कीं ~~तूं~~ इकडे येतांना तूं तिला भेटावेस म्हणजे ती कांहीं जिन्नस देईल तें तूं [illegible] घेऊन यावेस. मर्जी असल्यास तूं घरीं जा व वहिनीला व गंगूताई इत्यादींना भेटून ये. [illegible] चि. गंगूताई आणीक चि. सौ. सिंधूही कांहीं तरी देईलच तें फक्त नजराणाच असेल. तो जिन्नस सतत टिकणारा असावा — विचार व भेटून ये.

नारायण

To Haribhau Pandit.
Esq.

[illegible] 311

[illegible]

2/2

॥ श्रीराम ॥

[illegible]

ता. १०-२-४४

[illegible]

[illegible]

ज्याठिकाणी तुझा तुझ्या [illegible] केली तें तुझें घर आत्म-
[illegible] आहे व तेथें तुझा — तुझ्या घरी तुझा — तूं [illegible] असे मानीत आहे
हे पाहून तुझा आश्चर्य वाटेल. [illegible] विचार करून तूं [illegible]
की तें घर तुझें [illegible]? असे काय तुझा तेथें [illegible]? [illegible] असे [illegible]
[illegible] दिवस हे तेथें काढले? तुझ्या आयुष्याचा तेथें तुझा काय [illegible]?
विचार करून पाहशील तर थोडे कांहीं नाही. [illegible] — तुझा कांहीं
[illegible] — तुझा [illegible] मनुष्याबरोबर की ज्याच्या [illegible] असें
[illegible] देशात [illegible] त्याबरोबर तूं त्याच्या घरी गेलीस — दोन एक किंवा
दोनदा — आणि त्याच्या निधनानंतर त्याच्या [illegible] वर तूं
आपला हक्क सांगतेस आणि त्याकरता तुझी मंडळी कोर्टात जाऊन भांडतात.
ज्या माउलीने त्या मृत मनुष्यास नवमास पोटांत धरून तेथपर्यंत त्याच्याकरितां
कष्ट सोसले त्या माउलीला [illegible] — [illegible] — कोर्टा-
ची पायरी चढावी लागावी आणि तुझ्या माहेरच्या [illegible] भाग घ्यावा
हा कोणता न्याय? हा मनुष्याचा जरी न्याय असला तरी परमेश्वरी दरबारा-
तला न्याय नव्हे. एवढें तू पक्कें ध्यानांत ठेव. ज्या गोष्टीचा तुला [illegible]

संबंध पोचत नाहीं त्या गोष्टीसाठीं सुख व दुःख मानण्यात काय अर्थ? 312 आपल्याला त्या घडतांना दिसतात म्हणून तरी दुःख पोचतो असें तूं म्हणशील तर त्यांतही कांहीं अर्थ नाहीं. यःकश्चित पाहणारा तूं तुझा जीव कोणाच्या खातर दिसेना नाहींत, मग त्याबद्दल तरी व्यर्थ चिंता कां? त्या गोष्टी घडल्या, त्यांत कुणी सामील नाहींत असें मानून आपल्या आयुष्याला पुढचा मार्ग आखण्यास प्रारंभ केला पाहिजे. यःकश्चित गोष्टीचा सुख म्हणून व माझें माझें म्हणून घोकत बसण्यात काय हंशील? तुझें फक्त ज्ञात प्रत्येकीं तुला तुझ्या मातेची कल्पना तरी होती काय? मामाच्या मंडळीबद्दल तुला प्रेम तरी वाटत होतें काय? कसें वाटणार? कांहीं माहीतच जर नाहीं तर काय कल्पना करणार? असें असतां तुटून आपला संबंध त्यांच्याशी तुटून गेल्या नंतर पुन्हा त्यांत काय म्हणून मन घालावें. जसें पूर्वी कांहीं माहीत नव्हते तसेंच आतांही आपल्याला कांहीं माहीत नाहीं असें समजून अशा वेळीं आपलें मन दुसरी कडे फिरविलें पाहिजे.

मंगूताई, एकेका गोष्टीचा बारकाईनें विचार करून वागणें म्हणजे अतिशय चांगलें वाटतें. तूं ज्याला सुख समजतेस त्या तसल्या सुखाच्या अभावाच्या किती तरी बारीक गोष्टी आपल्या देशांत सर्वत्र आहेत व पुढें किती होतील कळत नाहीं. पुष्कळांची अशा रीतीनें जीवनयात्रा मातृविरहित कां होतात त्याचें खरें कारण शोधून त्याचें निवारण करण्यास प्रत्येकानें झटलें पाहिजे म्हणजेच बायका सुखी होतील व त्यांच्या पासून होणारी प्रजा सुखी होऊन देशाची भरभराट होईल. तुला स्वतःकरितां सुख होत नाहीं म्हणून त्यांतच — त्याच चिंतनांत दुःख वाटत येते — आपलें हित धरणाऱ्यापेक्षां, दुःखसागरांत समजून इतर दुःखी इतर भगिनींचें सुख प्राप्त करून देण्यांत आपल्या पवित्र देहाचें विसर्जन करावें असें मला वाटतें. भगिनींना यातून [illegible] कां सुख होत नाहीं? अशा माझ्या मनांत प्रश्न येत असतांना त्याचें मनानें आपोआप उत्तर दिलें.

